म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय आ० वा०
दा. क्र. ८०९८

# स्वदेशी समाज

सा ने गु रु जी

IRBK-0108018
IRBK-0108018

क र्ना ट क प्र का श न सं स्था, मुं ब ई ४

८०९८ 3730 २८९४०

# स्वदेशी समाज

डॉ. रवींद्रनाथ टागोर ह्यांच्या 'स्वदेशी समाज'
ह्या इंग्रजी पुस्तकाचा सुंदर मराठी अनुवाद

अनुवादक

साने गुरुजी, एम्. ए.

ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम २ [redacted]
विभाग [redacted]
क्रमांक [redacted]
नों. दि. [redacted]

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. ८०९८ नों. दि [redacted]
बि. ..... [redacted]

IRBK-0108018

कर्नाटक प्रकाशन संस्था, गिरगांव, मुंबई ४

मूल्य बारा आणे

( सर्व अधिकार लेखकाचे स्वाधीन )

प्रथमावृत्ति : १९४०
पुनर्मुद्रण : १९४३, १९४८

Printed by B. G. DHAWALE, at the Karnatak Printing Press, 103, Sion (East), Bombay 22, and published by him for the Karnatak Publishing House, Shri Samarth Sadan, Benham Hall Lane, Girgaon, Bombay 4.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार

१९२[illegible] [illegible] Greater India हें रवींद्रनाथांच्या चार निबंधांचें पुस्तक मिळालें. त्या इंग्रजी भाषांतराचें हें भाषांतर आहे. ह्या बंगाली पुस्तकाचें नांव 'स्वदेशी समाज' असें आहे. गुजराथींत ह्याच नांवानें त्याचें भाषांतर प्रसिद्ध आहे. ह्या चार निबंधांतील पहिल्या निबंधाचें नांव 'स्वदेशी समाज' असें आहे. त्यामुळें तेंच नांव पुस्तकास दिलें गेलें असावें.

हे निबंध वंगभंगाच्या चळवळीनंतर लगेच लिहिलेले आहेत. दुसरा निबंध १९०५-६ मधील, तिसरा निबंध १९०८ मधील व शेवटचा १९०९ ते १० मधील आहे. तीस-पस्तीस वर्षांपूर्वी लिहिलेले हे गंभीर निबंध आजही अत्यंत जरूरीचे असे आहेत. १९३४ सालीं मुंबईस भरलेल्या 'राष्ट्रीयसभे'च्या वेळेस आचार्य काकासाहेब कालेलकर मला म्हणाले, "तुमच्या इतर पुस्तकांपेक्षां 'स्वदेशी समाज' ह्याचा अनुवाद आधीं प्रसिद्ध करा. त्यांतील विचार सर्वत्र गेले पाहिजेत." काकासाहेबांसारख्या थोरांचें ज्या निबंधांविषयीं हें मत आहे, ते निबंध खरोखर किती अमोल असतील नाहीं? परंतु मला ते निबंध आतांपर्यंत प्रसिद्ध करतां आले नाहींत. पू. विनोबाजींचीं पवित्र गीताप्रवचनें कॉंग्रेस पत्रांतून प्रसिद्ध केल्यावर हे निबंध मीं त्यांतून प्रसिद्ध केले. अनेकांना ते आवडले. आज पुस्तकरूपानें ते बाहेर काढीत आहें.

रवींद्रनाथ द्रष्टे कवि आहेत. प्रज्ञा व प्रतिभा ह्यांचा दुर्लभ संगम त्यांच्या ठायीं होऊन ते महाकवि बनले आहेत. ह्या निबंधांतून तीन गोष्टी त्यांनीं प्रामुख्यानें मांडल्या आहेत. स्वराज्य स्वावलंबनानें व त्यागानें मिळेल ही पहिली गोष्ट. त्यासाठीं राष्ट्रव्यापक संघटना करून तिच्या द्वारा सर्वत्र सेवा व प्रचार करून जनता जागृत करणें ही दुसरी गोष्ट. तिसरी गोष्ट म्हणजे सर्वांना प्रेमानें नांदवण्याचा महान् भारतीय प्रयोग.

ज्या वेळेस हे निबंध लिहिले गेले त्या वेळेस राष्ट्रांत भिक्षांदेहि करणारा एक राजकीय पक्ष व दुसरा प्रक्षुब्ध जहाल पक्ष असे दोन पक्ष होते. रवींद्रनाथांनीं त्या वेळेस सांगितलें, "भिक्षांदेहि त्याज्य आहे. त्याबरोबरच केवळ आदळ-आपट करणें म्हणजेही सामर्थ्य नव्हे." त्या वेळच्या राष्ट्रीयसभेंतून इंग्रजींतून व्याख्यानें व्हावयाचीं. जनतेशीं संबंध नसावयाचा. राष्ट्रीय संस्था कशी असावी ह्याचे विचार ह्या निबंधांतून

मांडलेले आहेत व आज ते महात्मा गांधींच्यामुळें प्रत्यक्षांत आले आहेत. राष्ट्रीय-सभा आज जनतेची झाली आहे. ठायीं-ठायीं आश्रम स्थापिले गेले आहेत. त्यांच्या मार्फत सेवा होत आहे. जनता ह्या आश्रमांस साहाय्य करीत आहे. रवींद्रनाथांच्या कल्पना महात्माजींनीं मूर्तिमंत केल्या आहेत. स्वावलंबी बनून, सेवेनें जनतेंत जागृति करून स्वराज्य संपादण्याचा हा विधायक मार्ग आहे.

रवींद्रनाथांनीं भारताचें भवितव्य जें सांगितलें आहे तेंही भव्य व उदात्त आहे. भारताच्या इतिहासांतील सोनेरी सूत्र कोणतें? ह्या हिंदुस्थानांत नाना जाती, जमाती, नाना धर्म व नाना संस्कृति आणून तो भारतभाग्यविधाता एक महान् प्रयोग करून पाहत आहे. जगांतील सर्व धर्म व सर्व संस्कृति येथें संयमानें नांदवून एक दिव्य संगीत निर्माण करणार आहे. भारतीय उद्यानांत हीं भिन्नभिन्न संस्कृतींचीं फुलें फुलतील व संमिश्र सुगंध येथें दरवळेल. ह्या सर्वांची मिळून शतरंगी, शतगंधी भारतीय संस्कृति बनेल. भारत जगाला भिन्नतेंत अभिन्नता कशी पाहावी तें शिकवील. ह्यासाठीं हा भारत जगला आहे. आज हिंदु-मुसलमान परस्परांचे शत्रू होऊं पाहत आहेत. हिंदूंचाच हिंदुस्थान कोणी म्हणत आहेत तर हिंदुस्थानांत एक स्वतंत्र पाकिस्तान निर्मू असें मुसलमान म्हणत आहेत. भारताच्या इतिहासाचा आत्मा अशांना मिळालेला नाहीं. भारतमाता सर्वांना जवळ घेऊन नांदवण्याचा प्रयोग प्राचीन कालापासून करीत आहे. त्या दैवी प्रयोगांत सामील होऊं तरच तरणोपाय आहे. जोंपर्यंत हा महान् प्रयोग दृष्टीसमोर ठेवून तदनुरूप आपले सारे उद्योग चालणार नाहींत तोंपर्यंत आपली कष्टदशा नष्ट होणार नाहीं. असें हा महान् कवि, हे गुरुदेव बाहु उभारून पुकारूनपुकारून सांगत आहेत.

**सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ॥**

हिंदु धर्म, मुसलमान धर्म असल्या गोष्टी जरा दूर करून सर्वांना नांदवूं पाहण्याचा भारतमातेचा महान् धर्म, हा देवदत्त धर्म तोच आपला धर्म करूं या. माणुसकीच्या अशा महान् धर्मांत सर्व धर्मांचें सार येऊनच जातें. माणुसकी असेल तर धर्म आहे. माणुसकीविहीन धर्म धर्मच नव्हे. असा रवींद्रनाथांचा संदेश आहे. ३० वर्षांपूर्वी तो त्यांनीं दिला. आतां तरी तो ऐकूं या व भारताचें भाग्य फुलवूं या.

साने गुरुजी

# अनुक्रमणिका


स्वदेशी समाज ... ... ... ७

हें सारें कसें घडवून आणावयाचें ? ... २६

सर्वांचा मिळून एकच राष्ट्रीय पक्ष होऊं दे ... ४३

विशाल भारतांत पूर्व-पश्चिमेचा संगम ... ५९

संग्रहालय
2८८.४
५१.४१
११२१
३९१३K९

# स्वदेशी समाज

निबंध १ ला

आपल्या देशांत राजा लढाई करी, परचक्रापासून रक्षण करी व कायद्याची अंमलबजावणी करी. परंतु बाकीच्या सर्व गोष्टी समाजच करीत असे. पाणीपुरवठ्यापासून तों ज्ञानदानापर्यंतचीं सारीं कामें समाजच संपादी. शेंकडों राजे येत व जात. परंतु हा सामाजिक धर्म नष्ट होत नसे. अत्यंत सुलभतेनें व स्वाभाविकपणें हीं सेवाकर्में होत असत. राजे एकमेकांशीं सारखे लढत. परंतु मंदिरें उभारलीं जात, प्रवाश्यांसाठीं धर्मशाळा बांधल्या जात, विहिरी, तलाव, खोदले जात, पंतोजी शिकवीत असत, रामायण वाचलें जात असे, कथाकीर्तनें सुरू असत. सामाजिक जीवन बाह्यमदतीवर, कोणा सरकारावर अवलंबून नसे. आपण केवळ परावलंबी पशू बनत नसूं. बाहेरच्या स्वाऱ्याशिकाऱ्यांनीं, राजघराण्यांच्या येण्याजाण्यांनीं, ही सामाजिक जीवनांतील प्रशांत व सुंदर स्वतंत्रता नाहींशी होत नसे.

परंतु आज कोठें आहे ती स्वाधीनता ? आज पाणीपुरवठा नाहीं, रस्ता चांगला नाहीं, गांवांत शाळा नाहीं, म्हणून आपण रडत बसतों. आपल्या या सर्व गाऱ्हाण्यांचें जें मूळ त्याकडे आपण लक्ष दिलें पाहिजे. आपण लक्ष देऊं तर आपणांस वाईट वाटेल. सार्वजनिक जीवनांत अतःपर आपलें मन रमत नाहीं. तें कोठें तरी बाहेर चाललें आहे. असें आपणांस दिसून येईल.

एखाद्या गांवाजवळून वाहणाऱ्या नदीनें जर आपला प्रवाह बदलला तर त्या गांवाचें भाग्य नाहींसें होईल. तेथील मळे, तेथील बागा दिसणार नाहींत. तें गांव ओसाड पडेल. घुबडें व वटवाघळें फक्त दिसूं लागतील. नदीच्या प्रवाहाचें जसें हें महत्त्व आहे, तितकेंच किंबहुना अधिक मानवी मनःप्रवाहाचें आहे. आपल्या विचारांचा प्रवाह पूर्वी सामाजिक जीवनांत रमत असे. त्यामुळें खेड्यांपाड्यांतील वृक्षराजींत आनंद, समाधान व शांती हीं निर्दोष व पवित्र राहिलीं होतीं. परंतु जनतेचें चित्त आतां भटक्या मारूं लागलें आहे. खेड्यांना

सोडून तें दूर जाऊं लागलें आहे. त्यामुळें खेड्यांतील तळीं गाळानें भरून गेलीं, मंदिरें पडून गेलीं. खेडयांत ना आनंद, ना कांहीं.

आतां सरकारनें पाण्याची सोय करावी, सरकारनें आरोग्याची व्यवस्था करावी, सरकारनें शिक्षण द्यावें, अशाप्रकारें सरकारच्या दारांत आपण भीक मागत आहोंत. पूर्वींचें वैभवशाली झाड आज वरून मदतीचे चार थेंब मिळतात का अशी आशाळभूतपणें वाट पहात आहे. आपली ही याचना कोणी थोडीफार पुरविली तरी त्यांत काय शोभा ?

इंग्लंडमध्यें सरकार ही मुख्य व सर्वश्रेष्ठ संस्था आहे. आपल्या देशांतील राजशक्ति व इंग्लंडमधील राजशक्ति यांत फार भेद होता. लोकांच्या सुस्थितीची मुख्य जबाबदारी इंग्लंडमध्यें सरकारवर असते. तसें हिंदुस्थानांत नसे. असलीच तर फार थोडी असे. जे ऋषिमुनि समाजास मोफत शिकवीत त्यांचें रक्षण व पोषण राजांना करावें लागत नसे असें नाहीं. परंतु त्याची मुख्य जबाबदारी गृहस्थांवर असे. राजानें मदत दिली नाहीं, किंवा राजाच नसला, तरी समाजांतील मुख्यमुख्य गोष्टींस त्यामुळें धोका पोंचत नसे. पाण्याची सोय राजा करीत नसे असें नाहीं. परंतु इतर संपन्न लोक ज्याप्रमाणें आपलें कर्तव्य मानीत, तसेंच तें राजाहि मानी. राजानें हयगय केली तरी जलसंचय नाहींसे होत नसत. तलाव कोरडे पडत नसत. पाठशाळा बंद पडत नसत. कारण मुख्य आधार राजा नसून गृहस्थ असे.

इंग्लंडमध्यें प्रत्येक व्यक्तीला स्वतःचीं सुखें, स्वतःची करमणूक, स्वतःचा स्वार्थ हीं संपादण्यांत कोणताहि प्रत्यवाय नाहीं. सार्वजनिक कर्तव्यांनीं ते बांधलेले नाहींत. महत्त्वाच्या साऱ्या जबाबदाऱ्या तेथें सरकारवर आहेत. आपल्या देशांत राजावर फार जबाबदारी नसे. राजा कसा आहे याची फिकीर जनता फार करीत नसे. कारण आपलें सार्वजनिक जीवन ते राजावर अवलंबून ठेवीत नसत. सारी जबाबदारी समाज पार पाडी. ही जबाबदारी समाजांतील निरनिराळ्या घटकांवर नीट सोंपविलेली असे. श्रमविभागाची ही भारतीय पद्धति फार कार्यक्षम व अत्यंत आश्चर्यकारक अशी होती.

यामुळें आपल्या जीवनांत सर्वत्र धर्म भरून राहिला होता. संयमाचा अभ्यास प्रत्येकास करावा लागे. यावरून एक गोष्ट आपल्या ध्यानांत येईल कीं, भिन्नभिन्न संस्कृतींत जीवन निरनिराळ्या स्वरूपाचें असतें. एका संस्कृतींत

राजकीय संस्थेला जें स्थान तेंच दुसऱ्या संस्कृतींत असेल असें नाहीं. लोकहिताची जबाबदारी ज्या संस्थेवर तेथें राष्ट्राचें हृदय उडत असतें. तेथें घाव पडेल तर तो वर्मी पडला असें होऊन समाज निर्जीव होईल; राष्ट्रास प्रेतकळा येईल. इंग्लंडमध्यें सरकार ही संस्था मुख्य, तर आपल्याकडे समाज ही संस्था मुख्य, इंग्लंड वांचविणें म्हणजे इंग्लंडमधील सरकार वांचविणें. हिंदुस्थान वांचविणें म्हणजे आमची समाजाची घडी वांचविणें. म्हणून इंग्लंडमध्यें सरकार अत्यंत दक्ष राहतें. आणि इंग्रजांनीं हिंदुस्थानांत काढलेल्या शाळांत शिकून आपली अशी समजूत होत आहे कीं बेफिकीर असणाऱ्या येथील सरकारी अंमलदारांस मधूनमधून जागें करणें एवढेंच हिंदी माणसाचें काम! परन्तु दुसऱ्याला औषध पाजून माझा रोग हटणार नाहीं, ही साधी गोष्टहि न कळण्याइतकी आपली केविलवाणी स्थिति आज झाली आहे.

चर्चेची व वादविवादाची आपणांस फार हौस. परंतु चर्चेनें पाऊल पुढें पडेल असें मात्र नाहीं. इंग्लंडमधील सरकार आज कित्येक वर्षें उत्क्रान्त होत आहे. लोकांच्या सदिच्छेवर तें चाललें आहे. वादविवादानें त्यांच्या स्थितीप्रत आपण पोंचूं शकणार नाहीं. आपल्या देशांतील हल्लींच्या सरकारचा आपल्या सामाजिक रचनेशीं यत्किंचितहि संबंध नाहीं. अशा या परकी सरकारपासून आपण जितकें जितकें अपेक्षूं, तितकें स्वातंत्र्याचें मोल आपणांस दिलें पाहिजे. जितकी त्याच्यापासून अपेक्षा करूं तितके त्याचे गुलाम होऊं. ज्या ज्या गोष्टी सरकारनें कराव्या असें आपण म्हणूं त्या करण्याची आपली शक्ति आपण गमावून बसूं. आणि जी दुर्बलता पूर्वी आपल्या समाजांत नव्हती ती आपल्या अंगीं येऊन बसेल. केवळ सरकारच्या तोंडाकडे पाहणारे आपण होऊं.

पूर्वी मोंगल अमदानींत बादशहा अनेकांना सरदार बनवी, त्यांना पदव्या, सरंजाम देई. परन्तु या दरबारी मानपानानें सरदारांचें समाधान होत नसे. ज्या समाजांत आपण जन्मलों त्या समाजानें आपणांस शाबासकी द्यावी असें त्यांना वाटे. मोठ्यांतला मोठा मान दिल्लीच्या दरबाराकडून मिळणारा नव्हे तर माझ्या समाजाकडून मिळणारा, हें तो ओळखी. तो मान मिळविण्यासाठीं आपल्या जन्मग्रामांतील चंद्रमौळी झोपड्यांसमोर येऊन त्याला उभें राहावें लागे. दिल्लीदरबारचा मान मिळाला, परन्तु स्वजनांनीं जर उपेक्षा केली तर ते सरदार खट्टू होत. बादशहा त्यांचा सम्राट् नव्हता,

स्वदेशी समाज हा त्यांचा खरा सम्राट् होता. समाजाकडून मिळालेला स्तुतीचा एक शब्द बादशहाच्या पदकांपेक्षां त्यांना सहस्रपट अधिक मोलाचा वाटे. स्वजनांनीं कौतुक केलें तर त्यांच्या अंगावर मूठभर मांस चढे. राजधानींतील वैभवानें ते आपल्या जन्मग्रामांस विसरत नसत. स्वतःच्या समाजाबद्दलच्या प्रेममय व कर्तव्यमय भावना ते हृदयांशीं धरून ठेवीत. त्यामुळें खेडीं कधीं कंगाल झालीं नाहींत. पाण्याचें दुर्भिक्ष पडलें नाहीं. खेड्यांतील जीवनयात्रेंत मानवी संस्कृतीचीं सर्व अंगें दिसून येत असत.

परन्तु आज परिस्थिति पालटली आहे. आज स्वजनांनीं केलेल्या गौरवाचें महत्त्व आपणांस वाटत नाहीं. आज परकी सरकारनें दिलेल्या पदव्या आपणांस भूषणाच्या वाटतात. स्वजनांच्या स्तुतीची मला पर्वा नाहीं. म्हणून त्याच्या सेवेंतहि मी रमत नाहीं. आज सरकार आम्हांस अमुक करा, तमुक करा असें सांगतें. आपण होऊन स्वजनसेवेच्या गोष्टी आपल्या शिरावर आनंदानें घ्याव्या असें आपणांस वाटत नाहीं. या गोष्टी सहजपणें करावयास लावणारी ती पूर्वीची स्फूर्ति, तो बंधुभाव, सारें आज लोपलें. स्वजनसेवेचा जन्मसिद्ध हक्क आज गोऱ्या माणसाला आपण विकला आहे.

माझ्या म्हणण्याचा गैरसमज नका करूं. प्रत्येकानें खेड्यालाच चिकटून बसावें, ज्ञानासाठीं वा कीर्तीसाठीं बाहेर जाऊं नये, असें नाहीं मी म्हणत. आज आपल्या लहानश्या घरट्यांतून आपण बाहेर ओढले गेलों आहोंत. आपली बुद्धि जागृत झाली आहे. चौफेर आपण दृष्टि ठेवूं लागलों आहोंत. विचार वाढत आहे. कार्यक्षेत्रें वाढून मनाचा विकास होत आहे. हें सारें ठीक. ज्या परिस्थितीमुळें हें होत आहे तिचे ते उपकारच आहेत. परन्तु यामुळें आपल्या सामाजिक संबंधाची उलटापालट होतां कामा नये. कितीहि झालें तरी बाहेरचें तें बाहेरचें व घरचें तें घरचें. मनुष्य कमावण्यासाठीं बाहेर जातो, परन्तु तो घर विसरत नाहीं. आपल्या बुद्धीच्या शक्तीचा उत्कृष्ट उपयोग व्हावा म्हणून आपण स्वतःशीं सदैव प्रामाणिक असलें पाहिजे.

परन्तु आपल्या सभापरिषदांतून काय दिसतें ? आपल्या सर्व जीवनाची आज उलटापालट झालेली दिसून येते. इंग्रजी शिकलेले तेवढे आपले असें वाटूं लागलें आहे. शिकलेल्यांची एक स्वतंत्र जात जणुं आपण बनवितों. परन्तु जोंपर्यन्त लहानापासून थोरापर्यन्त, रावापासून रंकापर्यन्त, सर्व समाजाशीं

अनुक्रम
विभाग
निबंधांक

आपण एकरूप होत नाहीं तोंपर्यन्त राजकारण म्हणजे केवळ बडबड आहे. आपल्या चर्चांतून बहुजनसमाज वगळला जातो. त्यांच्यांत आणि आपल्यांत एक प्रचंड पहाडच जणुं आपण उभा केला आहे. इंग्लंडचें हृदय जिंकून घेण्याचे आपण प्रथमपासून प्रयत्न चालविले. तितकेच प्रयत्न जर स्वजनांचें हृदय जिंकण्यासाठीं केले तर! इंग्लंडचें हृदय जिंकण्यापेक्षां आपल्या स्वदेशाचेंच हृदय जिंकणें हीच गोष्ट अधिक मोलाची व महत्त्वाची आहे.

सर्व जनतेच्या हृदयाचें ऐक्य करणें हें राजकीय आकांक्षांचें अंतिम ध्येय आहे. परकीयांचें हृदय जिंकून घेण्यासाठीं केलेल्या खटपटींना राजकारण नांव देणें असला प्रकार या आपल्या दुर्दैवी व अभागी देशांतच फक्त पहावयास मिळेल! स्वजनांचें हृदय जिंकणें हें पहिलें कर्तव्य आहे. हें खरें राजकारण; आणि यासाठीं सर्व परकी पद्धतीचा आपण त्याग केला पाहिजे. आपल्या सर्व व्यवहारांत परकी पद्धतीचें स्तोम माजलें आहे. अशानें स्वजनांच्या हृदया-जवळ जातां येणार नाहीं. मायभूमीच्या हृदयांशीं घेऊन जाणारे ते जुने स्वदेशी मार्ग सुदैवानें अद्याप मोकळे आहेत. ते मार्ग पुन्हा आपलेसे करूं या.

आपला संदेश जर सर्व देशाला आपणांस द्यावयाचा होता तर त्यासाठीं काय केलें पाहिजे होतें? इंग्रजी पद्धतीच्या टेबल खुर्च्यांच्या परिषदा भरविण्याऐवजीं आपण मोठमोठे मेळे भरविले असते; या मेळ्यांतून गाणीं, खेळ, उत्सव, प्रवचनें, कीर्तनें, कुस्त्या वगैरेंचा अंतर्भाव केला असता; खेड्यापाड्यांतून हजारों लोक तेथें धांवून आले असते; त्या ठिकाणीं बाजार भरविले असते; प्रदर्शनें मांडलीं असतीं; शेंकडों स्वदेशी वस्तु ठेविल्या असत्या; कवि, चित्रकार, शाहीर, यांना तेथें बक्षिसें ठेवलीं असतीं. सर्व राष्ट्रांत त्यांचा गौरव केला असता; आरोग्याचीं सदीप व्याख्यानें करविलीं असतीं; शेतकीच्या गोष्टी सांगितल्या असत्या; स्वभाषेंत राष्ट्रहितासंबंधींच्या नाना प्रश्नांचा खल केला असता.

आपले कोट्यवधि बंधु खेड्यांतून पसरले आहेत. खेड्यांतील जनतेची बाहेरच्या विशाल जीवनाविषयीं असलेली तहानभूक या मेळ्यांच्या द्वारें तृप्त केली जाई. मेळ्यांतून बाहेरचें विविध असें वाढतें विराट् जीवन त्यांना दिसे. खेड्यानें मेळा बोलावणें म्हणजे बाहेरच्या विशाल जगाला आपल्या चंद्रमौळी झोपडींत आमंत्रण देणें होय. खेड्यांत असा मेळा भरला म्हणजे

जनतेचें हृदय उचंबळे. संकुचितपणा नाहींसा होई. बाहेरच्या जगाच्या स्वागतार्थ सारें खेडें एका दिलानें उभें राही. पावसाळ्यामध्यें नद्या, नाले, ओहोळ भरून जाऊन एकमेकांस भेटतात. त्याप्रमाणें महान् मेळ्याचे प्रसंगीं खेड्यांतील जनता आपसांत एक होऊन या विश्वगंगेस मिळे.

मेळा ही आपल्या देशांतील अभिजात अशी संस्था आहे. टेबलखुर्च्यांची कोरडी सभा बोलाविली तर अनेकांना शंका व संशय येतात. जनतेचीं अंत:-करणें तेथें चटकन् फुलत नाहींत. परंतु मेळे पहावयास येणारे मोकळ्या मनानें येतात. संशय दूर राहतात. हिंदुस्थानांत असा एकहि जिल्हा नाहीं कीं ज्यांत निरनिराळ्या वेळीं, वर्षांतील निरनिराळ्या दिवशीं योग्य अशा ठिकाणीं मेळे भरत नाहींत. शेंकडों ठिकाणीं यात्रा भरतात. त्यांच्या वेळा व त्यांचीं स्थानें यांचें टिपण आपणांजवळ हवें. या यात्रांच्या मार्गानें, तेथील मेळ्यांच्या मार्गानें बहुजन समाजाच्या हृदयांत आपण शिरलें पाहिजे. या मार्गाचा आपण शीघ्र स्वीकार करूं या.

पुढारी जर कोरड्या व पोकळ राजकारणाचा शपथपूर्वक त्याग करून या यात्रांतून व मेळ्यांतून नवीन विचार, नवीन कल्पना, नवीन ध्येयें घेऊन जातील तर नवचैतन्य उत्पन्न होऊन राष्ट्राची फार लवकर जागृति होईल. या मेळ्यांतून हिंदु-मुस्लिम ऐक्य, अस्पृश्योद्धार, शिक्षण, आरोग्य, रस्ते, पाणीपुरवठा, गायरानें, इत्यादि लहानमोठ्या गोष्टींसंबंधीं संवाद करतील, गाणीं रचतील, तर हां हां म्हणतां राष्ट्र उभें राहील.

कार्यकर्त्यांचा एक संघ असे मेळे तयार करून जर या जिल्ह्यांतून त्या जिल्ह्यांत असा फिरूं लागेल, पोवाडे, गाणीं, नकला, संवाद, कुस्त्या, खेळ, सदीप व्याख्यानें, वगैरे सरंजाम बरोबर बाळगील तर पैशाचा प्रश्नहि सहज सुटेल. या मार्गानें थोडी फार मदत मिळून, संघाचा खर्च निघून, थोडा फार फायदाहि उरेल. या उरलेल्या पैशांचा उपयोग जर राष्ट्रकार्याकडे केला तर जनता व मेळे करणारे यांच्यामध्यें सेवेचें अभंग व बळकट बंधन निर्माण होईल. कार्यकर्ते व जनता यांच्यांत असा हा स्नेहसंबंध एकदां जडला म्हणजे मग बहुमोल राष्ट्रजागृतीचीं अनेक कामें ते करून घेऊं शकतील.

पूर्वीं संस्कृतीचें शिक्षण अशा यात्रांतून व उत्सवांतून मिळे. परंतु हल्लीं तसें दिसून येत नाहीं. यात्रांतील, उत्सवांतील गंभीरता, सदभिरुचि जात

चालली. पुष्कळ वेळां यात्रांतून तमाशे व तगतराव यांचेंच प्राबल्य दिसतें. मारुतिजन्माला, रामजन्माला तमाशे करतात. ही सुकून गेलेली संस्कृतिगंगा नवीन विचारप्रवाहानें युक्त करून भगीरथ प्रयत्नांनीं तरुण कार्यकर्ते जेव्हां खेड्यांत नेऊन ओततील तेव्हांच राष्ट्राला नवीन कळा चढेल.

खेड्यांतील तळीं सुकलीं, पाण्याचा दुष्काळ पडत चालला, रोगराई फैलावत चालली, मरणाचा सुकाळ झाला. ह्याबरोबरच खेड्यांतील सांस्कृतिक व नैतिक जीवनहि बहुतेक संपुष्टांत येऊं लागलें. पिण्याला शुद्ध पाणी नाहीं, मनाला शुद्ध विचार नाहीं. शरीराला रोग व बुद्धीला रोग. खेड्यांत स्वच्छ पाणी नाहीं, त्याप्रमाणें खेड्यांतील यात्राउत्सवांत सात्त्विकता व शुद्धता उरली नाहीं. ज्या शेताची नीट निगा राखिली जात नाहीं तेथें सुंदर धान्य तर नाहींच होत, उलट विषारी तण मात्र माजतें. त्याप्रमाणें यात्रा-महोत्सवांचें होत आहे. ह्या संस्थांचा अधःपात न व्हावा असें वाटत असेल तर कळकळीच्या तरुण सेवकांनीं तेथें धांवून गेलें पाहिजे. या संस्थांचा बचाव न करूं तर आपण मोठे अपराधी ठरूं.

हें सारें सांगण्याचा हेतु एवढाच कीं पूर्वीं ज्या स्वाभाविक व सहज रीतीनें आपण खेड्यांतील जनतेंत मिसळत होतों, त्या मार्गाचा पुन्हा अवलंब व्हावा. जुन्या संस्थांत नवचैतन्य यावें. त्यांची नीट संघटना व्हावी. त्यामुळें आपल्या देशाला अपरंपार फायदा होईल.

परकी सरकाराकडे अर्जविनंत्या करण्याच्या उपायांवर ज्यांची श्रद्धा बसत नाहीं, त्यांना विरुद्ध पक्षाचे लोक निराशावादी असें संबोधितात. परंतु माझें तर असें म्हणणें आहे कीं जो हताश व दुबळा असतो, तोच दुसऱ्याच्या कृपेकडे जास्त आशेनें बघत असतो. दुसऱ्याच्या दयेवर विसंबणें म्हणजेच खरी निराशा. गुडघे टेंकल्याशिवाय व हात जोडल्याशिवाय आपणांस कांहीं आशा नाहीं असें म्हणणाऱ्यांपैकीं मी नाहीं. माझ्या देशावर माझी श्रद्धा आहे. माझ्या देशबांधवांच्या शक्तीबद्दल मला आदर आहे. जर आपलें आजचें ऐक्य हें खरें जिव्हाळ्याचें असेल, भारतवर्षाची जी खरी आंतरिक एकता, तिचा जीवनांतील साक्षात्कार म्हणून जर आपण आजची ऐक्याची भाषा बोलत असूं तर आपणांस निराश होण्याचें कारण नाहीं. यश हें ठेवलेलें आहे. परंतु आपलें ऐक्य जर खरें नसेल, आपल्यांत भेद पाडण्यासाठीं

परकीयांनीं कोणाला अधिक देऊं करतांच तें ऐक्य सोडून जर परकी सत्तेस कोणी जाऊन मिळणार असतील तर मात्र यशाची आशाच नको. परकी सत्ताधाऱ्यांची कृपा वा अवकृपा यांवर आपलें ऐक्य विसंबून राहतां कामा नये.

भारताची खरी कार्यपद्धति कशी असे हें पाहणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. या देशांत मुख्यतः जर कसला प्रयत्न पूर्वी केला जात असेल तर तो मनुष्या-मनुष्यांमध्यें ओलावा निर्माण करण्याचा होय. परस्परांत स्नेहसंबंध निर्मिण्या-साठीं भारतांत खटपटी केल्या जात. आपले संबंध दूरदूरच्याहि नातलगांशीं असत. मुलेंबाळें मोठीं झालीं तरी प्रेमसंबंध तसेच टिकत. शेजारी, गांवकरी—मग तो कोठल्याहि जातीचा वा धर्माचा असो—त्याबद्दल आपणांस आपलेपणा वाटे. असे हे प्रेमसंबंध कायद्यानें जोडलेले नसत. ते हृदयाचे संबंध असत. ज्याच्याज्याच्याशीं म्हणून संबंध येई, त्याला आपण आपल्या मैत्रीच्या वर्तुळांत ओढून घेत असूं. मनुष्य म्हणजे केवळ यंत्र आहे, त्याच्यापासून आपला फायदा जास्तींत जास्त कसा करून घेतां येईल एवढेंच पाहावें अशी भारतीयांची कधींच दृष्टि नव्हती.

प्रेमाचे संबंध जोडीत जाणें हा आपला विशेष आहे. परिस्थितीप्रमाणें आपण आज जरी बदलत असलों तरी त्या बदलांतहि हृदयाचे संबंध, हृदयाचा ओलावा, आपल्या सर्व व्यवहारांत प्रामुख्यानें दिसतो. त्यामुळें व्यवहार बाजारी न होतां विशुद्ध व निर्मळ होतो. यामुळें कित्येक वेळां आपणांवर जबाबदारीहि जास्त पडते. केवळ जरूर म्हणून जीं बंधनें निर्माण होतात तीं तात्पुरतीं असतात. धनी व नोकर यांच्यांतील संबंध जर केवळ व्यावहारिक गरजेचे असतील तर काम करावें व मजुरी घ्यावी एवढाच त्या संबंधाचा अर्थ राहील. परंतु जर त्या संबंधांत वैयक्तिक भावना ओतावयाची असेल तर दोघांवर अधिक जबाबदारी येते. त्या धनी-नोकरांत सुखदुःखांत भागी-दार होण्याचे संबंध उत्पन्न होतात व ते संबंध दोघांस कायमचे जोडतात.

आपण हल्लींच्या प्रचंड सभापरिषदा बोलावतों. तेथें स्वागतसत्कार कर-ण्यांत स्थानिक कार्यकर्ते मग्न होऊन जातात. आलेल्या पाहुण्यांस तकलीफ पडूं नये, त्यांना सर्व प्रकारच्या सुखसोई मिळाव्या म्हणून आपण झटतों. व्यवहाराच्या बाह्य कामकाजांतही हृदय ओतून तो व्यवहार आपण सुंदर करतों. परिषदांत काय ठरलें यापेक्षां स्वागत कसें झालें, लोक कसे दिलदार

होते, कशी सुंदर व्यवस्था होती, हेच विचार आपल्या हृदयांत राहतात, अधिक राहतात. पाश्चिमात्य पद्धतीनें भरलेल्या या सभा आमच्या पौर्वात्य हृदयाला मारूं शकल्या नाहींत. लोकांचें मनःपूर्वक स्वागत करणें हा आमचा राष्ट्रीय धर्म आहे. राष्ट्रीय सभांच्या बैठकांतून हा आमचा स्वभावच अधिक टिकणारें कार्य करितो. ठराव होतात व मरून जातात. वर्षभर त्यांचें नांवहि ऐकूं येत नाहीं. परंतु प्रेमानें केलेलें स्वागत हृदयांत राहतें. भारतीय ऐक्य निर्मिलें जातें.

प्राचीन काळीं गृहस्थास मोठ्या प्रमाणांत आदरातिथ्य करावयाचें असलें म्हणजे तो यज्ञ करी. आज यज्ञाचें स्वरूप बदललें. आज सभापरिषदांच्या रूपानें तें प्रकट होत आहे. या सभापरिषदांतून मातृभाषेचा उपमर्द करणाऱ्या भाषेंतून भाषणें झालीं तरी भारतमाता खिन्न होत नाहीं. आलेल्या कोनाकोपऱ्यांतील माझ्या लेकरांचें मी स्वागत करीन, त्यांना माझ्याजवळची प्रेमळ मीठभाकर देईन, या विचारानें तिचें हृदय भरून येई. पुस्तकी पंडितांची, वाचाळ वाक्पटूंची, मनगटांत घड्याळें बांधून आलेल्या शिष्टांचीच फक्त सभा होण्याऐवजीं, जर त्या सभेंत रावरंक, खेडवळ व नागरिक, आमंत्रित व निरामंत्रित सारे जमले असते व त्यांना समजेल असें कामकाज चाललें असतें तर भारतमातेला अधिक आनंद झाला असता. अशा गजबजलेल्या सभेंत लांब भाषणें व खंडीभर ठराव पास करतां आले नसते. परंतु मातेच्या मंगल आशीर्वादाची आपल्या शिरावर अधिकच वृष्टि झाली असती.

तें कांहींहि असो. आपलें सारें कामकाज नीट करूनहि शिवाय परस्पर प्रेमळ संबंधाची मधुरता जी एक असते, ती सोडून देण्यास भारतवर्ष तयार नाहीं. आपल्या ह्या स्वभावामुळेंच अनाथदुबळ्यांस मदत करणें, मुलाबाळांच्या शिक्षणाची व्यवस्था करणें, वाटसरूंसाठीं धर्मशाळा बांधणें, रस्त्यावर विहिरी बांधणें, अशीं व इतर सार्वजनिक कामें आपण पार पाडीत असूं. हा सर्व स्वजनांचा प्रश्न असे. आज हीं पूर्वींचीं बंधनें जरी शिथिल झालीं असलीं, शिक्षणाची व्यवस्था, रस्तेदुरुस्ती, पाणीपुरवठा इ० गोष्टी आपल्या भग्न समाजास आज जरी शक्य दिसत नसल्या, तरी निराश होण्याचें कारण नाहीं.

गृहस्थानें आपल्या घरापुरतें वा आपल्या गांवापुरतें पाहूं नये. त्यानें विशाल दृष्टीचें व्हावें, अशी हिंदुधर्माची शिकवण आहे. पंचमहायज्ञ करावे असें आपला धर्म सांगतो. पंचमहायज्ञ करावे असें ज्या गृहस्थास धर्म सांगतो,

त्या गृहस्थाला आपल्या देशासाठीं कांहींच करतां येणार नाहीं का ? आपल्या देशाच्या नांवानें रोज मूठभर तांदूळ, रोज एक पावआणा आपणांस बाजूस काढून ठेवतां येणार नाहीं का ? आपल्या या थोर देशाविषयींचें जें ऐक्य तें कृतींत आणण्यासाठीं सर्वांनीं हातभार नको का लावावयास ? मूठभर धान्य, एक दिडकी हें का फार आहे ? ऋषींच्या तपोभूमींत, वीरांच्या कर्म-भूमींत, देवांच्या या आवडत्या भूमींत एवढीशी अपेक्षा करणें म्हणजे का कठीण व्हावें ? आपल्या देशांतील सार्वजनिक सेवेच्या सर्व कर्मांशीं आपला संबंध नको का जोडायला ? आपलीं कामें आपण का परक्यावर सोंपवणार आणि आपण उदासीन राहणार ?

आपल्या देशांतील संपत्तीचा प्रवाह सारखा बाहेर चालला आहे म्हणून आपण रात्रंदिवस ओरडत आहोंत. परंतु आपलीं मनें स्वजनांपासून दूरदूर वहात चाललीं आहेत, ही गोष्ट त्याहून शतपट अधिक दुःखाची नाहीं का ? सरकारनें अमुक करावें, तमुक करावें एवढें सांगण्यांतच फक्त आपली देश-भक्ति का ? नाहीं. आपला हा स्वभाव नाहीं. दिवसभर काबाडकष्ट करून जी चतकोर भाकर मिळेल, ती आपल्या दीनदुबळ्या भावांसह खाण्याची आपली सनातन संवय आहे, आणि असें करण्यांत आपण मोठा त्याग करतों असें आपल्या मनांतहि नसतें. अशा प्रेमळ व कष्टाळू भारतीयांस आपल्या मातेचें कां ओझें होईल ? परकी माणसानें माझ्या मातेचें दैन्य हरावें म्हणून त्याच्या दारांत का आपण भीक मागत बसणार ? छे छे. आपणांस हें आवडणार नाहीं, आपल्या देशाचें ओझें प्रत्येकानें शिरावर घेतलें पाहिजे. यांत आपला मोक्ष आहे. मी माझ्यापुरता असें म्हणण्याचे दिवस गेले. व्यक्ति कितीहि क्षुद्र असो, तिची उपेक्षा अतःपर होतां कामा नये. अत्यन्त क्षुद्राचीहि अवहेलना होतां कामा नये. मातेची सेवा त्यालाहि करूं दे, ती सेवा थोरच आहे.

आज जर एखाद्या तरुणाला म्हटलें, "जा व समाजसेवेस वाहून घे–" तर तो गोंधळांत पडेल. त्यानें कोणतें काम करावें, कोणाच्या जोरावर करावें ? त्यानें काय खावें, कोठें रहावें ? असे अनेक प्रश्न त्या तरुणाच्या डोळ्यां-समोर उभे राहतील. आपल्या कार्यांची योजना एका व्यक्तीस करतां येणार नाहीं. यासाठीं संघटना हवी. एखादा आश्रम हवा. परंतु एखादी संस्था,

एखादा आश्रम सुरू होतो. काम होऊं लागतें. परंतु पुढें काम टिकत नाहीं. याचें मुख्य कारण म्हणजे कार्यकर्ते संस्थेशीं एकरूप होत नाहींत. प्रत्येकजण आपल्यावरची जबाबदारी कमी कमी करीत जातो व संस्था लयाला जाते. अशानें कसें होणार? ज्या परकीयांना आपणांस तोंड द्यावयाचें आहे ते अत्यंत सुसंघटित व कार्यक्षम आहेत. त्यांनीं आपल्याभोंवतीं अनेक जाळीं पसरलीं आहेत. आपल्या देशांतील शाळांपासून तों दुकानांपर्यंत त्यांनीं आपलीं पाळेंमुळें घुसडविलीं आहेत. हें धृतराष्ट्रानें भीमाला दिलेलें आलिंगन आहे. हे कालियाचे कृष्णाभोंवतींचे वेढे आहेत. या वेढ्यांतून, या मारक आलिंगनांतून मुक्त होण्यासाठीं स्वदेशी समाजानें खंबीरपणें उभें राहिलें पाहिजे. ढिलाई दूर केली पाहिजे. शिस्त, संघटना यांची बळकट कास धरून जो एक आपण पुढारी मानूं त्याच्याभोंवतीं उभें राहिलें पाहिजे. तो पुढारी आपल्या ऐक्याची खूण, तो आपल्या ऐक्याचा प्रतिनिधि, तो आपल्या ऐक्याचा सूर्य व त्याच्याभोंवतीं प्रदक्षिणा घालणारे आपण सारे ग्रहोपग्रह. त्याची आज्ञा शिरसा मान्य करणें व पूर्णपणें पाळणें यांत आपणांस कधींहि कमीपणा वाटतां कामा नये. कारण आपल्या स्वातंत्र्याचें खरें स्वरूप त्या नायकाच्या द्वारें, त्या महान् पुढाऱ्याच्या द्वारें प्रतीत होत असतें.

असा जो हा समाजपति निवडावयाचा, राष्ट्रपति निवडावयाचा, तो कधीं उत्तमोत्तम असेल तर कधीं तसा नसेल. परंतु समाजपति कसाहि असला तरी बिघडत नाहीं. कारण तो कायमचें नुकसान करूं शकणार नाहीं. उलट सर्वोत्तम नायक जरा कमी उत्तम मिळाला तर त्यांत कल्याणच आहे. कारण आपण अधिक दक्ष व तत्पर राहूं. आपल्या त्या प्रतिनिधीच्या शक्तींत जनता स्वत:ची शक्ति पाहील व समाज अजिंक्य होईल. या समाजपतीच्या हाताखालीं दुसरे दुय्यम पुढारी असतील. ते देशाच्या निरनिराळ्या भागांत कार्य करतील. त्या त्या भागांत जीं जीं जरूरीचीं व चांगलीं कामें करावयाचीं त्यांबद्दल ते जबाबदार असतील. त्या कामांबद्दल ते समाजपतीला जाब देतील.

समाजांतील प्रत्येक व्यक्तीचा धर्म झाला पाहिजे कीं देशासाठीं कांहींतरी वर्गणी रोज बाजूला काढून ठेवणें. देशाचें स्मरण रोज हवें व स्मरणाची खूण म्हणून कांहीं त्याग हवा. हें रोजचें आह्निक झालें पाहिजे. निरनिराळ्या उत्सवप्रसंगीं, लग्नमुंजी वगैरेचे वेळीं जो आपण खर्च करतों त्यांतून कांहीं

अंश देणगी म्हणून आपण काढून ठेवला पाहिजे. नित्याची देणगी व ही नैमित्तिक देणगी. या दोन्ही प्रकारच्या देणग्यांनीं आपल्या समाजाजवळ कार्यासाठीं भरपूर पैसा उभा राहील. पूर्वीं प्राचीन काळीं आपल्या देशांत मोठमोठे आश्रम, मोठमोठीं विद्यापीठें कशीं चालत ? लोक आपण होऊन ज्या देणग्या देत त्यांतूनच त्या भारतभूषण संस्थांचे खर्च चालत. त्याच आपल्या देशांत आज पुन्हा सार्वजनिक सेवेस पैसा मिळणार नाहीं असें मला वाटत नाहीं. अशा आश्रमांचा योगक्षेम चालेल. हे आश्रम उत्कृष्ट काम करूं लागतील तेव्हां उदारांच्या देणग्या घेण्याचा त्यांना हक्कच प्राप्त होईल.

असा एक मध्यबिंदु असला पाहिजे कीं जेथें आपली सारी दानशक्ति वहात येईल. त्या मध्यबिंदूजवळ साऱ्या देणग्या याव्यात व तेथून योग्य प्रमाणांत मदत दिली जावी. अशी जी मध्यवर्ती संस्था असेल तिला आपण प्राणांपेक्षांहि जपलें पाहिजे. तिला आंतून रोग जडणार नाहीं हें पाहिलें पाहिजे. बाहेरून हल्ला आला तर आंतील जीवनशक्तीच्या जोरावर आपण तो परतवूं. आंतून जर वृक्ष पोखरलेला नसेल तर तो संकटाशीं टक्कर देऊन उभा राहील, झगडून अधिक बळकट होईल. आंतील जीवनशक्तीचा धर्मच आहे कीं बाहेरच्या जखमा भरून काढणें. वाढत्या तरुण मुलाला सतरा ठिकाणीं लागलें तरी त्याच्या जीवनशक्तीमुळें त्या जखमा पटकन् भरून येतात. शरीरांतील जीवनशक्ति शरीरांत एकसूत्रीपणा ठेवते. संस्थेंतील जीवनक्तीनेंहि साऱ्या प्रयत्नांची एकवाक्यता करणें, सर्वत्र चैतन्य खेळवीत राहणें या गोष्टी केल्या पाहिजेत.

राष्ट्रांत जी अशी महनीय संस्था आपण निर्मूं तिला भारतमाता आशीर्वाद देईल. जनता दुवा देईल. चांगल्या कामाबद्दल परकी सरकारहि पदवीदान करतें. परंतु आपणांस परकी सरकारच्या पदव्यांची पर्वा नाहीं. मातेचा आशीर्वाद मिळाला म्हणजे सारें कांहीं मिळालें. कार्यकर्त्या संस्थेला, सेवेनें प्रेमैक्य निर्माण करणाऱ्या संस्थेला, समाज आशीर्वाद न देईल तर संस्थेला खरें समाधान मिळणार नाहीं. समाजानें चांगलें कार्य करणाऱ्यांची पाठ थोपटली पाहिजे.

आणि आज हिंदुमुसलमानांचें ऐक्य आधीं निर्मावयाचें ही गोष्ट कोणी विसरतां कामा नये. हिंदुमुसलमानांतील तंटे आपण दूर केले पाहिजेत.

सर्वांना योग्य व समान रीतीनें आपण वागविलें पाहिजे. पक्षपात न होईल म्हणून जपलें पाहिजे. दोघांचे हितसंबंध पाहिले जावेत. तडजोड करावी. वाटेल तो त्याग करून ही दिलजमाई घडवून आणली पाहिजे. आपणांस ह्या ऐक्याचे बाबतींत जर यश आलें नाहीं तर पुन्हा पुन्हा कलहाचे वणवे पेटतील; द्वेषमत्सर भडकतील व त्यामुळें देश दिवसेंदिवस अधिक लुळा-पांगळा व दुबळा होईल.

हीं भांडणें मिटविण्याची आपणांस शक्ति आहे हा आत्मविश्वास आपण बाळगू या. प्रेमरज्जूनें सर्वांस आंवळून ठेवण्याची कला हिंदुस्थानच्या साऱ्या जीवनांत आज शेंकडों वर्षें मुरलेली आहे. नानाप्रकारच्या विकट परिस्थितींत भारतवर्षानें पुन्हा पुन्हा सुव्यवस्था निर्माण केली आहे. आणि म्हणून तर हा थोर देश अद्याप उभा आहे. अशा या भारतावर माझी श्रद्धा आहे. भारतवर्षाच्या आजच्या परिस्थितींत सुव्यवस्था निर्माण करण्यासाठीं या, सारे या. सुखलोलुप होऊन मातेला का तुम्ही रडत ठेवणार ? तुमच्या रक्ताचे शिंतोडे तिच्या अंगावर उडवणार ! छे. तसें होणार नाहीं व कधींहि न होवो.

बाहेरच्या जगाशीं भारताचा आज कांहीं प्रथमच संबंध आला नाहीं. प्रथम आर्य आले व येथील रहिवाश्यांशीं त्यांचे भयंकर कलह माजले. परंतु विजयी आर्यांनीं अनार्यांचें उच्चाटन केलें नाहीं. अमेरिकेंत किंवा ऑस्ट्रेलियांत गोऱ्यांनीं केलें तसें येथें झालें नाहीं. मूळच्या रहिवाश्यांचे आचारविचार, चालीरीति, दैवतें सारीं निराळीं. तरीहि आर्यांच्या समाजरचनेंत त्यांना स्थान मिळालें. आर्यांच्या समाजांत विविधता व वैचित्र्य आणून मूळ रहिवाश्यांनीं तें ऋण फेडलें.

पुढें बुद्ध काळांत भारताचा बाहेरच्या जगाशीं झपाट्यानें परिचय वाढत चालला. दळणवळण वाढत चाललें. अशा प्रकारची मैत्री कधीं कधीं विरोधापेक्षांहि गंभीर स्वरूपाची असते. नकळत दुसऱ्याच्या आहारीं आपण जात असतों. ज्या वेळेस वैर नसतें, झगडा नसतो, त्या वेळेस स्वसंरक्षणाचा विचारच मनांत नसतो. आरोग्य हें बेफिकीर असतें. दोन घास कमी काय जास्त काय. बुद्धकाळांत अशीच स्थिति झाली. हजारों लोकांशीं संबंध आले, बाहेरच्या नाना जातिजमातींशीं व्यवहार होऊं लागले. बुद्धधर्माचा लोंढा आशियाभर पसरला व परस्परविरुद्ध ध्येयें, परस्परविरुद्ध संस्था यांचा

हिंदुस्थानांत अनिरुद्ध संचार होऊं लागला. आणि समाज विस्कळित होणार असें वाटूं लागलें.

परंतु अशा त्या अंदाधुंदीच्या काळांत जरी भारत दिङ्मूढ झाला तरी एकता व सुव्यवस्था निर्मिण्याची त्याची जी अपूर्व बुद्धि, तिचा अस्त झाला नव्हता. पूर्वी घरांत जें होतें, व जें दारांत नवीन येऊन पडलें होतें, त्या दोहोंनीं भारतीय बुद्धि आपलें घर पुन्हा सजवूं लागली. त्या प्रचंड विविधतेंतून तिनें पुन्हा ध्येयैक्यता निर्माण केली व ती अधिकच दृढ केली. आज पुष्कळ लोक असा प्रश्न विचारतात कीं, "भारतीय विविधतेंत एकता कोठें आहे? परस्परविरुद्ध व परस्परांत भेद पाडणाऱ्या येथें शेंकडों संस्था व गोष्टी आहेत." अशा प्रश्नास निःशंक करणारें उत्तर देणें जरा कठीण आहे. वर्तुळ जितकें मोठें, तितकें त्याचा मध्यबिंदु शोधून काढणें कठीण जातें. हा मध्यबिंदु असें चटकन् बोट ठेवतां येणार नाहीं. त्याप्रमाणेंच हिंदु समाजांतील ऐक्य कोठें आहे हें दाखवतां येणार नाहीं. तरीपण तें ऐक्य आहे ही गोष्ट मनास पटते, हृदयास ठाऊक असते.

बुद्धधर्मानंतर तिसरा प्रसंग मुसलमानांच्या आगमनानें आला. मुसलमानांचा आमच्या समाजावर परिणाम झाला नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. मुसलमान येतांच ऐक्य निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू झाले. तडजोड, देवाण-घेवाण सुरू झाली. सलोख्याचे संबंध प्रयत्नांनीं निर्माण केले जाऊं लागले. निरनिराळे साधुसंत झाले. रामानंद, कबीर अशांसारख्यांनीं फार थोर कामगिरी केली आहे; वैष्णव साधुसंतांच्या खालच्या जातींतील अनुयायांनीं या ऐक्याच्या बाबतींत किती केलें तें काळालाच माहीत. समाजांत ज्या घडामोडी होत असतात, त्यांच्याकडे समाजांतील वरच्या वर्गाचें फारसें लक्ष नसतें. या बाबतींत हे वरिष्ठ वर्ग बेफिकीर असतात. ते जर या घडामोडी पाहतील, या घडामोडींशीं संबध ठेवतील तर आजहि अशीं स्थित्यंतरें समाजांत होत आहेत ही गोष्ट त्यांना दिसून येईल.

आणि आतां आणखी एक धर्म आला आहे. या धर्मानेंहि आपल्याबरोबर भिन्न चालीरीति, भिन्न विचार, भिन्न ध्येयें, भिन्न शिक्षणक्रम, वगैरे आणलें आहे. अशा रीतीनें हिंदुधर्म, बुद्धधर्म, इस्लामीधर्म व खिस्तीधर्म हे जगांतील चार मोठे धर्म ह्या भारतवर्षात एकत्र आले आहेत. परमथोर व परम

मंगल असें सर्व धर्मैक्य घडवून आणण्यासाठीं हिंदुस्थान ही परमेश्वरानें प्रयोगशाळा योजिली आहे. सर्वधर्मसमन्वयाची प्रयोगशाळा होणाऱ्या भारताच्या भाग्याचें वर्णन मी किती करूं ?

आपणाला एक गोष्ट विसरून चालणार नाहीं. ती गोष्ट म्हणजे बुद्ध-काळांत आपला अनेक देशांशीं संबंध आला. त्यावेळेस समाजाची घडी विस्कळित होत होती. त्या अव्यवस्थेंतूनहि जरी भारतवर्षानें एकता निर्मिली, तरी तेव्हांपासून एकप्रकारचा अतिसावधपणा आपल्या अंगीं आला आहे. आपण भित्रे बनलों आहोंत. दुसरा मला खाईल अशी भीति व धास्ती हिंदुसमाजाला सतत वाटत असते. अशी भीति प्रगतिपथांतील फार मोठी धोंड असते. असला भित्रा समाज फार हालचाल करीत नाहीं. त्याच्यावर एक प्रकारची प्रेतकळा येते. सभोंवतीं खंदक खणून त्या खंदकांत हिंदु समाज राहूं लागल्यापासून हिंदुस्थाननें स्वतःचें स्थान गमावलें. एके काळीं धर्म, शास्त्र, विद्या, कला, या बाबतींत भारत अग्रेसर होता. परंतु जगाला गुरुस्थानीं असणारा भारत त्या महनीय स्थानापासून खालीं पडला. या अधःपतनाचें मुख्य कारण म्हणजे हृदयांतील भीति. जीवनांत भीति ठाणें देऊन बसली कीं प्रगति संपली. भित्र्याला प्रबळासमोर शतवार मरणें एवढेंच काय तें उरतें.

आपल्या ह्या अति सावधपणामुळें आपलीं जलसागरावरील व ज्ञान-सागरावरील पर्यटणें थांबलीं. वास्तविक आपला धर्म खरा विश्वधर्म होता. आपला संबंध साऱ्या जगाशीं असावयाचा. परंतु तें सारें जाऊन आपण कूपमंडूक बनलों. बायका ज्याप्रमाणें जुन्याला चिकटून बसतात, काटकसर करून असेल तेवढ्यांतच सुटसुटु संसार चालवितात, तीच संवय आपणांस लागली. साहस करावें, पौरुष प्रकट करावें, प्रयोग करावे, असें आपल्या मनांत येतच नाहीं. जिज्ञासा म्हणून वृत्तीच उरली नाहीं. केवळ भेकड व बावळट होऊन आपण बसलों आहोंत. आपली संपत्ति पूर्वी व्यापारानें वाढत असे ती आज वाढत नाहीं. संपत्ति घरांत येऊन बसली. ज्ञान घरांत बसलें. ना व्यापारी धनाची वाढ, ना ज्ञानधनाची वाढ. आपण अंतर्बाह्य भिकारी झालों आहोंत. याचें कारण भीति. जीवनाला जास्त कुरवाळीत बसल्यानें जीवन नाहींसें होतें.

प्रत्येक राष्ट्र मानवजातीचा भाग आहे. मानवजातीच्या कल्याणासाठीं आपण काय केलें याचा प्रत्येक राष्ट्राला हिशेब द्यावा लागेल. या जगाच्या

२

कल्याणांत, मानवीसमाजाच्या प्रगतींत जो जेवढी भर घालील, ज्या किंमतीची घालील, त्या मानानें त्याला जगांत स्थान मिळेल. ज्या राष्ट्राची निर्माणशक्ति संपली, नवीन नवीन विचार प्रसवण्याचें सामर्थ्य संपलें, तें राष्ट्र मरणपंथास लागलें असें समजावें. अर्धांगवातानें एखादा अवयव लुला पडतो त्याप्रमाणें मानवजातीचा तो राष्ट्रावयव लुला झाला असें समजावें. कसें तरी जगण्यांत पुरुषार्थ नाहीं, प्रौढी नाहीं. झऱ्याला जिवंत रहावयाचें असेल तर सारखें नवीन पाणी स्वत:च्या हृदयांतून त्यानें जगाला दिलें पाहिजे. वृक्षाला जिवंत रहावयाचें असेल तर नवनवीन पानें, फुलें, फळें, त्याला येत राहिलीं पाहिजेत. ज्या झऱ्याचें हृदय उडत नाहीं, ज्यांतून पाणी बाहेर पडत नाहीं, तो झरा सुकला, संपला. वसंत येतांच ज्या झाडाला नवपल्लव फुटत नाहीं त्याचा अवतार संपला. त्याला तोडून चुलींत घालणें एवढेंच बाकी राहिलें. जें राष्ट्र नवीन प्रयोग करीत नाहीं, नवीन समरचमत्कार दाखवीत नाहीं, त्या राष्ट्राला मरण्याचेंच फक्त उरलें. कोण कुऱ्हाड घेऊन येतो व कधीं येतो एवढेंच पहावयाचें. “ सनातनो नित्यनूतन: ” ज्याला चिरंजीव व्हावयाचें असेल त्यानें नित्यनूतन राहिलें पाहिजे.

भारतानें सत्ता गाजविण्यासाठीं दुसऱ्यांवर कधीं स्वारी केली नाहीं. युरोपियनांचा चंचुप्रवेश होऊं नये म्हणून चीन, जपान, तिबेट आपलीं दारें लावून घेत. परन्तु हिंदुस्थानसाठीं त्यांनीं सदैव स्वागताचे हात पुढें केले. हा लुटारू नसून ज्ञानदाता तारणारा गुरु आहे असें समजून हिंदुस्थानला हे देश वंदन करीत. हिंदुस्थाननें दुसऱ्यांस गुलाम करण्यासाठीं कधीं सैन्य बाहेर पाठवलें नाहीं, तर शांतीचे, प्रेमाचे, ज्ञानाचे घडे डोक्यावर देऊन त्यानें आपले शांतिदूत जगभर पाठवले. मोटमोठीं अवाढव्य साम्राज्यें स्थापण्यापेक्षां, आपल्या संयमानें हें जें थोर वैभव व सत्कीर्ति भारतानें मिळविली, ती अपूर्व व दिव्य तर खरीच.

परन्तु तें आपलें थोर वैभव लयाला गेलें. भित्रेपणामुळें चुलीजवळ जुडी करून आपण बसलों. आणि नेमक्या अशाच वेळीं ब्रिटिश आले. त्यांच्या जोरदार लोंढ्यासमोर तर आणखीच दाणादाण उडाली. आपण आतां आंत लपत छपत जात चाललों. ते अधिकाधिक पुढें येत चालले. हा हल्ला आपण कसा परतवणार ? स्वसंरक्षणाचीं सारीं साधनें भंगलीं. आज आपण उघडे

पडलों आहोंत. दोनच गोष्टी आपणांस दिसतात. आपण एकेकाळीं किती वैभवांत होतों, आणि आज किती भणंग भिकारी बनलों !

अत:पर भ्याडपणाची वृत्ति ठेवून चालणार नाहीं. सदैव माघार घेण्यानें बचाव होत नसतो. क्षणभर माघार घेऊन पुन्हां दुप्पट जोरानें उठावें लागतें. स्वसंरक्षणाचा खरा मार्ग म्हणजे आपल्या सर्व निद्रित शक्ति जागृत करणें हा होय. स्वत:चा आत्मा जागा झाला पाहिजे. बुद्धि पेटली पाहिजे. परकीयांची नक्कल करून स्वसंरक्षण करूं पाहणें ही आत्मवंचना आहे. अशा अनुकरणांत अर्थ नाहीं. अनुकरण म्हणजे मरण. नक्कल कधींहि अस्सलाचा पराभव करूं शकणार नाहीं. आपल्या बुद्धीचा, सदभिरुचीचा जो ऱ्हास होत आहे, तो जर थांबवावयाचा असेल तर आपण स्वत:शींच सत्यानें वागूं लागलें पाहिजे. आपले आचरण खरे होऊं या. स्वत:शीं आज आपण पारखे झालों आहोंत. स्वत:ची नीट ओळख करून घेऊं या. विदेशी लोकांचे सुसंघटित थवे पाहून आपल्या सर्व शक्ति जागृत झाल्या पाहिजेत. जगाला आज आपल्या ऋषींनीं संयमाच्या बळावर मिळवलेल्या थोर फळांची फार जरूर आहे. तीं अमोल फळें परमेश्वर वायां जाऊं देणार नाहीं. म्हणून तर आज योग्य वेळ येतांच संकटांचा दूत पाठवून प्रभूनें आपणांस जागें केलें आहे.

विविधतेंत एकता पाहणें, विभिन्न सुरांत मेळ राखून दिव्य संगीत निर्माण करणें, हा हिंदुस्थानचा देवदत्त सनातन धर्म आहे. हा धर्म आपल्या रोमरोमांत भरलेला आहे. हाडींमासीं खिळलेला आहे. भेद असणें म्हणजे विरोध असणें नव्हे, वैरी होणें नव्हे. कोणी परकी दिसतांच त्याला शत्रू मानणें हें योग्य नाहीं, अशी भारतवर्षाची सनातन सांगी आहे. भारतानें त्याप्रमाणें आचरणहि ठेवलें. परक्याच्या ठायीं त्यानें शत्रुता मानली नाहीं. परक्याला दारांतून हांकलून लाविलें नाहीं. भारतमाता कोणास हांकलीत नाहीं. कोणाचा नाश करीत नाहीं, ती कोणत्याहि पंथाचा सर्वस्वी तिरस्कार करीत नाहीं. निरनिराळ्या ध्येयांतील भव्यता व दिव्यता ती पाहूं शकते. प्रत्येक ध्येयांत, प्रत्येक पंथांत कांहीं तरी संदेश असतोच व भारताला तो पाहण्याची संवय झाली आहे. निरनिराळ्या ध्येयांची एकवाक्यता करण्याशाठीं भारताची सदैव खटपट चाललेली असते.

हिंदुस्थानच्या ठिकाणीं ही अपूर्व ऐक्यवृत्ति असल्यामुळें हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन यांना आपणांपैकीं वरचढ कोण होणार या विचारानें झगडावयास नको. भारतमाता सर्वांना पोटाशीं धरील. तिच्या घरीं कोणासहि प्रतिबंध नाहीं. यामुळें आपलें हिंदुत्व जाईल असें नका समजूं. उलट वातावरण अधिक यथार्थतेनें हिंदुमय होईल. निरनिराळे अवयव भिन्न भिन्न दिसले तरी हृदय भारतीयच राहील.

ईश्वरानें हें जें विविधतेंत एकता निर्मिण्याचें दिव्य कर्म भारताला नेमून दिलें आहे तें भारतवासीयांनीं ओळखून तें जीवनांत प्रकट करण्यासाठीं झटलें पाहिजे. ज्या दिवशीं हें ध्येय प्रत्यक्ष सृष्टींत येईल, त्या दिवशीं भारताला लागलेला कलंक दूर होईल. आपली अजरामर शक्ति पुन्हां जागृत झाली असें होईल. तो थोर दिवस यावा म्हणून पुन्हां एकदां भारतमातेचें स्मरण करा. तिचें नांव घ्या. तिची मूर्ति हृदयांत ठसवा. अनेक शतकें झालीं तरी ही माता आपल्या भांडारांतून सत्यज्ञानाचें खाद्य आपल्या लेंकरांस देऊन त्यांचें संगोपन करीतच आहे. आपल्या मुलाबाळांचा सर्वनाश तिनें होऊं दिला नाहीं. आणि आज त्या मुलांमध्यें प्रेम उत्पन्न करून, त्या सर्वांना परस्परांशीं अधिक जवळ आणून, तिनें त्यांना हृदयाशीं वात्सल्यानें धरून ठेवलें आहे.

संपत्तीचा त्याग करण्यास आपण शिकलेले आहोंत. ऐहिक वैभवाचा लोभ न धरण्यास शिकलेले आहोंत. दारिद्र्य व विपत्ति यांतही सौंदर्य व वैभव पाहण्यास आपण शिकलेले आहों. आज पैशाला पोटाशीं धरून आपलीं खरीं कर्तव्यें आपण दूर लोटणार का? सेवेसाठीं त्या पैशाचा त्याग नाहीं का करणार? आपल्या मातेची सेवा करणारे खरे सत्पुत्र आपण पुन्हां नाहीं का होणार? मातेचें पडकें घर बांधण्यासाठीं पुन्हां नाहीं का उठणार? संयमी व निर्मळ होऊन, साधें जीवन गोड मानून, मातेच्या कामाला वाहून घेऊं या. आपल्या देशांत कंदमुळें खाण्यांत कमीपणा वाटत नसे. कमीपणा एकट्यानें खाण्यांत मानला जाई. वेदांतील ऋषि म्हणतो—

"केवलाघो भवति केवलादी"

जो एकटा खातो, तो केवळ पापरूप होय.

आपल्या पूर्वींच्या ह्या भव्य कल्पना, हे थोर विचार, त्यांना पुन्हां आपण हृदयाशीं नाहीं का धरणार? मी एकट्यानें खाणें हा माझ्या आत्म्याचा अपमान आहे, असें नाहीं का मला वाटणार? आपले कांहीं सुखविलास कमी करून, कांहीं ऐषआरामांस फांटा देऊन, जें वांचेल तें बंधुभगिनींच्या सेवेस आपण नाहीं का देणार? जें एके काळीं आपण सहजतेनें करीत असूं, तें आज आपणांस केवळ अशक्य व्हावें का? नाहीं. असें कधींहि होणार नाहीं.

भारतावर आजपर्यंत अनेकदां घोर आपत्ति आल्या. तरीहि भारताची प्रचंड शक्ति न डगमगतां शांतपणें काम करीत राहिली व शेवटीं विजयी झाली. ती भारतीय शक्ति आज कां लोपली? शाळांमधून आमच्या तेजोभंगाचे किती जरी पाठ देण्यांत आले, आम्ही नालायक होतों असें कितीहि जरी सांगण्यांत आलें, तरी ती अजिंक्य व अमर अशी भारतीय शक्ति मारली जाणार नाहीं. भारतमातेनें हांक मारली आहे व प्रत्येक हृदय त्या हांकेला ओ देत आहे. कळत वा न कळत आपण आपल्या मातेकडेच चाललों आहोंत.

या, सारे इकडे या. ह्या आपल्या स्वतःच्या घरांतील तो जो पवित्र नंदादीप, त्याच्यावर दृष्टि स्थिर करून, मातेचें पुन्हां एकदां नीट स्मरण करा व मग कामाला लागा.

---

# हें सारें कसें घडवून आणावयाचें

निबंध २ रा

नदी तोडते का जोडते ? आपण ह्या प्रदेश त्या प्रदेशापासून अलग केला असें नदीस वाटत असेल तर वाटूं दे. परंतु तिनें न तोडतां जोडलेंच आहे. त्या दोन भागांत दळणवळण वाढवून, व्यापार चालवून तिनें दोन्ही भाग जवळ आणले आहेत. ज्या राष्ट्रांत ऐक्य नसतें, तेथें ऐक्य निर्मिण्यासाठीं परकी सत्ता येत असते. हिंदुस्थानचें एकीकरण व्हावें म्हणून ईश्वरी इच्छेनेंच ब्रिटिश सत्ता येथें आली आहे. इंग्लंडला आवडो वा न आवडो. त्यांच्या आवडीनावडी न जुमानतां हिंदुस्थानच्या एकीकरणाचा प्रश्न सुटत जाणार, ऐक्य होत जाणार. ते तोडावयास आले असले तरी त्यांचे घाव आम्हांला जोडणार. नदीचा प्रवाह दोन प्रदेशांस न तोडतां दोन्ही भागांस समृद्ध व वैभवशाली करणार.

एका जातीच्या लोकांचें सारें वाटोळें करून दुसऱ्या जातीचा कायमचा उत्कर्ष झाला आहे असें इतिहास सांगत नाहीं. जेथें सर्वांच्या विकासास संधि व वाव आहे तेथेंच ऐक्याची शक्ति असते. या ऐक्यशक्तिलाच धर्म असें आपण नांव देतों. जेथें परस्परांतील स्नेहभाव सुकून गेला आहे तेथें धर्महि मेलेला आहे, असें निःशंक समजावें. आणि असा हा थोर धर्म जेथें मेलेला आहे तेथें लोक तरी कोठून जिवंत राहणार ?

## धर्म एव हतो हन्ति

तुम्ही धर्माला मारलेंत कीं तोहि तुम्हांला मारतो. धर्म एकटा मरत नाहीं. मारणाऱ्यास बरोबर घेऊन तो मरतो. ब्रिटिश लोक साम्राज्यामुळें आज वैभवास चढले आहेत. परंतु हिंदुस्थानला मान म्हणून वर करूं द्यायची नाहीं असेंच धोरण जर दुर्दैवानें ब्रिटिश चालवतील, तर त्यांचाहि मोठेपणा मातींत मिळाल्याशिवाय राहणार नाहीं. हिंदुस्थानला उपाशी, दीनदरिद्री, निःशस्त्र, दुबळा असा करणें यांत ब्रिटिशसाम्राज्याचाहि नाश आहे.

अंतःकरणांत जेव्हां लोभाचें राज्य असतें, स्वार्थापलीकडे जेव्हां कांहीं दिसतच नाहीं, तेव्हां फारच थोड्यांना राजकारणाचा विशाल दृष्टि ठेवून

विचार करतां येतो. जर एखाद्या लोभी सरकारनें हिंदुस्थानला कायमचें गुलाम करून ठेवण्याचें ठरविलें तर तें ध्येय दूर राहून उलट हिंदुस्थान कायमचा त्यांच्या हातांतून निसटून जाण्याचाच संभव अधिक. कायमचा संबंध जोडणें ही गोष्ट निसर्गाच्या विरुद्ध आहे. सत्तीचा संबंध कायमचा असूं शकत नाहीं. बाह्यसंबंध तात्कालिक असतात. वृक्षाला सुद्धां शेवटीं फळाचा त्याग करावा लागतो. तें पिकलेलें फळ झाडाला चिकटवून ठेवण्याचा जर कोणी कृत्रिम उपाय योजील तर तें फळ पडलें असतें त्यांपेक्षांहि अधिक लौकर गळून पडेल.

ताब्यांतील देश दुबळा करणें, त्या देशांतील लोकांत सदैव दुही ठेवणें, त्या देशांतील लोकांच्या नैसर्गिक शक्तींच्या विकासास अवकाश न देतां, त्यांची वाढ होऊं न देतां, त्या मारून टाकणें आणि अशा शेंकडों प्रकारांनीं तो देश केवळ मृतवत् व पंगू करून ठेवणें, परावलंबी करणें—ही इंग्लंडची आजची राज्यपद्धति आहे. आज इंग्लंडच्या वाङ्मयांत जगाला डोलवील असें वाङ्मय निर्माण होत नाहीं. तेथें कांटेरी राजकारणाचें रान मात्र भरमसाट वाढत आहे. इंग्लंडच्या हृदयांत दुसऱ्याच्या दुःखानें कारुण्याचे झरे आज फुटत नाहींत. पददलित व अभागी लोकांसाठीं त्यांच्या हृदयांत सहानुभूतीचा लवलेश नाहीं. दुसऱ्यावर सत्ता गाजविणें हीच आज त्यांची मोठेपणाची कल्पना आहे. दुसऱ्याला गुलाम करण्यांत त्यांना पुरुषार्थ वाटत आहे. साहसाच्या गोष्टी दूर राहून, स्वार्थाच्या व लुटालुटीच्या गोष्टींतच त्यांचें सारें शौर्य, धैर्य काम करून राहिलें आहे. धर्मास त्यांनीं हद्दपार केलें आहे. केवळ स्वतःच्या स्वार्थाला देशभक्ति हें बडें नांव त्यांनीं दिलें आहे. आजचें इंग्लंड हें असें आहे.

इंग्लंडचें हें जें वास्तविक स्वरूप, त्यामुळें हिंदी जनतेचा फायदा होणार कीं नुकसान ? संकटांत सर्वांत अधिक आवश्यकता जर कशाची असेल तर ती सत्यदृष्टीची. सत्यदर्शन झाल्याशिवाय राष्ट्राला आशा नाहीं. जें आपण स्वतःच्या प्रयत्नांनीं मिळवलें पाहिजे, तें अर्जविनंत्या करून मिळणार नाहीं. जेथें अखंड सेवेनेंच यश येईल, तेथें शब्द खर्च करणें म्हणजे मूर्खपणा आहे. हें कठोर सत्य पुनःपुनः संकटें व कष्ट पाठवून तो परमात्मा आपणां हिंदी जनांस शिकवूं पहात आहे. प्रयत्न व अखंड सेवा—हीं दोन साधीं

सत्यें जोंपर्यंत आपणांस कळत नाहींत, कळून जीवनांत उतरत नाहींत, तोंपर्यंत दुःखापाठीमागून दुःख आपणांवर कोसळत राहील. अपमानापाठीमागून अपमान आपणांस सहन करावे लागतील.

आपल्या वाढत्या ऐक्यावर परकी सरकार भीतीनें, संशयानें वा अन्य कारणानें जर घाव घालूं लागलें, त्या ऐक्याच्या बाबतींत मुद्दाम अडचणी आणूं लागलें तर त्याविरुद्ध आपण आरडाओरड करणें हें फारच वाईट आहे. आरडाओरडीनें काम तर होत नाहीं उलट अधिक बिघडतें. "ब्रिटिशांच्या साम्राज्यांत राहण्यांतच आम्हांस कृतकृत्यता वाटेल" असें तुम्ही कितीहि गोडगोड शब्दांत इंग्रजांस सांगितलें म्हणून का त्या शब्दांवर ते विश्वास ठेवतील ? ते का इतके दुधखुळे आहेत ? कितीहि गोड व कुशल शब्दरचना करा. त्या गोष्टीवर इंग्रजाचा विश्वास बसणार नाहीं. आज ना उद्यां तुम्ही स्वतंत्र होऊं पाहणार ही गोष्ट तो पूर्णपणें जाणून आहे. परन्तु आपणांस ही स्वातंत्र्याची तहान कितीहि लागली असली तरी ही गोष्ट स्पष्ट आहे कीं जोंपर्यंत हिंदुस्थानांत अस्तित्वांत असणाऱ्या शेंकडों जाति व पंथ, नानाधर्म व नाना परस्परविरुद्ध गोष्टी यांच्यामध्यें मेळ निर्माण करतां येत नाहीं, जोंपर्यंत या सर्वांत आपणांस खरें आंतरिक जिव्हाळ्याचें ऐक्य निर्मितां येत नाहीं, तोंपर्यंत ब्रिटिशांच्या संबंधाची आपणांस जरूर आहे. ऐक्य निर्माण झाल्यावर त्या संबंधाची आपणांस जरूर नाहीं.

अशी वस्तुस्थिति असल्यामुळें स्वार्थी इंग्रजांना जर असें वाटलें कीं हें ऐक्यच होऊं द्यावयाचें नाहीं, हें ऐक्य रुजूं द्यायचें नाहीं, वाढूं द्यायचें नाहीं, तर आपण काय करणार ? स्वतःचें आसन अचल राखण्यासाठीं स्वतःची जरूरी तुम्हां आम्हांस सदैव भासविण्यासाठीं इंग्रज आपणांस एकमेकांशीं भांडावयास लावील, आपणांत स्पर्धा लावून दुही राखील. इंग्रज हें करणारच. लांकुडतोड्या कुऱ्हाड पाजळून झाडावर घाव घालूं लागतांच जर तें झाड गयावयां करून म्हणूं लागलें "नको रे घाव घालूं. माझी फांदी तुटेल"—तर तो लांकुडतोड्या काय म्हणेल ? तो म्हणेल "मला माहीत आहे तुझी ती फांदी तुटेल. परन्तु त्यासाठींच तर मी उभा आहें. तेंच माझें काम." त्या लांकुडतोड्याकडे शिष्टमण्डळें नेऊन झाडांनीं चर्चा करीत बसण्यांत कांहीं अर्थ आहे का ?

आपणांला वाटतें कीं इंग्रजाजवळ वादविवाद करून त्याला पटवून दिलें म्हणजे झालें काम ! तिकडे ते पार्लमेंटमध्यें वादविवाद करितात हें आपण इकडे इतिहासांत शिकतों, वर्तमानपत्रांत वाचतों. त्यांच्याकडे एक पक्ष दुसऱ्याला उत्तर देतो. विजयी पक्षास आनंद होतो. तिकडच्या अशा गोष्टी वाचून आपणांसहि वाटतें कीं वादविवादांतील जय म्हणजेच खरा जय. परन्तु त्यांच्यामधील व आपल्यामधील फरक आपण विसरतों. इंग्लंडमध्यें ते पक्ष एकाच शरीराचे डावे उजवे भाग असतात. एकच शक्ति त्या दोन्ही पक्षांस पोषीत असते. तसा प्रकार येथें आहे का ? सरकारची येथील सत्ता व आपली सत्ता एकाच उगमापासून उत्पन्न झालेल्या आहेत का ? तेंच झाड हलवल्यानें आपणां दोघांस तींच फळें मिळतात का ? या प्रश्नाचें उत्तर देण्यासाठीं मिल् काय म्हणतो, स्पेन्सर काय म्हणतो, सीलीनें काय लिहिलें आहे, मोर्लेचें काय मत आहे हें नका पाहूं. तीं क्रमिक पुस्तकें, परक्यांनीं लिहिलेलीं तीं पुस्तकें दूर ठेवा. राष्ट्राचें पुस्तक डोळ्यासमोर उघडें आहे व खरें उत्तर तेथें लिहिलेलें आहे.

थोडक्यांत सार म्हणजे असें कीं राजा बोलतो व दळ हालतें. धनी सांगतो तसा सूर लागतो. आपण कांहीं धनी नाहीं. परंतु वादविवादाचीच ज्याला हौस, त्याचें एवढ्यानें समाधान होणार नाहीं. “ आपण इतके कोटी रुपये कर देतों. आपल्याच पैशावर सरकार चालतें. आपण आपल्या पैशांचा हिशेब नको का मागायला ” वगैरे तो बोलतच राहतो. परंतु या आपल्या देशांत सरकारजवळ हिशेब मागणें म्हणजे आपल्या धन्याचीं पोरें लठ्ठ करण्यासाठीं गाय जें दूध देते त्या दुधाचा हिशेब शिंगें उगारून तिनें मागण्याप्रमाणें आहे. गाय कां बरें असा हिशेब मागत नाहीं ? आणि जर ती विचारील तर काय बरें होईल ?

परिस्थितीप्रमाणें कार्यपद्धतीहि बदलते. हें साधें सत्य आहे. तें सिद्ध करावयास नको. इंग्लंडच्या मुख्य प्रधानाला फ्रेंचांकडून जर कांहीं सवलती मिळवावयाच्या असतील, तर तो फ्रेंच सरकारजवळ वादविवाद नाहीं करणार, किंवा श्रेष्ठ नीतीवर प्रवचनें नाहीं देणार. तो कांहींतरी मुत्सद्देगिरीचा डाव टाकील. हे डाव कसे व केव्हां टाकावे यासाठीं मोठमोठे मुत्सद्दी सारखें काम करीत असतात. ज्यावेळेस इंग्लंडची व जर्मनीची दोस्ती होती, त्यावेळेची

अशी एक गोष्ट सांगतात कीं एकदां मेजवानी चालली असतां कैसरला हातरुमाल देण्यासाठीं एक मोठा ड्यूक स्वतः उठला! परंतु हातरुमाल देण्यानें त्याचा पुढें पुष्कळ फायदा झाला. एक काळ असा होता कीं मोंगलांच्या दरबारांत इंग्रजांना मुजरा करावा लागे. महिनामहिना तिष्ठत बसावें लागे. राजाच्या दरबारांतील मातबर लोकांस खूष ठेवण्यासाठीं पैसा खर्चावा लागे व खस्ता खाव्या लागत. ज्यावेळेस विरुद्ध असणाऱ्या, नाराज असणाऱ्या लोकांकडून कांहीं सवलती मिळवून घ्यावयाच्या असतात, त्यावेळेस अशा गोष्टी कराव्याच लागतील. हें सारें अपरिहार्य आहे. हें सारें परिस्थितीवर अवलंबून असतें.

परंतु आपल्या या दुबळ्या व आशाळभूत देशाला अजून असें वाटून राहिलें आहे कीं सनदशीर चळवळ करून हें सत्ताधीश सरकार वठणीवर आणतां येईल! हें सरकार आपल्या मागण्या मान्य करील. घुसळीत राहिल्यानें दुधापासून लोणी निघतें हें खरें. परंतु दूध डेअरींत असेल व घुसळण घरीं रिकाम्या डेऱ्यांत चाललें असेल तर लोणी कसें निघणार? "आपण भीक थोडीच मागतों, आपले रास्त हक्कच मागतों" असें कोणी कोणी म्हणतात. तें त्यांचें म्हणणें क्षणभर जरी गृहित धरलें, तरी ज्यावेळेस आपल्या हक्कांना आपण मुरड घालूं लागतों, सध्यां इतकेंच द्या, असें म्हणूं लागतों, तेव्हां सत्ताधीशांपासून आपण भीक मागतों ही गोष्ट जगाला व स्वतःलाहि कळल्याशिवाय राहत नाहीं. आपलें सरकार म्हणजे कांहीं यंत्र नाहीं. रक्तमांसाच्या जिवंत माणसांचा तो एक संघ आहे. त्या संघाच्या नसानसांतून रक्त नाचत आहे. या संघातील लोकांजवळ स्वार्थ, लोभ नसून ते संत आहेत असें समजूं नका. त्यांना त्यांचें पोट आहे, सुखलालसा आहे, सत्तेची आवड आहे. त्यांची चूक दाखविल्यानें ते सुधारतील अशी कल्पना करण्यांत अर्थ नाहीं.

आपली परिस्थिति कशी आहे, आपणांस मिळवायचें काय, त्याचे उपाय कोणते, कार्यपद्धति कशी असावी, इत्यादि गोष्टींचा आपण कधीं स्वच्छ विचारच करीत नाहीं. जय मिळवणें हें जसें लढाईचें ध्येय त्याप्रमाणें आपला हेतु सिद्धीस नेणें हें राजकारणाचें ध्येय असतें. आज आपल्या राजकीय संस्था केवळ वादविवादोत्तेजक संस्था झाल्या आहेत. जणुं सरकार

म्हणजे एक विरुद्ध मताचा विद्यार्थी व वादविवादांत त्याचा पराजय केला कीं झालें काम ! परन्तु शास्त्रीय चिकित्सा व तदनुसार उपचार चालू ठेवूनहि माणसें ज्याप्रमाणें मरतात, त्याप्रमाणें उत्कृष्ट वादविवादकुशलता व अप्रतिम वक्तृत्व आपणांजवळ असूनहि इच्छित फळ मात्र आपल्या पदरांत अजून पडत नाहीं.

सरकार आमच्यासाठीं काय करीत आहे व काय करीत नाहीं याची मी तरी फारशी उठाठेव करीत नसतों. ह्या गोष्टीला मी महत्त्व देत नाहीं. मेघांचा गडगडाट व विजांचा चमचमाट सुरू होतांच जर आपण पदोपदीं घाबरूं लागलों तर तो मूर्खपणा होईल. पहिली गोष्ट म्हणजे गडगडाट व चमचमाट होऊन वीज पडतेच असें नाहीं; आणि दुसरी गोष्ट म्हणजे विजेचे गोळे तयार करून फेंकण्याचा जो कारखाना आहे तेथें आपली सल्लामसलत घेण्यांत येत नाहीं, तिला तेथें किंमत नाहीं; किंवा आपल्या प्रार्थनांमुळें वा हात जोडल्यानें तो पडणारा विजेचा गोळा थांबणार आहे किंवा त्याची दिशा बदलणार आहे असेंहि नाहीं. त्या येणाऱ्या विजेच्या गोळ्याची दिशा बदलावयाचीच असेल तर दुबळेपणानें आरडाओरड करून तें होणार नाहीं. त्यासाठीं योग्य अशीं शास्त्रीय उपकरणें व साधनें वापरावीं लागतील. विद्युच्चुंबक हा कांहीं आकाशांतून मिळत नाहीं. तो शांतपणें, श्रमपूर्वक येथें पृथ्वीवर कुशलतेनें तयार करावा लागतो व मग त्या कडकडणाऱ्या, प्राण घेणाऱ्या विजेच्या गोळ्याची दिशा बदलतां येते.

सृष्टीच्या नियमाविरुद्ध आदळआपट केल्यानें कांहीं एक होत नाहीं. पतंग जर म्हणूं लागला "मी प्रेमानें ज्योतीजवळ जातों, परंतु ती मला जाळते. कोण ही विषमता," तर त्याचें कोण ऐकणार ? त्यानें समानतेचा, विषमतेचा वाद सोडून तेजापासून दोन पावलें दूर राहावें हेंच बरें. कांहीं झालें तरी हिंदुस्थानवरची आपली पकड सैल होऊं द्यावयाची नाहीं असें इंग्रजानें निश्चित ठरविलें आहे. ज्या ज्या वेळेस पोलादी चौकट जरा ढिली झाली आहे असें त्याला वाटतें, त्या त्या वेळेस चारदोन खिळे मजबूत ठोकून तो ती चौकट पुनः घट्ट करून ठेवतो. हिंदी लोक झक्क वादविवाद करतात, सुंदर इंग्रजी बोलतात, एवढ्यानें विदेशी मनुष्य भाळणार नाहीं व सत्ता सोडणार नाहीं. तो सदैव ठाकठोक करीत राहणार, आपली सत्ता मजबूत

ठेवणार. आपण कांहीं केलें वा न केलें तरी उगीच आदळआपट करणें हें तर फारच वाईट. दुर्बलाच्या रागाचें जगांत हंसें होत असतें, एवढेंहि आपणांस समजूं नये का ?

इंग्रजाच्या दृष्टीनें आपण किती क्षुद्र आहोंत ही गोष्ट आपण विसरूं नये. तो किती उंचीवरून आपणांकडे बघतो हें ध्यानांत घ्यावें. इंग्रज मनुष्य अफाट राजकीय रंगणाच्या एका कोंपऱ्यांतून आपणांवर राज्य करतो. युरोप व निरनिराळ्या वसाहती यांच्या प्रक्षुब्ध सागरांतून आपली साम्राज्यनौका सुरक्षितपणें कशी हांकलून न्यावयाची यांतच त्याचें सारें लक्ष असतें. हिंदी जनतेचे फूत्कार व बुभू:कार, हिंदी जनतेचें टामटोम, यांचा त्याच्यावर काडीइतकाहि परिणाम होत नाहीं. पार्लमेंटांत ज्या ज्या वेळेस हिंदुस्थानासंबंधींचा वादविवाद निघतो, तेव्हां सभासद झोंपी जातात वा उठून जातात; नाहींतर हजरच राहत नाहींत.

इंग्रज येथें येतो तो हिंदुस्थानावर प्रेम करण्यासाठीं नाहीं. हिंदुस्थानांतून तो जेव्हां परत जातो, तेव्हां या देशाबद्दलच्या प्रेमाच्या व कृतज्ञतेच्या भावना बरोबर घेऊन तो जाणार नाहीं. त्याला येथील आठवणहि पुन्हां होणार नाहीं. येथें असेपर्यंत कसें तरी तो काम करतो. फर्लो रजा केव्हां मिळेल इकडे त्याचें सारें लक्ष असतें. त्याला येथें करमणूक हवी असली तरी तो येथील गोऱ्यांकडेच पाहील. त्याचें येथील भाषांवर प्रेम नसतें. गव्हर्मेंट गॅझेटमधून देशी भाषांतील ज्या उताऱ्यांचें भाषांतर येतें तेवढाच आपल्या वाङ्मयांतील विचारांशीं व आकांक्षांशीं त्याचा परिचय. त्याच्या हृदयांत आपणांला किती अल्प जागा आहे हें पाहिलें म्हणजे त्यानें दाखवलेल्या दुष्टपणाबद्दल, केलेल्या अन्यायांबद्दल, आपणांस सखेद आश्चर्य वाटणार नाहीं. आडांतच नाहीं तर पोहऱ्यांत कोठून येणार ? हृदयांतच नाहीं तें बाहेर कृतींत कसें दिसणार ? जेव्हां आपण त्याच्यावर रागावतों, आपलें दुःख त्याच्यासमोर ओकतों, तेव्हां त्याला अतिशयोक्ति वाटते, तो चिडतो व "तुमच्यासाठीं आणखी काय करायचें बुवा" असें विचारतो व सारें हंसण्यावारी नेतो.

मला इंग्रजाविरुद्ध दोषांची यादी करावयाची आहे, असें नाहीं. फक्त वस्तुस्थिति काय आहे व कशी असणारच हें मी सांगून राहिलों आहें. अगदीं क्षुद्र असे जे दुबळे लोक, त्या क्षुद्रांचीं दुःखें कितीहि हृदय पिळवटणारीं

अनुक्रम

असलीं, त्या क्षुद्रांचें कितीहि नुकसान होत असलें, त्यांच्या किंकाळ्या कितीहि करुणाजनक असल्या तरी त्या दुःखांची कल्पना सुखाच्या व सत्तेच्या स्वर्गांत राहणाऱ्याला कशी येणार ? इंग्रज मनुष्य किती थोडा, आपण कोठले कोण, कोण्या झाडाचा पाला ! इंग्रजाची ही अशी दृष्टि असल्यामुळें आपणांस जें फार महत्त्वाचें वाटतें तें त्याला विचारांतहि घ्यावें असें वाटत नाहीं. वंगभंग होऊं नये म्हणून आपण कितीहि ओरडलों, डोळे लाल केले, तरी इंग्रजास त्याचें काय होय ? प्रश्न कोणताहि असो आपण ज्या मानानें आरडाओरड करतों त्या मानानें फळ मिळत नाहीं. म्हणून आपण चकित होतों. परंतु इंग्रज हा परका आहे. त्याचें सुखदुःख व आपलें सुखःदुख हीं निराळीं आहेत. ही गोष्ट आपण विसरतों. ज्या उंच आसनावर इंग्रज बसला आहे तेथें जर क्षणभर आपणास जातां आलें तर आपण किती खालीं दूर दरींत पडलों आहोंत तें दिसून येईल. त्याला त्या ठिकाणाहून आपण कीडमुंगीप्रमाणें दिसत असूं.

लॉर्ड कर्झन किती उंच बसलेला ! त्याला तेथून आपण हिंदी लोक असेच अगदीं लहान दिसतों. ३३ कोटी लोकांना आमच्या साम्राज्यांत बुडून जावें असें कां वाटत नाहीं, असा त्यानें एकदां आश्चर्यानें प्रश्न केला होता. ३३ कोट लोक म्हणजे एक क्षुद्र बिंदु, एक बारीकसा जणुं ठिपका. ब्रिटिश साम्राज्यांत मिळून जाणें म्हणजे केवढी मोठी गोष्ट ! परंतु हिंदी लोक तयार होत नाहींत. हिंदी लोकांस अक्कलच नाहीं ! कर्झनच्या कुरेबाजीचा विचार तरी करा. वसाहतीचा दर्जा हिंदुस्थानास द्यावयाचा. ज्या वसाहतींचें साम्राज्यरूप आलिंगन मिळावें म्हणून ब्रिटिश मनुष्य झुरत असतो, ज्या वसाहतींच्या दारांत जाऊन त्यांचीं हृदयें वश करून घेण्यासाठीं गोड गाणीं गातो, त्यांची मर्जी खप्पा होऊं नये, म्हणून इंग्लंडमधील भाकरीहि महाग करावयास तयार होतो, त्या वसाहतींचा दर्जा हिंदुस्थानास मिळेल का ? कर्झनसाहेब सत्यार्थानें बोलत होते का ?

कर्झन साहेबांच्या मनांत कांहींहि असो. जेथें सिंह, वाघ मेजवानीस जमले आहेत, तेथें शेळीला आमंत्रण असलें तरी तिची जी मनःस्थिति होईल, तीच ब्रिटिश साम्राज्यांत मिळून जा असें ऐकतांच आमची होते. ब्रिटिश साम्राज्यांत द. आफ्रिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया यांनीं असणें निराळें व हिंदु-

स्थाननें असणें निराळें. एकाच घरांत पितापुत्र व त्यांचे नोकर राहतात. परंतु पितापुत्रांचें राहणें निराळें, नोकरांचें राहणें निराळें, हिंदी लोकांनीं ब्रि. साम्राज्यांत राहावयाचें याचा अर्थ इतकाच कीं, जर आफ्रिकेच्या उष्ण प्रदेशांत शेती करावयाची असेल, पडीत जमीन लागवडीस आणायची असेल तर हिंदुस्थाननें मुदतबंदीचे स्वस्त मजूर पुरविले पाहिजेत. गरीब लोकांच्या विरुद्ध तिबेटवर स्वारी करायची असेल तर आम्ही पैसे व सैन्य पुरवलें पाहिजे. जुलमानें त्रस्त झालेल्या सोमालीलँडमधील जनतेनें जर बंड केलें, तर तें बंड मोडण्यासाठीं आम्ही तेथें जाऊन मेलें पाहिजे. मोठ्यांचा व छोट्यांचा हा असा प्रेमसंबंध असतो. परंतु हें असें चालावयाचेंच. सृष्टीचा हा भीषण कायदाच आहे. त्यामुळें डोळे लाल करण्यांत वा ओले करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आपण जें जें करूं त्यांत वरील गोष्ट लक्षांत ठेवलेली असावी म्हणजे पुरे.

उच्च नैतिक भूमिकेवर उभें राहून आपण जर इंग्रजांस म्हणूं "अहो जरा माणुसकी तरी दाखवा"—तर इंग्रज आपणांस म्हणेल "तुझा उपदेश आम्ही मागून ऐकूं. परन्तु सध्यां आम्ही ज्या भूमिकेवर आहोंत, त्या भूमिकेवर तूं प्रथम ये. आम्ही आमच्या देशाचें हित तरी पहात आहोंत. परंतु तूं तुझ्या देशाचें तरी हित आधीं पहातोस का ? तूं स्वार्थ बाजूस ठेवून स्वतःच्या देशाचें कल्याण तरी आधीं करशील काय ? स्वतःच्या देशासाठीं प्राण देशील काय ? प्राण देणें दूर राहो पण थोडा सुखोपभोग कमी करून दोन पैशांची मदत देशासाठीं करशील काय ? एवढेंहि तूं तुझ्या देशासाठीं करावयास तयार नसशील तर तुझ्यासाठीं सारें आम्ही परक्यांनीं कां करावयाचें ? आम्ही स्वतःच्या देशाचें तरी हित पाहतों. तूं तेंहि करीत नाहींस. आम्हांला उपदेश करण्याचा आव मात्र आणतोस ! स्वतःच्या देशाचें हित पाहणें एवढी तरी माणुसकी आमच्याजवळ आहे. तुझ्याजवळ तीहि नाहीं." असा टोमणा जर इंग्रजानें मारला तर वर तोंड काढण्यास आपणांस जागा आहे का ? आपण स्वदेशासाठीं काय करतों, काय देतों ? स्वतःच्या देशाचा परिचयहि आपण करून घेतला नाहीं. आपल्या देशाचा इतिहास आपणांस माहीत नाहीं. आपण पराकाष्ठेचे आळशी आहोंत. आपल्या आळशीपणास तुलना नाहीं. परके येऊन आमचे इतिहास लिहितात व त्यांचीं भाषांतरें

करून आम्ही शिकतों–शिकवितों. परका येऊन आमच्या भाषांचीं व्याकरणें लिहितो व तीं आम्ही आमच्या डोक्यांत कोंबतों. माझ्या शेजारीं काय आहे हें जाणून घेण्यासाठीं हंटरसाहेबांचे ग्रंथ मला पहावे लागतात. आपणांस माहिती नाहीं, ज्ञान नाहीं. ज्ञानासाठीं जीवन देणार नाहीं. मनुष्य जातीबद्दल, व्यापाराबद्दल, शेतकीबद्दल, शिक्षणाबद्दल कसलेंहि ज्ञान आपणांस नाहीं. आपण ऐदी, खुशालचेंडू व उदासीन आहोंत. आणि असे आळशी, कर्मशून्य लोक जेव्हां इंग्रजाला "तूं आमच्या देशासाठीं अमुक कर, तमुक कर" असें सांगूं लागतात तेव्हां त्याला त्यांच्या निर्लज्जपणाची कमाल वाटते. आपल्या पोकळ वाक्पांडित्याचा व दुबळ्या रागाचा इंग्रजावर काडीइतकाहि परिणाम होत नाहीं. सरकार रुपयांत पै इतकेंतरी हिंदुस्थानासाठीं मनापासून नसलें तरी लोकलज्जेस्तव करतें. परंतु आपण तर कांहींच करीत नाहीं. सरकार बोलूनचालून परकी. परन्तु आपण स्वदेशाशीं परक्याहून परकी झालों आहोंत. इंग्रज लोक स्वतःच्या देशाचें पूर्ण हित पाहतात व रुपयांत पै हिंदुस्थानचें पाहतात. परन्तु आपण स्वदेशाबद्दल केवळ बेफिकीर आहोंत. आपण कृतघ्न आहोंत. इंग्रजांना हिंदी लोकांबद्दल कां आदर वाटावा? त्यांनीं आमच्याशीं कां सहकार्य करावें? म्हणून शेवटीं असा देखावा दिसतो कीं एका बाजूला रागारागाच्या, आवेशाच्या सभा व घसा बसेपर्यन्त भाषणें, आणि दुसऱ्या दिवशींच अत्यंत अपमानास्पद अशा गोष्टी मुकाट्यानें गिळून बसणें. कितीहि कडू असो गोळी आपण गिळून बसतों. नाक दाबण्याचीहि जरूर नाहीं.

मी अगदीं साधीं साधीं सत्यें सांगून राहिलों आहें, असा माझ्यावर कोणी आरोप करतील. "आपणच आपले वैरी आहोंत. आपणच आपले मित्र आहोंत. आपण आपली लाज राखली पाहिजे, स्वतःची घाण दूर केली पाहिजे" इत्यादि जें मी सांगून राहिलों आहें तें खरोखरीच नवीन नाहीं. "तुम्ही नवीन काय सांगितलें? त्याच सनातन गोष्टी तुम्ही सांगत आहांत" असें मला कोणी म्हटलें तर त्यांत माझा जयच आहे. मला अशा म्हणण्याची मुळींच भीति वाटत नाहीं. भीति वाटत आहे ती अशी कीं "हें काय तुम्ही नवीन कांहींतरी सांगतां" असें कोणी मला म्हणतो कीं काय? कारण स्वतःसिद्ध सत्यालाहि सिद्ध करीत बसावें लागणार असेल तर तें

मला अशक्य आहे. साधीं सरळ सत्यैंहि जर आपणांस दुर्बोध वाटूं लागलीं तर मात्र फारच कठीण प्रसंग आला म्हणावयाचा.

तें कांहीं असो. पद्मा नदीच्या विशाल व विस्तीर्ण तीरावर रात्रीच्या रात्री भटकण्यांत मला मौज वाटत असे. काळोखांत जमीन व पाणी एकरूपच कशीं दिसतात, अगदीं सरळ रस्ते घोटाळ्याचे कसे वाटतात व आपण कसे चुकतों याचा मला त्यावेळीं अनुभव येत असे. आणि उजाडतांच आपण असे कसे रात्रीं गोंधळलों याचें आश्चर्य वाटे. आपल्या राष्ट्रास हाच अनुभव येईल. सरळ साधा रस्ताहि आज अंधारांत घोंटाळ्याचा वाटत आहे. परंतु आपल्या राष्ट्राची भाग्यप्रभा येतांच आपणांस खरा पंथ दिसेल आणि चुकलेलीं पावलें आपण सुधारूं या आशेनें मी जगत आहें.

शिवाय आपण सारेच अंधारांत आहोंत असें नाहीं. कितीतरी उत्साही व त्यागी तरूण माझ्या परिचयाचे आहेत. देशदेवाच्या सेवेंत शब्दापेक्षां कांहीं तरी अधिक देण्यास ते तयार आहेत. परंतु काय करावयाचें तें त्यांना समजत नाहीं. दिशा कोण दाखवील, कामासंबंधीचा सल्ला कोणाला विचारावा हें त्यांना कळत नाहीं. सेवा कोणती करावयाची, कोणाची करावयाची, हें दाखवणारा मार्गदर्शक गुरु त्यांना भेटत नाहीं. कोणती तरी पद्धति डोळ्यासमोर असल्याशिवाय, कांहीं संघटना असल्याशिवाय, स्वतः एकाकी कसें तरी धडपडत राहणें, यांत अनाठायीं श्रम होतो, अनाठायीं त्याग होतो.

फुकट जाणारा त्याग काय कामाचा? त्याग ही एक पवित्र वस्तु आहे. त्याग कसा तरी कचऱ्याप्रमाणें फेंकून द्यायचा नाहीं. त्यागांतून कांहीं तरी निर्माण झालें पाहिजे. त्याग कोणत्यातरी कर्माच्याद्वारा अंकुरित झाला पाहिजे. अशावेळेस मध्यवर्ती आश्रमासारख्या संस्थेची अत्यंत आवश्यकता असते. त्या मध्यवर्ती शक्तिभोंवतीं सर्वांचें एकीकरण झालें पाहिजे. तेथें विचारवंत विचार देतील, श्रम करणारे श्रम करतील, उदारांच्या देणग्या तेथें येतील. शिक्षण, वाङ्मय, कला, उद्योगधंदे–आपल्या कल्याणाचीं सारीं कार्यें त्या मुख्य केन्द्राभोंवतीं उभीं राहतील. आणि जें रामराज्य निर्माण करण्यासाठीं देशभक्त झटत आहेत, तें सर्वांचें समृद्ध असें रामराज्य निर्माण होण्यास त्या केंद्रांतून मदत होईल.

परकीयांकडून परमेश्वर आपणांस तडाखे देववीत आहे. त्यांत परमेश्वराचा

हेतु आहे. कोठेंतरी शक्तिस्थान निर्माण व्हावें असा त्यांत निःसंशय हेतु आहे. त्या शक्तिकेंद्राकडे आपलीं तोंडें वळावीं, त्या तेजाकडे आपले पाय वळावे, यासाठीं आपले सारे अर्ज फेटाळण्यांत येत आहेत. अशा प्रकारचें शक्तिकेन्द्र उत्पन्न व्हावें अशी उत्कंठा सर्वांना वाटत आहे. आपण निराशेनें सरकारवर टीका करून राहिलों आहोंत. परंतु या निराशेंतूनच आपलें शक्तिकेंद्र निर्माण होणार आहे. अंधार उषेला जन्म देतो. त्याप्रमाणें ही निराशा आशेच्या उषेला, स्वावलंबनाच्या सूर्याला जन्म देईल, अशी मला श्रद्धा आहे. निराशेचा मी तरी हाच अर्थ करतों.

आपणांला जर असें केंद्र स्थापतां आलें तर मग आपण आपले सारे विचार, सार्‍या योजना त्या केंद्रांतील मंडळीसमोर मांडूं. आपल्या विचारांना तेथें कांहीं तरी स्थिर अर्थ प्राप्त होईल. वार्‍याप्रमाणें भटकणार्‍या विचारांस स्थिरता आली म्हणजे कार्यास सुरवात होईल. या शक्तिकेंद्रासाठीं आपण आपलें सर्वस्व देऊं. आपला उत्साह तेथें ओतूं. आपलें आयुष्य तेथें वेंचू. आपल्या बुद्धीला तेथें पूर्ण वाव मिळेल, घोटाळे दूर होऊन मार्गदर्शन घडेल, त्यागाची शक्ति जागृत होईल, आपल्यांतील सर्व थोर व उदात्त भावना उचंबळून येतील. ज्याच्यासाठीं जगावें व ज्याच्यासाठीं मरावें असें कांहीं तरी डोळ्यासमोर असलें पाहिजे. असें ध्येय डोळ्यासमोर दिसलें कीं तरुण लोक जीवनें द्यावयास पुढें येतील. कार्याची दिशा दाखवणारें असें केंद्र निर्माण होऊं द्या.

असें केंद्र निर्माण झालें म्हणजे त्याचेद्वारा शिक्षण, कला, व्यापार, उद्योगधंदे, सर्वांची प्रभा फांकूं लागेल. संसारांतील विविध अंगांना झपाट्यानें चालना मिळेल. आपण उठल्याबसल्या मग वक्त्यांच्या पाठोपाठ धांवणार नाहीं. सरकारनें जरा कोठें अन्याय केला कीं निषेधाची सभा घ्यायची, तेथें कोणा वक्त्याला आणून उभें करायचें, ठराव करायचे, दुःखाला वाचा फोडायची, अशा गोष्टींची मग जरूर राहणार नाहीं. हीं क्षणिक जागृतीचीं चिन्हें असतात. मधून मधून आरडाओरड करायची व फिरून मेल्याप्रमाणें पडायचें या गोष्टी आतां हास्यास्पद होऊं लागल्या आहेत. असले फार्स बंद करायचे असतील तर आपल्या राष्ट्राच्या सार्‍या प्रगतीचा कार्यभार आपण आपल्या शिरावर घेतला पाहिजे.

जगावर रुसून आपणांस एकटें बाजूला बसावयाचें आहे असा याचा अर्थ नाहीं. प्रेमाच्या भांडणांत रुसणें फुगणें आहे. राष्ट्राच्या कार्यांत त्याला स्थान नाहीं. रुसून बसण्याच्या उलट माझें सांगणें आहे. सरकारजवळ नीट सभ्यतेचे, सरकारचें रूप ओळखून, संबंध ठेवावे. मोकळेपणानें संबंध ठेवण्यांत स्वातंत्र्य आहे. जो संबंध आपणांवर लादला जातो, तो गुलामगिरीचा भाग असतो. कृत्रिम माराकुटीचे संबंध टिकत नाहींत. परंतु एकमेकांचें स्वरूप ओळखून मोकळेपणानें ठेवलेले संबंध पुढें मैत्रीचे व प्रेमाचे होऊं शकतात.

आपणाला जें जें पाहिजे तें तें सरकारनें लगेच दिलें तर सरकार व प्रजा यांच्यांत प्रेमाचे संबंध उत्पन्न होतील असें आपणांपैकीं कांहींना वाटतें. परंतु हें वाटणें अनुभवाच्या विरुद्ध आहे. एका बाजूनें भीक मागणें व दुसऱ्या बाजूनें भीक घालणें—या गोष्टी संपणार कधीं ? अग्नीवर तेल ओतल्यानें ज्वाला शमत नाहीं. भिकाऱ्याला मिळत चाललें म्हणजे त्याचा लोभहि बळावतो व त्याचें समाधानहि कमी होतें. जेथें मिळविणें हें मिळवणाऱ्याच्या मेहनतीचें फळ नसून, दात्याच्या कृपेचें फळ असतें—तेथें देता व घेता दोघांचा नाशच व्हावयाचा. दोघांचा त्यांत अधःपातच आहे.

जेथें परस्पर देवाणघेवाण असते, जेथें अन्योन्य संबंध समान दर्जाचे असतात, तेथेंच प्रेमसंबंध निर्माण होण्याची शक्यता असते. भिकारी व दाता यांचा स्नेह कसा जमणार ? प्रेमाचे संबंध जोडून उभय पक्षाचा जो फायदा होईल तोच खराखुरा फायदा होय. आपणांस हें केव्हां बरें शक्य होईल ? ज्या वेळेस स्वावलंबनाच्या पायावर आपण उभे राहूं त्यावेळेस हें शक्य होईल. आपण आपलीं कामें तीव्रतेनें व जिव्हाळ्यानें जेव्हां करावयास उठूं, तेव्हां हें शक्य होईल. आपणांस स्वतःचीं कामें केल्यानें सामर्थ्य लाभेल. आत्मविश्वास वाटेल. दोन समर्थ व्यक्तींतील देवघेव सुंदर असते. त्या व्यवहारांत मोकळेपणा, आनंद व समाधान असतें. तेथें कुणी कुणाची कीव करावयाची नसते. कोणी कुणाची मनधरणी करावयाची नसते. असे संबंध चिरस्थायी, सन्मान्य व अन्योन्यांस सुखद, हितद असे असतात. सरकारनें देशासाठीं काय केलें याचा हिशेब मागण्यापूर्वी आपणांकडून राष्ट्र ज्या सेवेची अपेक्षा करीत आहे ती पूर्ण करणें ही गोष्ट महत्त्वाची आहे. ज्या मानानें आपण राष्ट्राला देऊं, त्या मानानें सरकारजवळ मागण्याचा आपणांस

हक्क प्राप्त होईल. स्वतः सेवा न करतां सरकारला जाब विचारण्याचा आपणांस अधिकार नाहीं. तें योग्य होणार नाहीं व त्याचा काडीचाहि उपयोग नाहीं. जो स्वतः रात्रंदिवस श्रमतो, जिवाचें रान करतो, त्यालाच दुसऱ्यास जाब विचारण्याचा अधिकार पोंचतो.

आम्हीं जर राष्ट्राची खरोखरी सेवा करूं लागलों तर सरकार अडथळे नाहीं का करणार? अशी कोणी शंका विचारील. शंका रास्त आहे. आपल्या मार्गांत सरकार कांटे पसरणार नाहीं असें नाहीं. जेथें परस्परांचीं हितें एकरूप नाहींत, तर उलट विरोधी आहेत, तेथें असे अडथळे येणारच. परंतु पुढें अडचणी येतील म्हणून कामाला हात न घालणें हें चांगलें नाहीं. प्रामाणिकपणें काम करणाराच्या मार्गांत मुद्दाम अडचणी आणून उभ्या करणें ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाहीं. सरकारनें कृपा न करणें, आणि सरकारनें आपल्या सेवाकार्यांत अडथळे आणणें, ह्या दोन गोष्टी भिन्न आहेत. ह्या दोन्ही क्रिया एकरूप नाहींत. उदाहरण म्हणून स्थानिक स्वराज्याचा प्रश्न घेऊं. लॉर्ड रिपननें कांहीं दिलें व तें दुसऱ्या एका लॉर्डानें काढून घेतलें; म्हणून आपण घसा बसेपर्यंत ओरडतों. ज्यांनीं दिलें, त्यांनीं तें परत घेतलें म्हणून ओरडणें यांत काय अर्थ! भिकेच्या तुकड्याला आपण किती महत्त्व देतों! काय ही आपली स्थिति! धिक्कार असो आपणांला! आणि असल्या भिकेच्या तुकड्यांना स्थानिक स्वराज्य म्हणून आपण गौरवितों हा तरी केवढा मूर्खपणा व बावळटपणा!

आणि वास्तविक खरें म्हटलें तर स्थानिक स्वराज्य आपल्या दारांत आपली वाट पहात आहे. तें कोणी द्यावयास कशाला हवें? स्वराज्य आपल्या जवळ आहे. या स्वराज्यापासून कोणता लॉर्ड आपणांस दूर करील! घरचें स्वराज्य आजवर कोणी हिरावलें नाहीं, आणि पुढेंहि कोणाला हिरावून घेतां येणार नाहीं. आपल्या खेडेगांवांना जें जें पाहिजे तें सारें आपणांस करतां येईल. खेड्यामधील शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, रस्ते, दवाई, पाणीपुरवठा, सारें आपण करूं शकूं. कामास लागावयाचाच अवकाश आहे. निश्चयपूर्वक ऐक्यानें वागूं व कामें करूं, तर कामाचे हां हां म्हणतां डोंगर उठवतां येतील. हीं कामें करण्याला सरकारच्या परवानगीची जरुरी नाहीं. परंतु आपला

निश्चय अद्याप होत नाहीं. त्याला कोण काय करणार? जर आपण एकत्र येऊन कार्य करणार नाहीं तर हे गोवर्धन कसे उचलले जाणार?

अद्यापहि एकत्र येऊन सहकार्यानें कामें करण्याचा निश्चय होत नसेल तर आपण मानेस धोंडा बांधून समुद्रांत जीव तरी देऊं या. नीट जगा नाहींतर मरा तरी. परंतु ना धड जगणें ना मरणें या स्थितीला काय म्हणावें?

शिक्षणाचा प्रश्न तर सर्वांत आधीं हातीं घेतला पाहिजे. शंका घेणारा विचारील, या शिक्षकांना पगार कोठून द्यायचा? पगार देण्याचेंसुद्धां आम्ही आमच्या शिरावर घेतलें पाहिजे. देशाचें कार्य आम्ही करू लागलों, देशाचें कार्य जर आमच्या हातीं घेतलें, तर तें काम करणाऱ्यांना आम्ही का मुशाहिरा देऊं शकणार नाहीं? जो पगार देतो तो धनी असतो ही गोष्ट खरी. आपणांस पगार देणारें सरकार असेल तर सरकार धनी राहील. आणि हा परकी धनी स्वतःचाहि खिसा नीट भरून घेतल्याशिवाय राहणार नाहीं. म्हणून सारीं कार्यक्षेत्रें आपण आपल्या हातीं घेतलीं पाहिजेत आणि सर्वांत आधीं शिक्षण. शिक्षणावर आपली हुकमत हवी. धंदेशिक्षणाच्या बाबतींत आपणांस अडचणी येतील, परन्तु आपणांस भरपूर अनुभव आतांपर्यंत आला आहे कीं परकी सरकार तर धंदेशिक्षणाची कधींच सोय करणार नाहीं. कारण त्यांत त्या सरकारचें मरण आहे.

माझे टीकाकार म्हणतील आतां बरीक कठीण झालें! कारण आतां तर प्रत्यक्ष कार्याचीच भाषा सुरू झाली. होय. केवळ बोलाचीच कढी व बोलाचाच भात यानें अतःपर भागणार नाहीं. काम कठीण तर खरेंच, परंतु म्हणूनच तें शिरावर घेण्यांत अपार गोडी आहे. अर्जाच्या कागदाची नाव करून तींत बसून सोन्याचीं पिसें धुंडाळून आणू अशी जर कोणी कल्पना काढली तर कांहीं देशभक्त त्या गोष्टींतील लोकांप्रमाणें खरोखर त्या नावेंत बसून निघण्यास तयार होतील. परंतु राष्ट्राचें खरें भांडवल असल्या फुसक्या नौकेंत घालून धोक्यांत आणावें अशी सल्ला मी देणार नाहीं. धक्का बांधून पाणी अडविणें हें कठीण आहे. आणि "हे पाण्या, कृपा करून मागें सर" अशी हात जोडून सनदशीर चळवळ करण्याची गोष्ट सोपी आहे. परन्तु पहिला मार्ग दगदगीचा व कठीण असला तरी त्याचा अवलंब करूनच आपण संकटमुक्त होऊं. दुसरा मार्ग बुडवील यांत शंका नाहीं. कांहीं तरी स्वस्तांत

मिळणारा मनुष्य " मी किती हुशार " अशी बढाई मारतो. परंतु ती स्वस्त वस्तु जेव्हां कामीं येत नाहीं, तेव्हां दुसऱ्या कोणावर तरी दोष लादून तो मनुष्य मोकळा होतो. परंतु दुसऱ्यावर दोष लादून स्वतःचें कितीहि लटकें समाधान केलें तरी कार्य होत नाहीं ही गोष्ट डोळ्यांना दिसत असते.

जोंपर्यंत जबाबदारी दुसऱ्यावर असते तोंपर्यंत त्या जबाबदारीचें महत्त्व आपणांस वाटत नाहीं. परंतु तीच जबाबदारी जर स्वतःच्या शिरावर येऊन पडली तर तिचा आपण केवढा तरी बाऊ करतों. दुसऱ्यावर असतांना जी जबाबदारी हलकी वाटे, ती स्वतःवर येतांच जड वाटूं लागते. परंतु ही खरी नीति नव्हे. सर्वांना एकच न्याय लावला पाहिजे. ज्या वेळेस आपण ब्रिटिशांच्या वर्तनावर ताशेरा झाडतों, त्यांचे आपण न्यायाधीश होतों, त्या वेळेस मानवी दुर्बलता, मनुष्य सहजदोष, या सर्व गोष्टी आपण ध्यानांत घेतल्या पाहिजेत. इंग्रज झाले तरी मनुष्यच आहेत. त्यांच्या बाबतींत आपण जितकी कठोर कसोटी लावूं, त्यापेक्षां अधिक कसोटी स्वतःच्या बाबतींत आपण स्वतः लावली पाहिजे. कारण इंग्रज बोलून चालून परका. त्याला भारताबद्दल आपलेपणा कां व कसा वाटावा ? भारताविषयींचें कर्तव्य तो नीट बजावीत नाहीं म्हणून आपण कडक शेरा मारला. आतां स्वतःच्या वर्तनावरहि शेरा मारा. न्यायाचा कांटा तोच ठेवा. ब्रिटिशांना शिव्याशाप देणें हें सोपें राजकीय काम आहे. परंतु तेवढ्यानें ध्येयप्राप्ति होत नाहीं. जशास तसें, टोल्यास टोला, ह्यामुळें खऱ्या कर्तव्याचा गंभीर व खंबीर पाया घालण्याचें आपण विसरूं. ज्यावेळेस एखादा पक्षकार इरेस पडतो, माझें सारें जरी गेलें तरी मी हा खटला लढवीनच लढवीन असें म्हणतो, त्या वेळेस त्याला विवेक राहत नाहीं, तो विकारवश पशूच होतो. आपल्या राजकीय चळवळीचा पाया जर क्रोध असेल तर साध्य दूर राहून क्रोध हेंच आपलें ध्येय होऊन बसेल. दुय्यम व कमी महत्त्वाच्या प्रश्नांस महत्त्व प्राप्त होईल. आणि विचारांची व आचारांची गंभीरता लुप्त होईल, आणि विकारांचा नंगानाच सुरू होईल. परंतु भरमसाट भावना भरमसाट कृति म्हणजे सामर्थ्य नसून दुबळेपणा आहे.

असला सारा क्षुद्रपणा, हें सारें विकारी पशुत्व आपण झडझडून टाकलें पाहिजे. देशप्रेमाच्या विशाल व सुंदर पायावर आपण सारें काम उभारलें पाहिजे. दुसऱ्यावर विसंबून राहूं नये. दुसऱ्याचा तिरस्कार हाहि आपल्या

कार्याचा हेतु नसावा. दुसऱ्यावर विसंबणें किंवा दुसऱ्याचा तिरस्कार करणें या दिसावयाला जरी दोन् गोष्टी दिसल्या तरी एकाच दुबळेपणाच्या वृक्षाच्या त्या जोड फांद्या आहेत. याचनेंत आपला मोक्ष आहे, असें जर आपण ठरविलें, आणि ती याचना दात्यानें जर पूर्ण केली नाहीं तर त्या दात्याबद्दल तिरस्कार व द्वेष वाटूं लागतो, दुबळेपणा व तिरस्कार जवळ जवळ नांदतात. दुबळ्याला प्रबळाचा सदैव तिटकारा वाटतो. आपण कोणाजवळ भीक मागितली नाहीं म्हणजे कोणाचा तिरस्कारहि करावा लागणार नाहीं. आपणांला भीक न घालणाऱ्यांचा तीव्र तिरस्कार म्हणजेच देशभक्ति असा जर सिद्धांत आपण ठोकून दिला तर एका क्षणांत एकप्रकारचें देशभक्ति केल्याचें समाधान वाटेल. परंतु त्या समाधानाची किंमत शून्य आहे हें सांगणें नलगे.

मुलाची सुश्रूषा करणें हें आईचें आवडतें कर्तव्य आहे. तें आईकडून काढून घेऊन जर दुसऱ्यावर सोंपवलें तर आईच्या हृदयाची काय स्थिति होईल तें पहा. तिचें कोणालाहि मग समाधान करतां येणार नाहीं. कां बरें? कारण मुलावर तिचें अपरंपार प्रेम असतें. आणि म्हणूनच मुलाची सेवा आपणच करावी असें तिला वाटत असतें. त्या प्रेमाला सेवेचें खाद्य पाहिजे असतें.- त्याप्रमाणेंच. आपल्या देशाचें सारें काम इतरांनीं केलें तर तें आपणांस आवडेल का? आपल्या मातेची सेवा इतरांनीं करावी व आपण स्वस्थ बसावें हें आपल्या मातृभक्तीस रुचतें का, शोभतें का? आपणच आपल्या देशाची खरी चिंता वाहिली पाहिजे. त्यासाठीं अहोरात्र कष्ट केले पाहिजेत. यालाच देशभक्ति म्हणतात. हें कर्तव्य, ही सेवा, ही जबाबदारी दुसऱ्यावर टाकून आपण त्याला फक्त शिव्या देणें याला देशभक्ति म्हणतां येणार नाहीं, शहाणपणाहि म्हणतां येणार नाहीं. कारण देशासंबंधींचें खरें कर्तव्य त्यामुळें अपूर्णच राहणार. तें परका कसें पुरें करणार?

# सर्वांचा मिळून एकच राष्ट्रीय पक्ष होऊं दे

**निबंध ३ रा**

मी कोणत्याहि एका विशिष्ट पक्षाचा नसल्यामुळें राष्ट्रीय–सभेंत जे झगडे झाले, त्यांचें तिऱ्हाईत या नात्यानें मला नीट निरीक्षणपरीक्षण करतां आलें. ज्यांना ते प्रत्यक्ष पहावे लागले, ज्यांच्या मनाला जबर धक्का बसला, त्यांची गोष्ट माझ्याहून निराळी आहे. ते ती गोष्ट लौकर विसरूं शकणार नाहींत. परंतु जी गोष्ट होऊन गेली, तिची उद्वेगजनक स्मृति सदैव ताजी ठेवणें हें बरें नव्हे. राष्ट्रीय आरोग्याचें तें लक्षण नाहीं. राष्ट्राची मंदावत चाललेली नाडी आज जीवनरसानें पुन्हां उडूं लागली आहे. यासाठीं मधूनमधून जरी असे वाताचे झटके आले तरी नाडी ठीक असल्यामुळें निराश होतां कामा नये. पूर्वीचें आरोग्य पुन्हां प्राप्त होणार यांत शंका नाहीं. थोडा उशीर लागेल, एवढेंच. जो नवीन जीवनरस उत्पन्न होत आहे, त्याच्या बळावर हे झटके सहज सहन करूं शकूं. तो जीवनरस एकदम जोमानें भरूं लागल्यामुळें तर हा धक्का बसला. येणाऱ्या आरोग्याचीं, लाभणाऱ्या चैतन्याचीं हीं आगामी चिन्हें आहेत. वाळलेलें लाकूड तोडलें तर तें वाढत नाहीं. परन्तु जिवंत वृक्षाला तोडलें तर तो आणखी फोंफावतो. राष्ट्राला झालेली आजची जखम आपण चिघळूं देतां कामा नये. आपलें वाढतें आरोग्य प्रकट करून ती जखम त्वरित भरून काढूं या. जो धडा आपणांस शिकविण्यांत आला आहे, तो नम्रपणें शिकून अधिक विवेकी व शहाणे होऊन पुनश्च ऐक्याचे नवीन प्रयत्न करूं या.

आजपर्यंत सारें राष्ट्र मृतवत् पडलें होतें. आतां नाना रूपांनीं, नाना दिशांनीं जीवन पुन्हां प्रगट होत आहे. अशा वेळेस हट्ट धरून चालणार नाहीं. सर्व भिन्न भिन्न मतांबद्दल आपण आदर दाखविला पाहिजे, सहिष्णुता राखली पाहिजे. अखिल राष्ट्राच्या एकीकरणार्थ व वैभवार्थ प्रत्यकानें दुसऱ्याशीं अविरोधी राहून स्वतःची कार्यपद्धति आंखावी असें ठरलें पाहिजे. असें केल्यानेंच आपणांस चांगलें शिक्षण मिळेल, कार्यपद्धति समजेल. असा

अनुभव घेतल्याशिवाय, अशा गोष्टी शिकल्याशिवाय स्वराज्य म्हणजे एक भ्रान्त कल्पना राहील.

कोणत्याहि स्वतंत्र राष्ट्रांत कोणतेंहि मत दाबलें जात नाहीं. निरनिराळ्या विरुद्ध पक्षांची एकमेकांवर क्रिया प्रतिक्रिया होत असते. प्रत्येक पक्ष धडपडतो व शेवटीं एक निकाल बाहेर पडतो. तो निकाल बलवान् असतो. इंग्लंडमध्यें मजूरपक्ष किंवा समाजसत्तावादी पक्ष–ज्यांचे विचार क्रान्तिकारक असतात त्यांनाहि तेथील पार्लमेंटमध्यें स्थान आहे. इतके परस्पविरुद्ध पक्ष असूनहि त्यांच्या प्रतिनिधींमध्यें अशा प्रकारचें सहकार्य कसें बरें शक्य होतें ? तें शक्य होतें याचें कारण स्वातंत्र्यासाठीं जे अनेक दिव्य झगडे त्यांनीं केले, त्या झगड्यांतून त्यांनीं जें शिस्तीचें शिक्षण मिळविलें तें होय. ही शिस्त त्यांच्या हाडींमासीं खिळलेली आहे. आईच्या दुधाबरोबरच हें शिस्तीचें बाळकडू त्यांना पाजलें जातें. ह्यामुळें नाना मतभेद असले, कितीहि कटु वादविवाद झाले तरी क्रियेचें व ध्येयाचें ऐक्य तेथें राहू शकतें.

परंतु आपण ज्या सभापरिषदा भरवितों, तेथें प्रत्यक्ष कार्यांची कल्पनाच नसते. त्यामुळें जबाबदारीचीहि जाणीव नसते. राष्ट्रीय वृत्ति व एकराष्ट्रीय इच्छा उत्पन्न व्हावी व ती वाढीस लागावी, यासाठीं ह्या सभापरिषदा अस्तित्वांत आल्या. राष्ट्रीय भावना जागृत करण्यासाठीं भरवलेल्या या परिषदांतहि जेथें देशांतील थोर थोर पुढारी जमतात, वेंचक माणसें एकत्र येतात, तेथेंहि जर विरुद्ध मतांबद्दल आपण आदर दाखविला नाहीं तर या जगांत आपण फारच हिणकस ठरूं.

" आमचा मतभेदच नाहीं, जाऊं द्या आमचीं मतें चुलींत, आमच्या मतांचें काय एवढेंसें"–असें वरपांगी बोलून, दिखाऊ ऐक्य निर्माण करा, असें मी कधींहि सांगणार नाहीं. तें होणारहि नाहीं व झालें तरी हितकरहि नाही. या विश्वामध्यें लोटण्याची व खेंचण्याची अशा दोन शक्ति आहेत. या दोन शक्तिप्रवाहांनीं विश्वाचा विकास होत आहे. अशाच प्रकारची विकासपद्धति सर्व सनदशीर संस्थांतहि निर्माण झाली पाहिजे. आणि याप्रमाणें वागूं लागल्यास परस्परविरुद्ध ध्येयांना फुटून दूर निघून जाण्याची पाळी न येतां, तेथेंच राहून वरचढ होण्यासाठीं प्रयत्न करतां येईल. उत्पन्न झालेली वाफ व्यर्थ जाऊं न

देतां, तिचा उपयोग करून घ्यावयाचा असेल तर वाफेला कह्यांत ठेवणारा बॉयलर तेथें अवश्य पाहिजे.

जोंपर्यंत राष्ट्रांत जिवंतपणाच नव्हता, जोंपर्यंत मतभिन्नताच दिसून येत नव्हती, तोंपर्यंत अशा विकासवादी घटनेची जरूरच भासली नाहीं. परंतु राष्ट्राचें हृदय आज पुन्हां उडूं लागलें आहे. आतां राष्ट्राच्या मेंदूनेंहि जागृत होऊन अवयवांकडून नीट पद्धतशीर काम करून घेतलें पाहिजे. राष्ट्रीय सभेचीं अनेक शकलें व्हावीं ही घटना फार दुःखदायी आहे.

एकाच मातृभूमीच्या अंगाखांद्यावर आज शेंकडों वर्षें हिंदु–मुसलमान वाढविले जात आहेत, खेळवले जात आहेत. तरी अजूनहि आपण परस्परांहून किती दूर आहोंत ? आपणांमधील ज्या कांहीं विशेष दोषांमुळें हें असें होतें, ते सारे दोष दूर केल्याशिवाय आपल्या प्रगतीच्या मार्गांतील अडचणी दूर होणार नाहींत. हे दोष शोधून ते जोंवर आपण समूळ खणून काढणार नाहीं तोंपर्यंत आपल्या मोठमोठ्या आशाआकांक्षा फोल आहेत. हे दोष काढून टाकूं तर परक्यांचे आपल्यामध्यें भांडण लावण्याचे प्रयत्न हास्यास्पद ठरतील. तसे खोडसाळ प्रयत्न मग कोणी करणारच नाहीं. सरकारला हे दुहीचे वणवे मग पेटवतां येणार नाहींत. कारण पेटवण्यासाठीं लागणारें इंधनच नसेल; निरिंधन अग्नि कसा पेटणार ? आणि थोडें फार इंधन सरकारजवळ राहिलें तर सरकारच आधीं धांवपळ करून आगीचे बंब आणील व आग विझवील. अत्यंत गरीब व दरिद्री माणसाच्या झोंपडीला आग लावणें सम्राटालाहि करतां येणार नाहीं; कारण त्या ज्वाळा राजवाड्याकडेच पेटत जावयाच्या व राजवाडाच भस्म व्हावयाचा !

जुन्या बंधनांतून धडपडत जेव्हां एखादा नवीन पक्ष उदयास येतो, तेव्हां हा एक उपटसुंभ उभा राहिला, हा एक अभद्र धूमकेतु उत्पन्न झाला असें कांहींना वाटूं लागतें. त्या नवीन पक्षाच्या मानेला नख लावून त्याला ताबड-तोब मातींत मिळवावें असें त्यांना वाटतें. मग नूतन पक्षहि अशा परिस्थितींत जर दंड थोपटून उभा राहिला, त्यानें जरा आडदांडपणा केला, जरा शिष्टा-चाराचें अतिक्रमण केलें, तर तें क्षम्यच आहे. जें जें नवीन म्हणून निर्माण होतें, तें संपूर्णपणें नवीन नसतें. तें नैसर्गिक नियमांनींच उत्पन्न होतें व जुन्याशींहि अविभक्तपणें जोडलेलें असतें. कार्यकारणाच्या सांखळींतील तो

आणखी एक नवीन दुवा असतो. हें सारें लक्षांत घेऊन, नव्याजुन्यामध्यें जर कांहीं झटापट झालीच, जर कांहीं बाचाबाची, बोलाचाली झालीच, तर ती तात्पुरतीच असणार. त्या झटापटीकडे फार लक्ष देऊं नये. या नव्या व जुन्या दोन्ही पक्षांचें एकीकरण होऊन एकच असा राष्ट्रीय पक्ष स्थापन होणार यांत शंका नाहीं.

राज्यकर्ते जों जों अधिक जुलूम करतील, तों तों त्या जुलमाला पुरून उरून जर राष्ट्र वर मान करूं लागलें, तर त्यांत भिण्यासारखें काय आहे? अशा-मुळें सदैव असंतोषच राहील, धुसफूस राहील, असें भय वाटावयास नको. उलट राष्ट्र कांहीं मेलें नाहीं, हातपाय तरी झाडण्याची त्याच्यांत अद्याप धुग-धुगी आहे, हें दिसून आल्यानें अधिक उत्साह आपणांस वाटावा, अधिक आशा वाटावी. सरकारच्या जुलमाचा जरी प्रतिकार करतां आला नाहीं, हातपायहि समजा हालवतां आले नाहींत, तरीहि त्या जुलमाबद्दल जर मनांत अत्यंत दुःख होत असेल, तर त्याच्यांतहि जिवंतपणा आहे असें वाटून मला आशा वाटते. भावनाशून्यता हा एक सद्गुण आहे असें मानावयास मी तरी कदापि तयार होणार नाहीं.

जहालपणाविषयीं एक गोष्ट अशी आहे कीं जहालपणा लौकर निर्माण होतो, परन्तु तो कह्यांत ठेवणें कठीण असतें. आपले राज्यकर्तेहि जहाल आहेत. परन्तु यामुळेंच त्यांचा अंत होणार आहे. त्यांच्या लक्षांत अजून तें आलें नाहीं. हिंदुस्थानांत खालचे अधिकारी जे अत्याचार व जुलूम करतात, ते कदाचित् वरिष्ठ सरकारला संमतहि नसतील. खालचेच बेजबाबदार लोक विकारशील असल्यामुळें अतिरेक करीत असतात.

हें जसें सरकारच्या बाजूनें म्हणतां येईल, तसेंच लोकांच्याहि बाजूनें म्हणतां येईल. जहालांनीं अत्याचार केले असें म्हटलें म्हणजे कोणत्या पुढा-ऱ्याला दोष द्यावा हें कळत नाहीं. ते अत्याचार, तो अतिरेक जहाल पुढा-ऱ्यांस मान्यहि नसेल. हे सारे बेशिस्त प्रकार विकारवश व उतावळ्या अनुयायांकडून होतात. कारण त्यांना जबाबदारीची जाणीव नसते. शिवाय नेमस्त व जहाल या विभागणीच्या रेषा सरकारनें स्वतःसाठीं आंखल्या आहेत. त्याचीच री आपण काय म्हणून ओढावी?

जहालांचा असा विशिष्ट पक्ष देशांत नाहीं कीं जो खड्याप्रमाणें निराळा काढून सरकारनें चिरडून टाकावा. राष्ट्रीय चळवळीच्या ह्या खुणा आहेत. आणि जोंपर्यंत देशांत दुःख व दारिद्य आहे, दास्य व असंतोष आहे, तोंपर्यंत सरकारनें राष्ट्रीय चळवळ कितीहि दाबली व दडपली तरी या ना त्या रूपानें ती पेटतच राहणार! किंवा योग्य संधीची वाट पाहत राष्ट्राच्या पोटांतच धुमसत राहणार. ती मरणार नाहीं.

निसर्गाच्या नियमाप्रमाणें होणाऱ्या या सहज गोष्टींवर "ह्या कांहीं विशिष्ट पंथाच्या आहेत" असा शिक्का कोणी मारतात. कारण त्या त्यांना नको असतात. १८ व्या शतकांत युरोपमध्यें धर्म म्हणजे पोटभरू स्वार्थी लोकांनीं निर्मिलेलें थोतांड असा धर्मावर शिक्का मारला गेला. आपल्याकडेहि हिंदु-धर्म कांहीं ब्राह्मणांनीं पोटासाठीं निर्माण केला, त्यांना हद्दपार करा, असें कांहीं म्हणतात. त्याचप्रमाणें जहालपणाहि कोठें तरी गुप्त प्रयोगशाळेंत निर्माण होत आहे, त्याच्या मुळाशीं कांहीं असंतुष्ट गुंड आहेत, त्यांचे पुढारी न्यायासनासमोर खेंचून ही चळवळ दडपून टाकावी असें ह्या सरकारलाहि वाटूं लागलें आहे.

असें करण्यांत सरकारला काय वाटत असेल तें वाटो. परंतु सरकार-प्रमाणेंच आपणहि बरळूं लागूं नये व शिक्के मारीत सुटूं नये. आपण जरा खोल पाहण्याचा प्रयत्न करावा. आज दळणवळण वाढलें आहे. दूरचे प्रांत जवळ आले आहेत. सरकार आज एक आहे. आपण राष्ट्राचा इतिहास अभ्यासून राहिलों आहोंत. राष्ट्रीयसभेचे जोराचे प्रयत्न चालू आहेत. ह्या सर्व गोष्टींमुळें हें राष्ट्र एक आहे, हा देश एक आहे, असे दिव्य विचार मधून-मधून आपल्या हृदयाकाशांत प्रकट होऊं लागले आहेत. सुखदुःखांत आपण सारे भारतवासी एक, आपलें भवितव्य एक, ध्येय एक, असे विचार मनांत येत आहेत. अशा वेळीं प्रेमाचीं व स्नेहाचीं बंधनें अधिक बळकट करून जर आपण परस्परांस अधिक एकत्र आणणार नाहीं तर हे उत्पन्न होणारे मंगल विचार पुन्हां मावळतील, आणि मग ध्येयभूत राष्ट्रीय ऐक्य कसें व्हावयाचें? ऐक्याची भावना दृढमूल करण्यासाठीं आपण कायावाचामनें प्रयत्न चालवले नाहींत. ऐक्याची भावना निर्माण करण्यांत आपलें हृदय नाहीं व नव्हतें. हें कठोर व कटु सत्य जितक्या लौकर आपण साक्षात्कारूं तितकें अधिक चांगलें.

सत्याचा आविष्कार आश्चर्यकारक असतो, सत्य आश्चर्यकारक रीतीनें प्रकट होत असतें. एके काळीं जे विचार मोठमोठे लोक सांगत होते, परंतु ज्यांच्याकडे कोणीं लक्ष दिलें नाहीं, तेच विचार आज सामान्य लोकांच्याहि बोलण्यांत प्रकट होत आहेत. प्रत्येक जण दुसऱ्याला म्हणत आहे " होय हें खरें आहे, नाहीं का रे? गुलामगिरीपेक्षां स्वावलंबन व कष्ट यांत श्रेष्ठपणा आहे. तुला नाहीं असें वाटत?" नोकरीशिवाय ज्यांना कांहीं दिसत नसे, त्यांनीं वरील उद्गार काढावे हें आश्चर्य नाहीं का? श्रीमंताचा मुलगा विणकाम शिकायला जातो, सभ्य गृहस्थाचा मुलगा कपड्यांचें गांठोडें डोक्यावर घेऊन फेरीला निघतो; ब्राह्मणाचा मुलगा अभिमानानें नांगर धरतो; हा चमत्कार नाहीं का? पूर्वीं केवळ शब्द कोणाला पटत नव्हते. परन्तु सत्याचें दर्शन होतांच कृति होऊं लागली. सत्यदर्शन विजयी असतें.

व्यक्तीला काय किंवा राष्ट्राला काय, स्वातंत्र्य, मोक्ष हेंच अंतिम प्राप्तव्य आहे. मोक्षप्राप्तीच्या पंथांतील अडचणी आपणच आपल्या कल्पनांतून निर्मीत असतों. कोळी आपल्याच धाग्यांत गुरफटतो. ह्या सर्व अडचणी संयमानें, विचारानें, श्रमानें व अभ्यासानें आपण दूर केल्या पाहिजेत.

श्रम हें आपलें कर्तव्य, वादविवाद नव्हे. शब्द नकोत, कर्म हवें आहे. ज्या कामानें आपणांस उत्साह मिळेल असें काम केलें पाहिजे. " आपण आळशी आहोंत, कष्टांचा व श्रमांचा आपणांस कंटाळा आहे" हा आपणांस लागलेला कलंक आपण कामाचे पूर वाहवून धुवून टाकला पाहिजे. आपलें दारिद्र्य व आपले कलह यांच्या मुळाशीं आळस व कर्मशून्यता आहेत. आळशी मनुष्य दरिद्री होतो व आळशी कांहीं उद्योग नसल्यामुळें भांडत बसतो. आपण गुलाम आहोंत, कारण आपला परस्परांवर विश्वास नाहीं. आपणांमध्यें ऐक्य येण्यासाठीं आपण स्वतःला मर्यादाशील व संयमी बनविलें पाहिजे. आपण विकारी न होतां विवेकी झालें पाहिजे, समतोल राहण्याची खटपट केली पाहिजे. खऱ्या वीराप्रमाणें वाणी व करणी यांवर संयम ठेवण्यास शिकलें पाहिजे. आपण असे न होऊं, ह्या गोष्टी जर मनापासून आपण न शिकूं, तर आपलें कर्मक्षेत्र हें आपलें कलहक्षेत्रच होऊन बसेल.

आपल्या देशांतून जी अलोट संपत्ति आतांपर्यंत इंग्रजांनीं नेली व जिच्यामुळें आजचें जगांतील महनीय स्थान त्यांना लाभलें आहे, त्या संपत्तीचा

एक अंशहि आपणांस परत मिळणार नाहीं ही खात्री बाळगा. आपल्यासमोर जें काम आहे, तो पोरखेळ नाहीं. आपलें सारें सामर्थ्य, सारी सहनशीलता, या कामीं ओतावी लागेल. उगीच आरडाओरड करून, उल्लूपणा करून, दिखाऊपणा करून, आधींच असलेल्या अनन्त अडचणींत जे भर घालतील ते कार्याची हानी करतील. न डगमगतां आपण सारें कार्य शिरावर घेतलें पाहिजे. आपण आपले उद्योगधंदे मोकळे केले पाहिजेत. आपण आपलें शिक्षण आपल्या हातीं घेतलें पाहिजे. आपण संघटना निर्मिली पाहिजे. सहकार्य केलें पाहिजे. आपण बलवान्, शीलवान् व संयमी झालें पाहिजे. कार्य अफाट आहे. ह्या प्रचण्ड कार्यांत रक्ताचें पाणी करावें लागेल. परंतु उगीच बेजबाबदारपणें दंगेधोपे माजवणें योग्य होणार नाहीं. त्यानें कार्यहानी होऊन ध्येय अधिकच दूर राहील.

मी भीतीमुळें, अतिसावधगिरीमुळें बोलत आहें असें नका समजूं. दुःख व कष्ट म्हणजे काय तें मी जाणतों. आपत्ति ही प्रभूची देणगी आहे व तिची मी पूजा करतों; आणि दुःखाबद्दल मला आदर आहे म्हणून त्याच्याबद्दल मी गंभीरपणें विचार करूं लागतों. जे दुर्बळ असतात, ते दुःखामुळें एकतर धांगडधिंगा घालतात. आदळ आपट करणें निराळें व खंबीरपणें उभें राहणें निराळें. बडबड निराळी, वीरता निराळी. आत्मसमर्थन निराळें व आत्मसाक्षात्कार निराळा. दुःखाला जो धडा आपणांस शिकवावयाचा आहे, तो जर आपण शिकूं तर वरील गोष्टींतील भेद आपण ओळखूं शकूं.

तर मग आपण कार्याला कसा आरंभ करावयाचा ? एक गोष्ट विसरूं नका कीं, कळस जितका उंच, तितका पाया खोल असला पाहिजे. आपल्या आकांक्षांप्रमाणें राष्ट्राची इमारत जर भव्य व टोलेजंग उभारावयाची असेल तर प्रत्येक जिल्ह्यांतून कामाला आरंभ झाला पाहिजे. प्रांतिक सभांनीं आपापल्या प्रांतांत कार्य करणाऱ्या शाखांचीं जाळीं पसरलीं पाहिजेत. ह्या शाखांचें पहिलें काम म्हणजे बारीकसारीक सारी माहिती गोळा करणें. कोणतेंहि योग्य काम करण्यापूर्वी स्पष्ट व भरपूर अशी माहिती आधीं हवी.

संघटना बलवान् असावी म्हणून निरनिराळे घटक तयार करून त्या घटकांनाहि बलवान् बनविलें पाहिजे. प्रत्येक गांव स्वावलंबी केला पाहिजे. प्रत्येक गांवांत शाळा हवी, उद्योगधंद्याची शाळा हवी, धान्याचीं कोठारें

हवींत, बँक हवी. अशा संस्था खेड्यांतून निघाव्यात व टिकाव्यात म्हणून मदत केली पाहिजे. खेड्यांतून क्रीडांगणें हवींत, एकत्र येऊन कामकाज करण्यासाठीं पंचायतीचें ठिकाण हवें; वाचनालय व ग्रंथालय असावें. हें सारें काम करावयाचें आहे.

जोंपर्यंत जमीनदार व मजूर यांच्यामध्यें प्रेमाचे संबंध नाहींत, तोंपर्यंत दोघांचेंहि नुकसान आहे. सहकार्य निर्माण करण्याची वेळ अजूनहि आली नाहीं का ? मजुरांना जगविलें पाहिजे, सुखी केलें पाहिजे. श्रम वांचविणारीं लहान लहान यंत्रें आपण उपयोगांत आणलीं पाहिजेत. सुधारलेले हातमाग, सुधारलेले उंसाचे चरक, शास्त्रीय गोरक्षण व गोसंवर्धन, नाना गोष्टी खेड्यांतून करावयाच्या आहेत. यासाठीं सहकार्य हवें. अनेकांनीं एकत्र आलें पाहिजे. शहरांतील प्रचंड प्रमाणावर चाललेल्या कारखान्यांतील दोष खेड्यांतून सहकारी तत्त्वावर चाललेल्या छोट्या संस्थांतून शिरणार नाहींत.

एकादा का होईना जर आदर्श गांव तयार करतां आला तर तें उदाहरण इतरांस मार्गदर्शक होईल. दिव्यानें दिवा लागतो. एकाचं पाहून दुसरा उचलील. परंतु जोंपर्यंत आपण प्रत्यक्ष कांहीं तरी करून दाखवीत नाहीं, तोंपर्यंत आपली मध्यवर्ती संस्था निष्प्राणच राहील. जेथें परिघच नाहीं, तेथें केंद्र कोठून असणार ?

कोठें तरी मध्यवर्ती सरकारच्या हातांतील सूत्रें आपल्या हातीं यावीं म्हणून आपण उत्सुक झालों आहोंत. आपला सारा उत्साह त्यांत खर्च होत आहे. परंतु तीं सूत्रें हातीं घेऊन ज्यांच्यावर राज्य करावयाचें त्यांची दशा काय आहे ? युरोपामधील प्रचंड कारखाने आपल्या देशांतील उद्योगधंदे ज्याप्रमाणें मारीत आहेत, त्याप्रमाणेंच हें परकी राज्ययंत्रहि खेड्यांतील आपल्या संस्था, व आपली संस्कृति यांना धुळीस मिळवीत आहे. खेड्यांतून पूर्वी जें चैतन्य दिसे, जी चळवळ असे, त्याचें आज नांवहि नाहीं. तळीं कोरडीं पडलीं, पाट गाळानें भरून गेले, कुरणें नष्ट झालीं, देवळें ओस पडलीं. खेड्यांतील श्रीमंत लोक शहरांत राहूं लागले आहेत. ते जेव्हां पूर्वी खेड्यांतच राहत तेव्हां त्यांच्या उत्सवसमारंभांत, त्यांच्या सुखांत खेड्यांतील जनता भाग घेई. क्षणभर सुखी होई. परंतु आज श्रीमंतांचे मुनीम व हस्तक हेच खेड्यांत राहतात. आणि ते गरिबांना कसें वागवीत असतील तें दिसतच आहे.

जनतेसमोर उदात्त व यथार्थ असें ध्येयच आज नाहीं. त्यागाचें जिवंत उदाहरण डोळ्यासमोर नाहीं. नैतिक बंधनें नाहींत, कांहीं विधिनिषेध नाहीं. कठोर दंडुक्याच्या जोरावर देशांत आज स्मशानशांति राखली जात आहे. कायद्याला दया नाहीं. धर्म नाहीं. खोट्यानाट्या फिर्यादी होत आहेत. वादी प्रतिवादी परस्परांस धुळीस मिळवीत आहेत. कोर्टकचेऱ्या व वकील या कलह धर्मास उत्तेजन देत आहेत. खेडीं मृतवत होत आहेत. हिंवताप सर्व देशाचा मसणवटा करीत आहे. दुष्काळ नाहीं असें एकहि वर्ष सुनें जात नाहीं. अवर्षणें नित्याचीं झालीं. पूर्वी दुष्काळांत आधार देणारीं धान्याचीं पेवें असत तीं मात्र आतां राहिलीं नाहींत. पोलिसांना किंवा गुंडांना हां म्हणण्याची, खबरदार म्हणण्याची जनतेंत ताकद नाहीं. पोलिसानें दरडवावें, लुटारूनें लुटावें, गुंडानें गप्प बसवावें. जनता प्रतिबंध करूं शकत नाहीं. सारी प्रतिकारशक्ति मेली. चोर व चोरांना पकडण्यासाठीं ठेवलेले—दोघे जनतेला खात आहेत. आणि जनतेजवळ काय उरतें? खाण्यापिण्याची भ्रांत आहे. दूधतूप शब्दच उरले. गरिबांच्या भोजनांत त्या जणुं निषिद्ध वस्तु ठरल्या! शुद्ध तूप गेलें. आतां भेसळीचें येऊं लागलें. खाण्यापिण्याची ददात आणि त्यांत पुन्हां रोग. पूर्वीचे घरचे देशी रोग आहेतच, आतां परदेशांतीलहि नाना रोग आले आहेत व कायमचे रहिवासी झाले आहेत.

आनंद नाहीं, अन्न नाहीं, आरोग्य नाहीं, आशा नाहीं, स्थान नाहीं, मान नाहीं, बळ नाहीं, फळ नाहीं. शेजारीं मदत करावयास कोणी नाहीं. तडाका येतांच तो मुकाट्यानें घेण्यास माथे वांकवले जात आहेत. मृत्यु येतांच हातपाय न हलवतां त्याच्या स्वाधीन व्हावें लागत आहे. परमावधीच्या सोशिकपणामुळे अन्याय सहन केले जात आहेत. सारा दोष ग्रहदशेच्या माथ्यावर व कलियुगाच्या डोक्यावर दिला जात आहे. संकटें आलीं तर तारक एक फार तर परमेश्वरच उरला आहे.

हें असें सारें कां? कारण मुळालाच कीड लागली. वृक्षाच्या मुळांना पोसणारा सारा ओलावा सुकून गेला. राष्ट्राची खरी जननी म्हणजे खेड्यांतील सुव्यवस्था. ही जननी, ही आई आज मेली आहे. खेड्यांतील सुंदर संस्था छिन्नभिन्न होऊन पडल्या आहेत. जीवनरस देणाऱ्या या संस्था उखडल्या

गेल्या. काळाच्या ओघांत वाळलेल्या ओंडक्याप्रमाणें त्या वाहून जात आहेत. खेडीं उध्वस्त झालीं तर राष्ट्र कसें टिकणार ? हीं सात लाख खेडीं राष्ट्रपुरुषाच्या शरीरांतील ह्या रक्तवाहिन्या आहेत. ह्या आज रक्तहीन आहेत. महान् आपत्ति आली आहे. तर मग आपण काय करणार ? नवीन कांहीं निर्मिणार नाहीं का ? ओलावा देण्यासाठीं, खेड्यांना पोसण्यासाठीं कांहीं हालचाल करणार नाहीं का ? राष्ट्रवृक्षाचीं जीं हीं सात लाख मुळें, त्यांना जाऊन पाणी घालणार नाहीं का ? मिसर, बाबिलोन वगैरे राष्ट्रें मेलीं, त्यांच्याप्रमाणें आपण मरणाची वाट पाहत बसलों आहोंत का ? नाहीं. ह्या गोष्टी म्हणजे नशिबाचा खेळ नाहीं. ग्रहदशेवर दुर्दशा अवलंबून नसते. आपल्या अवनतीला कार्यकारण भाव आहे. तीं कारणें आपण दूर केलीं पाहिजेत, म्हणजे परिस्थिति बदलेल. त्या कारणांचा नाश करूं तर भाग्य परत येईल. परन्तु हातपाय जोडून स्वस्थ बसूं तर उद्यांचें मरण आज येईल.

ज्याच्या नाकाशीं सूत धरून बसले आहेत, असा आसन्नमरण रोगीहि बरा होतो. त्याची काळरात्र निभावते. तो मरणाचा क्षण जाऊन गुण पडूं लागतो. खिडकींतून नवजीवनाचे किरण येतात. रोग्याच्या डोळ्यांत पुन्हां तेज चमकूं लागतें. पूर्वीं वरचे वर्ग, पांढरपेशे प्रतिष्ठित समजले जाणारे वर्ग आपल्या बंधूंचे संरक्षक असत. परन्तु आजचे प्रतिष्ठित व सुशिक्षित लोक आपल्या भावाबहिणींपासून दूर जाऊं लागले. ते स्वतःचें कर्तव्य विसरले, स्वतःची जबाबदारी विसरले. इंग्रजी अमदानींत भाऊ भावापासून दूरदूर चालला.

परन्तु आतां चूक कळूं लागली आहे. जीं कर्तव्यें चुकवलीं तीं करण्यास पुन्हां आपण उत्सुक होत आहोंत. कृत्रिम भेद दूर करून सामान्य जनतेशीं एकरूप होऊं पाहात आहोंत. रामराज्याचा आरंभ करीत आहोंत. होय. चला या सारे व झटून कामाला लागा. वेळ आली आहे. ती आपल्या कामाची वाट पाहत आहे. काळ कोणाची वाट बघत नाहीं. तुम्हीं काम केलें नाहीं तर काळ झरकन निघून जाईल. मग आणखी रडत बसावें लागेल. आपल्या दुबळेपणाचें मुख्य कारण म्हणजे आपण भाऊभाऊच परस्परांस पारखे झालों आहोंत. या प्रेमशून्यतेमुळें जीवनरस कमी होत चालला होता. जर भाऊभाऊ सारे एकत्र याल, प्रेमानें नांदाल तर एका क्षणांत उत्साह वाढेल, बळ चढेल. आपण दीनदुबळे आहोंत, असें मग कधींहि वाटणार नाहीं. सारे जवळ आलों

म्हणजे सर्वांच्या दु:खदैन्याची जाणीव होईल. आणि सर्वांचें दु:ख एक होऊं दे की तें दूर झालेंच समजा.

जमीनदार व सावकार यांना माझी प्रार्थना आहे. खेड्यांतील लोकांना जीवन देण्याच्या कामांत तुम्ही जोंपर्यंत उदारपणें लक्ष घालणार नाहीं, तोंपर्यंत खरें काम होणार नाहीं. शेतकरी सुखी झाला, जर श्रमणारा बहुजनसमाज सुखी झाला, तर त्यामुळें आपल्या हितसंबंधास बाधा येईल असें वाटावयास नको. प्रजा जर सामर्थ्यसंपन्न झाली तर त्यांत तुमचें नुकसान नाहीं. पाया मजबूत केला तर वरील कळसाला वाईट वाटण्याचें काय कारण ? किसान-कामगारांवर आपली अनियंत्रित सत्ता राखूं पाहणें व त्यासाठीं उपाययोजना करूं पाहणें म्हणजे स्वतःचें मरण स्वतःच्या खिशांत घेऊन राहणें होय. गोर-गरीब जनता जर बलशाली झाली तर त्यांच्यावर जुलूम करण्याचा मोह होणार नाहीं. तें काम मग करावेंसें वाटणार नाहीं. जमीनदार सावकार म्हणजे कांहीं दुकानदार नव्हेत. पैनपैचा हिशेब पाहण्याची त्यांची दृष्टि नसावी. देत राहण्याची, हृदयें जोडण्याची आपली पूर्वापार परंपरा आहे. ही परंपरा जमीनदार जर पुन्हां चालवणार नाहींत तर उरलीसुरली त्यांची सत्ताहि अस्तास जाईल. जें थोडें फार वैभव अद्याप आहे, तेंहि जाऊन त्यांना दीनांहून दीन व्हावें लागेल.

जमीनदार खेड्यांत न राहतां दूर शहरांत राहतात. खेड्यांवर श्रीमंत होणारे हे लोक शहरांत राहून तेथून कदाचित् थोडीफार दया दाखवतील. परन्तु त्यानें खरा कार्यभाग होणार नाहीं. त्या त्या गांवच्या जमीनदारांनीं त्या त्या गावांतच राहिलें पाहिजे. एका खेड्यांतील माझा अनुभव सांगतों. एका खेड्यांतील कोळ्यांना पोलिसांनीं फार त्रास दिला. मी कोळ्यांना सांगितलें "कलकत्याचा चांगलासा वकील तुमच्यासाठीं देतों. तुम्ही हक्कासाठीं भांडा." परन्तु त्या कोळ्यांचा पुढारी म्हणाला, "महाराज, समजा आम्ही हा खटला जिंकला तरी काय ? पोलिसांची व आमची रोजची गांठ आहे. ते दुसरी कुरापत काढतील व आणखी अधिकच सतावतील, उट्टें काढतील." मी मनांत विचार केला व म्हटलें "खरें आहे. दुबळ्या लोकांना हक्क मिळणें—प्रबळांहून त्यांना अधिक हक्क मिळणें—म्हणजे तर फारच मोठी आपत्ति

आहे!" रोगी फारच दुबळा असेल तर शस्त्रक्रिया नीट पार पडूनहि रोगी शेवटीं दगावयाचाच!

एकदां एक कोंकरूं ब्रह्मदेवाकडे गेलें व म्हणालें "प्रभो, मी काय करूं? सारे मला खातात. असें कां बरें?" ब्रह्मा म्हणाला "मी काय करूं? तुला पाहून खाऊन टाकावें असा मलाहि मोह होत आहे." दुबळ्या व नालायक लोकांस न्याय मिळवून देणें देवांनाहि दुष्कर होतें. मग सरकार व पार्लमेंट आपणांस न्याय देतील अशी आशा करण्यांत काय अर्थ? आपण जसे दीन दुबळे आहोंत, तसेच जगाच्या अंतापर्यंत आपण राहावें, असेंच सरकारचें धोरण दिसून येत नाहीं का? पोलिस अपराधी आहेत, अशा साक्षी जे पोलिसकमिशनपुढें देतात तेच "पोलिसांच्या हातांतील सत्ता कमी करावी, विषारी दांत पाडावे" असें बिल आलें तर त्याविरुद्ध आरडाओरड करतात! कोंकरूं जर थोडें बलवान् झालें तर पुढें त्याला मटकावतांना तें तितकें लुसलुशीत लागणार नाहीं, जरा टणक लागेल अशी त्यांना भीति वाटते. "देवो दुर्बलघातकः" हें चिरंतन सनातन सत्य आहे.

आणि शेवटीं हे देशभक्तीनें उचंबळणाऱ्या तरुणांनो! सर्व हालअपेष्टांस मिठी मारून देशासाठीं मरावयास सिद्ध असणाऱ्या नवजवानांनो! आपल्या मातेचे मंगल आशीर्वाद तुम्ही माझ्या हातून स्वीकारा. आपल्या समोर जें प्रचंड कार्य आहे, तें सर्व संकटांनिशीं आपल्या शिरावर घेण्याकरितां तुम्ही पुढें येत आहांत. खरोखर केवढी ही आनंदाची व सौभाग्याची गोष्ट! जीवनाची जळती उगवती प्रभा म्हणजे तुम्ही. तुम्ही अरुणोदय करीत आहांत, प्रकाशकिरणांचे दूत आहांत. तुमच्यांतील पौरुष जागृत होत आहे. या पौरुषाचें आगमन दणदणाटानेंच, गडगडाटानेंच घोषित केलें जात आहे असें नाहीं. तर या तृषित व तप्त भूमीवर जे प्रेमामृताचे मेघ तुम्ही भरभरून आणीत आहांत, जी सेवेची स्नेहमयी वृष्टी करीत आहांत, तद्द्वाराहि पौरुषच प्रकट होत आहे. तुमचें पौरुष पराक्रमी आहे व प्रेमळ आहे. तें अन्यायाशीं झुंजेल व सेवेंत रंगेल.' वज्राहून कठोर व फुलाहून कोमल असें तुमचें शौर्यधैर्य आहे. लोक पायाखालीं तुडवले जात होते. जनतेचा सर्वत्र धिक्कार केला जात होता. कितीहि अपमान झाले तरी ते मुकाट्यानें गिळण्याची त्यांना संवयच जडली होती. मानवजातीच्या हक्कांची त्यांना विस्मृति पडली होती.

ग्रंथ संग्रहालय, अनुक्रमांक विभाग

अशा सर्वांकडून उपहासलेल्या, आपल्या परित्यक्त दुबळ्या भोळ्या भावंड्यांना लोकांना, आजच्या या प्रेममय, सेवामय व संरक्षण देणाऱ्या ज्ञातविरणांत " बंधु " या शब्दाचा खरा अर्थ कळूं लागला आहे. आजपर्यंत ते बिचारे हा शब्द ऐकत होते. त्या शब्दांतील भावनेचा ऊबदार अनुभव त्यांना कोणी दिला नव्हता.

हिंदुस्थानांतील दु:खी लेंकरांचें दु:ख का एकाच प्रांतांत आहे ? नाहीं नाहीं. दु:खाचा वणवा आमतौर सर्वत्र पेटला आहे. सारे दु:खाच्या नरकांत पिचत आहेत. सारें आकाशच फाटलें आहे या आकाशास कोठवर ठिगळें जोडणार ? दु:ख—हें विराट अनंत दु:ख दूर करावयास तुमचे प्रयत्न पुरे पडणार नाहींत. सर्व दु:खी बंधूंचा सांभाळ तुमच्याकडून होणार नाहीं. म्हणून तुम्ही सर्व बांधवांना स्वत: समर्थ व्हावयास शिकवा, स्वसंरक्षण करून घेण्यास लायक बनवा. त्यांचें दु:ख दूर व्हावयास हाच मार्ग आहे.

तरुण मित्रांनो, कोणत्या तरी एखाद्या खेडेगांवांत जा. तें खेडें स्वत:चें माना. तेथें घरदार करा. तेथेंच रहा. संघटना करा, सेवा करा. स्वावलंबन व सहकार्य यांचे तेथील जनतेस धडे द्या. सहकार्याच्या जोरावर दु:स्थिति कशी दूर करतां येईल तें त्यांना दाखवा, समजावून द्या. ह्या तुमच्या कामामुळें तुम्हांस मान, सन्मान व कीर्ति मिळेल अशी अपेक्षा राखू नका. ज्यांच्यासाठीं तुम्ही झटणार, खटपट करणार, त्यांच्यापासूनहि कृतज्ञतेची अपेक्षा करूं नका, सहानुभूतीची आशा राखू नका. तेहि आपणांस विरोध करतील, नांवें ठेवतील, शिव्याशाप देतील परंतु हें सारें लक्षांत ठेवूनच कामाला लागा. ह्या परिस्थितीस तोंड देण्यास तयार असलें पाहिजे. मरणोन्मुख मनुष्य वातांत असतो व स्वत:च्या मित्रास ढकलतो. त्या अपमानानें चिडून तो मित्र का त्या आजाऱ्याला सोडून जातो ? नाहीं. उलट जास्तच कळकळीनें व प्रेमानें त्याच्याजवळ बसतो व म्हणतो " याच्याजवळून उठतां कामा नये. या वेळेसच याच्याजवळ बसण्याची अधिक जरूरी आहे." आपण हीच गोष्ट हृदयांत धरून काम केलें पाहिजे. आजुबाजूला अपरंपार दु:ख पसरलेलें आहे म्हणून भांबावून जाऊं नका. ह्या अपार दु:खांतील अत्यन्त अल्प दु:ख दूर करण्याचें स्वत:च्या शिरावर घ्या. तुम्हांला मग परमेश्वर मार्ग दाखवल्याशिवाय राहणार नाहीं.

प्रत्येक प्रांतिक सेवामयी समितीनें आपल्या प्रांतांतील खेड्यापाड्यांतून जर अशा शाखा पसरवल्या तर कांहीं आशा आहे. असें आपण करूं तेव्हांच हा देश आपला असें आपणांस अधिकारानें म्हणतां येईल. हा देश आपला आहे असें म्हणतां यावें म्हणून प्रत्येकानें कांहीं सेवा केली पाहिजे, त्याग केला पाहिजे. अशा सेवकांच्या संस्था जेव्हां सर्वत्र दिसूं लागतील, तेव्हांच नसानसांतून जीवनरस उसळूं लागेल. राष्ट्रीयसभा जी आपलें हृदय आहे तिचें कार्य नीट होऊं लागेल. आणि भारतमाता त्या राष्ट्रीय सभेला हृदयाशीं धरील.

आपल्या कामाच्या महत्त्वाचें स्वरूप मी दाखविलें त्याचा थोडक्यांत सारांश असा :—

१. आपण काळाबरोबर पुढें न जाऊं तर मरूं.

२. संघटना हा आजचा मंत्र आहे. आपणांजवळ इतर कोणतेहि व कितीहि गुण असले तरी जोंपर्यंत संघटना नाहीं, तोंपर्यंत या गुणांचा फारसा फायदा होणार नाहीं. संघटित दुर्गुणांविरुद्ध सद्गुणांनींहि संघटित झालें पाहिजे. तरच त्याचा टिकाव लागेल.

३. आपल्या रोमरोमांत खरी राष्ट्रीय वृत्ति अद्याप पूर्णपणें बाणली नाहीं. एक अवयव बळकट करण्यासाठीं जावें, तर दुसरा दुबळा होतो. वरच्या वर्गांतील लोकांनीं सामान्य लोकांत मिसळून काम केलें पाहिजे. सारे श्रेष्ठ-कनिष्ठपणाचे कृत्रिम भेद नष्ट केले पाहिजेत.

४. वादविवाद, चर्चा यांनीं खरी ऐक्यवृत्ति व राष्ट्रीय वृत्ति निर्माण होत नाहीं. सामान्य प्रजा व वरचे वर्ग–यांच्यामध्यें नाना अहंकारजन्य खोटे भेद आहेत. राष्ट्रीय-वृत्ति व खरें ऐक्य यांच्या पूर्ण व योग्य वाढीस हे मोठेच अडथळे आहेत.

५. सुशिक्षित व विचारवंत लोकांतच जर भांडणें होतील तर ध्येय फारच दूर राहील. शेवटीं काय व्हावयाचें तें भविष्यकाळ पाहून घेईल. आपण आपले सारे वादविवाद दूर ठेवूं या. निरनिराळ्या कार्यपद्धति असणार व असाव्यातहि. या बाबतींत एकवाक्यता न झाली, तरी जो प्रचण्ड व अपार कार्यसागर लंघावयाचा आहे तो उल्लंघण्यास काळाचा अपव्यय न करतां ताबडतोब आरंभ करावा या बाबतींत तरी मतभेद नाहीं.

बंधूंनो, आपल्या डोळ्यासमोर आतां सदैव कार्यक्षेत्रच असूं दे. तेंच अहोरात्र दिसूं दे. मग काम काम काम. कामाशिवाय राम नाहीं. स्वातंत्र्याचें सुखधाम नाहीं. आपलें कर्तव्यक्षेत्र विस्तृत व विशाल आहे. जगाच्या इतिहासांत मानवांतील तेजस्वी दिव्यता सदैव कर्मद्वाराच प्रकट होत आली आहे. मनुष्यांतील दिव्यता जेव्हां सेवेच्या व कर्माच्या द्वारा प्रकट होते तेव्हां ती फारच देदीप्यमान व प्रभावी असते. अशा कर्मवीरांना आपण आदरानें व भक्तिभावानें प्रणाम करूं या. समोर अनंत आपत्ति आ पसरून गिळावयास येत असतांहि जे डगमगले नाहींत, अगणित स्वार्थत्याग करावा लागला तरी तो ज्यानीं केला, जे ध्येयार्थच जगले व ध्येयासाठींच मेले, आपल्या देशाला खरें वैभव मिळावें, यश मिळावें, सन्मानाचें स्थान मिळावें, जय मिळावा, म्हणून ज्यांनीं आपलीं जीवनें तृणवत् फेंकून दिलीं त्या सर्व वीरांना आपण वंदन करूं या. अहंकाराची तृप्ति म्हणजे सिद्धी नव्हे. अतःपर स्वतः पुरतें पाहूं नका, क्षणिकाला भुलूं नका, ध्येय डोळ्याआड होऊं देऊं नका. आज कार्य करणारे आपण उद्यां निघून जाऊं. परंतु आपल्यामागें आपलें कार्य राहणार आहे. तें अनंत आहे. तें संपणार नाहीं, सरणार नाहीं. कार्यकारणभावरूप कर्म सारखें वाढतच जाणार. ही पिढी पुढील पिढीच्या हातीं आपल्या कर्माची मशाल देईल व अंतर्धान होईल. पिढ्यान्‌पिढ्या असें चालणार. अखंड काम करणाऱ्या अशा पिढ्यान्‌पिढ्या ज्या राष्ट्रांत निर्माण होतात, त्या राष्ट्रांना तेज चढतें. त्या राष्ट्रांना सामर्थ्य, सुंदरता, सन्मान, सद्यश यांची प्राप्ति होते.

आज आपण दीनदरिद्री असलों तरी तो उज्वल भविष्यकाळ आपण आपल्या अंतश्चक्षूंसमोर सदैव राखूं या. तो उज्ज्वल काळ जेव्हां येईल तेव्हां आपले नातूपणतू असें अभिमानानें म्हणतील कीं "हें सारें आमचें आहे; हें सारें आम्ही निर्मिलें, आम्ही उभारलें, हीं शेतें आम्ही सुपीक व समृद्ध केलीं, हे पाटबंधारे आम्ही बांधले, ही दलदल आम्ही हटवली, हे रोग आम्ही दूर केले. हें वातावरण आम्ही निर्मळ केलें, हें ज्ञान आम्ही पसरविलें, हें बळ आमचें आम्ही मिळविलें, आम्ही आमचें दुर्बलत्व झुगारून हा काळ निर्माण केला; आमच्या भाग्याचे आम्हीच विधाते."

ते आणखी असें म्हणतील कीं "ही भरतभूमि, ही सुजला, सुफला,

सस्यशामला, प्रेमळा, निर्मळा, मंगला भरतभूमी–ही आमची, हो आमची. श्रमानें जगणारें, सत्यानें वागणारें, दुसऱ्या कोणास न नाडणारें, न पाडणारें, संयमशील व सामर्थ्यवंत असें हें आमचें राष्ट्र, या राष्ट्राकडे जो कोणी दृष्टि फेकील त्याला जिकडे तिकडे उद्योग दिसेल, प्रयत्नांची पराकाष्ठा दिसेल. ध्येयांना कृतींत आणण्यासाठीं अहोरात्र चाललेली धडपड दिसेल; ह्या आमच्या राष्ट्रांत सर्वत्र चैतन्य नाचत आहे, उत्साह उसळत आहे, आशा, आनंद व प्रेम यांचीं गाणीं गुणगुणलीं जात आहेत, असें दिसेल. अनंत मार्गांनीं अनंत यात्रेकरू न दमतां न थकतां, त्या उज्ज्वल स्थानाकडे, त्या परममंगल परमेश्वराच्या सिंहासनाकडे धडपडत जात आहेत व त्यांच्या पायाखालीं ही धरत्री डळमळत आहे असें त्याला दिसेल !

# विशाल भारतांत पूर्व-पश्चिमेचा संगम

**निबंध ४ था**

हिंदुस्थानचा इतिहास म्हणजे कोणत्या लोकांचा इतिहास? श्वेतवर्णी आर्य हिंदुस्थानांत आले, त्या वेळेपासून या देशाच्या इतिहासास सुरुवात होते. निसर्गाचे व मानवाचे सारे अडथळे दूर करून विजयी आर्यांनीं भारतांत प्रवेश केला. अफाट जंगलें त्यांनीं तोडलीं. येथील भूमि धनधान्यानें फुलविली. त्यांच्या श्रमानें व कौशल्यानें हिंदी संस्कृतीचा पाया घातला गेला. असे जे ते पहिले आर्य, त्यांनाहि " हिंदुस्थान हा फक्त आमचाच " असें म्हणतां येणार नाहीं.

आर्य व अनार्य परस्परांत मिसळून गेले. विजयी आर्यांनीं अनार्य कुमारिकांजवळ लग्नें केलीं. पुढें बुद्ध काळांत तर जास्तच सरमिसळ झाली. मग जेव्हां ब्राह्मणसमाज आपल्या पडलेल्या भिंती पुन्हां दुरुस्त करूं लागला तेव्हां त्यांनीं त्या भिंती फारच दुर्भेद्य अशा केल्या. त्या पुनर्घटनेच्या काळांत ब्राह्मणांना अनेक गोष्टी दिसून आल्या. देशाच्या कांहीं भागांत वैदिक विधि वगैरे करावयास शुद्ध बीजाचे ब्राह्मण उरलेच नव्हते. त्या भागांत जरूर पडे तेव्हां अन्य भागांतून ब्राह्मण बोलावले जात, किंवा यज्ञोपवीतें देऊन नवीन ब्राह्मण निर्माण करावे लागत. पूर्वी ब्राह्मण हे श्वेतवर्णी होते. परंतु त्यांचा श्वेतवर्ण जाऊन ते पिंगट वर्णाचे बनले. तसेंच या नवीन सामाजिक रचनेंत शूद्रांचाहि समावेश झाला. त्यांचीं दैवतें, त्यांच्या चालीरीती, त्यांचीं ध्येयें यांना सामाजिक पुनर्घटनेंत स्थान मिळालें. अशा प्रकारें बृहद्भारत बनला. मोठा हिंदू समाज तयार झाला. वेदकाळांतील आर्यांच्या समाजापेक्षां हा नवसमाज पुष्कळच बाबतींत भिन्न होता.

आर्य व अनार्य यांच्या संमिश्रणानें बनलेला जो हा मोठा समाज, त्या हिंदूसमाजाचा इतिहास म्हणजेच हिंदुस्थानचा इतिहास अशी मर्यादा घालतां येईल का? हिंदूंचा इतिहास म्हणजेच हिंदुस्थानचा इतिहास असें छातीठोकपणें म्हणण्याची संधि देवानें आपणांस दिली आहे का? नाहीं. कारण या हिंदु हिंदुस्थानांत रजपूत लोक अटीतटीनें व ईर्षेनें आपसांत

भांडत असतांना ज्या फटी उत्पन्न झाल्या, त्यांतून मुसलमानांचे लोंढे आंत घुसले व ते सर्व देशभर पसरले. या हिंदभूमीवर जगून व येथेंच मरून ती भूमि त्यांनींहि आपलीशी केली आहे. आतां जर कोणी ओरडून म्हटलें कीं " थांबा, आतां तरी पुरे करा. हिंदुस्थानचा इतिहास म्हणजे हिंदु-मुसलमानांचा इतिहास. कबूल. " तर तेंहि सत्य नाहीं. परमात्मा मानव जातीचा इतिहास सारखा वाढवून राहिला आहे, रंगवून राहिला आहे. तो थोर विश्वकर्मा तुमच्या आमच्या अहंकारतृप्तीसाठीं स्वतःचे बेत व योजना का बदलणार आहे ?

हिंदुस्थान तुमचा आहे कीं माझा आहे; हिंदूंचा जास्त कीं मुसलमानांचा जास्त; का आणखी तिसरेच कोणी येऊन त्याच्यावर हक्क सांगतात; ह्या गोष्टींशीं सृष्टीचा इतिहास घडविणाऱ्या त्या परमात्म्यास कांहीं एक करावयाचें नाहीं. त्याच्या सिंहासनासमोर हिंदु, मुसलमान, पाश्चिमात्य, सर्वांनीं आपापली बाजू मांडावी व ज्याच्या बाजूनें न्याय मिळेल त्यानें आपला विजयध्वज येथें रोवावा, असें ह्या प्रश्नाचें स्वरूप नाहीं. परस्परविरोधी समाजाचा हा झगडा आहे असें जें आपण मानतों, ती आपली चूक आहे. तो खोटा अभिमान आहे. झगडा जो आहे, तो सत्य व असत्य यांचा आहे. अनादि काळापासून जें दैवी आहे, त्याचा जें आसुरी आहे त्याच्याजवळ सारखा झगडा सुरू आहे. झगडा समाजांचा नसून तत्त्वांचा आहे. जगांतील झगड्यांचें हें असें आंतरस्वरूप आहे.

आपण परिपूर्णतेचें शेवटचें म्हणून जें ध्येय ठरविणार, त्याचा संबंध सर्वात्मकतेशींच असणार. प्रत्येक अडथळा व विरोध यांतून मार्ग काढीत पूर्णता चालली आहे. पुढें जात आहे. पूर्णतेची जी ही प्रगति होत आहे, सत्याची जी ही धडपड चालली आहे, तिच्याशीं ज्या मानानें आपण आपले प्रयत्न एकरूप करूं, त्या मानानें आपल्या प्रयत्नास यश येण्याचा संभव आहे. तुमचे प्रयत्न परिपूर्णतेच्या प्रगतिपर ध्येयाशीं एकरूप नसतील तर ते अपयशी होतील. आपलें तेवढेंच घोडें दामटावयाचें, दुसऱ्याचें, कांहीं का होईना अशा प्रकारचे प्रयत्न व्यक्तिव्यक्तींनीं बनलेलीं राष्ट्रें जर करतील, तर त्या प्रयत्नांना ईश्वराच्या कार्ययोजनेंत स्थान नाहीं. अलेक्झांडरला सारा ग्रीस देश स्वतःच्या सत्तेखालीं आणतां आला नाहीं व त्याची महत्त्वा-

कांक्षा सफळ झाली नाहीं. अलेक्झांडरची इच्छा विफळ झालेली दिसाव-यास मर्त्यलोकीं कांहीं काळ लागला, परन्तु ईश्वराच्या घरीं ती महत्त्वाकांक्षा अलेक्झांडरनें मनांत घरतांच त्याज्य ठरविली गेली होती. कारण त्याच्या महत्त्वाकांक्षेच्या पूर्णतेनें जगाच्या हितांत, जगाच्या मंगलांत का भर घातली जाणार होती? तसेंच रोमन लोकांना जागतिक साम्राज्य स्थापावयाचें होतें. परन्तु रानटी लोकांनीं त्यांच्या आशा धुळींत मिळविल्या. रोमचा गर्व मातींत गेला. परन्तु त्यासाठीं जग अश्रू ढाळीत बसलें नाहीं. रोमन साम्राज्य जग-भर झाल्यानें जग का सुखी झालें असतें? रोमन साम्राज्याचा जगाच्या सुखाशीं काय संबंध होता? ग्रीक व रोमन लोकांत जें थोडें फार चांगलें होतें, तें काळपुरुषानें आपल्या गलबतांत घेतलें आहे, परन्तु ग्रीक व रोमन लोकांना त्यानें गलबतांत घेतलें नाहीं. आणि यामुळें गलबताचें कांहीं एक नुकसान न होतां उलट जो उगीच बोजा वाढला असता तो मात्र कमी झाला. प्रत्येक राष्ट्र, प्रत्येक मानव वंश जें कांहीं हितमंगलजगांत निर्मित आहे, तें काळपुरुष बरोबर घेऊन पुढें जात असतो. राष्ट्रें व जाति नष्ट होतात. परन्तु त्यांनीं निर्माण केलेलें मंगल मरत नसतें. तें जगाच्या सदैव उपयोगीं पडत असतें.

हिंदुस्थानची जी उत्क्रांति होत आहे, जो विकास होत आहे, त्यांमध्यें शेवटीं हिंदूंचा मोठेपणा जगाला दिसणार, का दुसऱ्या एखाद्या जातीचा दिसणार, ही गोष्ट महत्त्वाची नाहीं. हिंदुस्थानांत मानव जातीचा इतिहास एक निराळाच विशेष प्रयोग करून राहिला आहे. सर्वव्यापक व सर्वसंग्राहक जी परिपूर्णता, तिला एक विशेष स्वरूप व आकार देऊन मानव जातीच्या उद्धाराचा विचार येथें चालला आहे. भारताच्या इतिहासांतील हें ध्येय आहे, हें सोनेरी सूत्र आहे. अनंत घडामोडींतील हें सार आहे. हिंदुस्थानांत परमे-श्वराला हें ध्येय मूर्तिमंत करावयाचें आहे. आपापलें क्षुद्र व्यक्तित्व विसरून, जातिविषयक दुरभिमान दूर ठेवून हिंदु असो, मुसलमान असो, ख्रिश्चन असो, जर सारे त्या परिपूर्णतेच्या विशेष ध्येयसिद्धीसाठीं झटतील, तर सत्य व न्याय यांच्या दृष्टीनें कोणाची हानि झाली असें कदापि होणार नाहीं.

विशाल असा भारत निर्मिण्यासाठीं आपणां सर्वांस येथें सहकार्य करावयाचें आहे व केलें पाहिजे. जर कोणतीहि विशिष्ट जात, विशिष्ट समाज वा विशिष्ट

धर्म बंडखोरपणा करील, आपलेंच प्रस्थ स्थापण्याचा प्रयत्न करील, तर राष्ट्राच्या प्रगतींत मोठाच अडथळा येईल. भारतांतील मोठ्या प्रश्नाशीं ज्या जातीला एकरूप होतां येणार नाहीं, जो समाज, जो पंथ, जो धर्म एकरूप व्हावयास नाखूश असेल, त्या सर्वांना आज ना उद्यां नष्ट व्हावें लागेल, गळून पडावें लागेल. जो समाज भारतांत एकांडे शिलेदाराप्रमाणें वागूं लागेल, त्याला मरावें लागेल. जे निरनिराळे भाग परिपूर्णतेच्या महान् ध्येयासाठीं तनमनधनें करून झटतील, तदर्थ स्वतःचें बलिदान करतील, स्वतःचें सारें विसरतील, ध्येयाचें महत्त्व जाणून स्वतःची क्षुद्रता ओळखतील, ते भाग क्षुद्र असले तरी मोठे होतील. ध्येयाच्या भव्य प्रासादांत त्यांना कायम स्थान मिळेल.

हिंदुस्थान ही एक विशाल रंगभूमि आहे. या रंगभूमीवर केवळ हिंदूंनींच सारा खेळ करावा असें नाहीं. परमात्म्याला या रंगभूमीवर जो खेळ करावयाचा आहे, त्यांत हिंदूंचें कांहीं काम आहे, व म्हणून त्यांना येथें बोलावण्यांत आलेलें आहे. हिंदूंनीं ही गोष्ट सदैव ध्यानांत धरावी. जी भूमिका आपणांस करावयाची आहे, ती जर आपणांस नीट करावयाची नसेल तर आपणांस पडद्याआड जावें लागेल. तो महान् व्यवस्थापक रंगभूमीवरून आपणांस दूर करील. प्राचीन संस्कृतीच्या अभिमानानें आपण जर इतरांपासून दूर राहूं, पूर्वीच्या मोठेपणाच्या घमेंडींत राहून अलग बसूं, आपल्याभोंवतीं भिंती बांधून व खंदक खणून जर स्वतःचा सवतासुभा निर्माण करूं, तर परमेश्वर आपलें शासन केल्यावांचून राहणार नाहीं. तो दुःखापाठीमागून दुःख पाठवील व इतरांच्या बरोबरीस तुम्हांला आणील. ज्या मोठेपणामुळें दूर राहूं पाहतां, तो मोठेपणा छाटला जाऊन इतरांच्या उंचीइतकीच तुमचीहि उंची होईल. किंवा परमेश्वरी योजनेंत तुम्ही नीट बसत नाहीं असें समजण्यांत येऊन तुम्हांला अजिबात दूर करण्यांत येईल. ईश्वराला आमचाच काय तो फक्त विकास करावयाचा आहे अशी भ्रामक कल्पना करून अभिमानानें इतरांपासून जर आपण स्वतःस अलग करूं, आपला धर्म फक्त आपल्यापुरता, आपल्या संस्था आपल्यापुरत्या, आपलीं मंदिरें फक्त आपल्यापुरतीं, आपलें ज्ञान आपल्याच खोलींत झांकून ठेवण्यासाठीं, असे जर वागूं, तर आपणच निर्माण केलेल्या या भीषण कारागृहांत आपणांस केवळ मरणाची वाट पहात बसावें लागेल.

आतां तर ब्रिटिशहि आले आहेत. त्यांनींहि भारतीय इतिहासांत महत्त्वाचें स्थान मिळविलें आहे. त्यांचें येथें येणें आगंतुक नव्हतें. जर पाश्चिमात्यांशीं भारताचा संबंध न येता तर जें परिपूर्णतेचें ध्येय त्याला गांठावयाचें आहे, त्यांत मोठीच उणीव राहिली असती. युरोपियन संस्कृतीचा दिवा आज तेजानें उंच तळपत आहे. काळाच्या या विशाल व प्रदीर्घ रस्त्यावर त्या दिव्यावरतीं आपल्याहि मशाली पेटवून घेऊन आपणांस जोरानें पुन्हां पुढें निघालें पाहिजे. आमच्या पूर्वजांनीं जें मिळवायचें होतें तें सारें तीन हजार वर्षांपूर्वीच मिळवून ठेवलें आहे असें म्हणणें आपणांस शोभत नाहीं. विश्वाजवळ नवीन देण्यासारखें कांहीं नाहीं, इतकें का तें दीन व दरिद्री आहे ? विश्व अनंत आहे व ज्ञानहि अनंत आहे. जाणण्यासारखें व मिळवण्यासारखें जें जें कांहीं होतें, तें तें सारें जर आपण जाणलेलें असेल व मिळविलेलें असेल तर आपल्या जगण्यांत तरी काय अर्थ ? ज्यांच्या आजोबापणजोबांनीं सारें ज्ञान हस्तगत केलें, त्यांच्या लेंकरांना आज कर्तव्य तरी कोणतें उरलें ? भविष्यकाळाबद्दलची कोणती आशा व उत्कटता त्यांच्याजवळ असणार ? जुन्या मरतुकड्या रूढी व जुने विचार यांच्या आड लपून बसणाऱ्यांना कर्तव्यक्षेत्र तरी कोणतें उरलें ? अर्वाचीन विचारांपासून दूर राहणाऱ्यांना व जुन्यालाच मिठी मारणाऱ्यांना जगावयासाठीं आशा तरी कोणती, ध्येय तरी कोणतें ? आपलें जगणें मग केवळ अर्थहीन व भूमीला भारभूतच होईल. जर आपल्या जगण्यांत नवीन पुरुषार्थ संपादण्याची शक्यता नसती तर आपलें अस्तित्वच शक्य झालें नसतें.

आपल्या सभोंवतालच्या भिंतींना पडलेल्या भगदाडांतून इंग्रजहि आंत आले. जगांतील महोत्सवाला तुम्हीहि चला, जगाच्या कारभारांत तुम्हीहि भाग घ्या, असें आपणांस आमंत्रण देण्यासाठीं त्यांना पाठविण्यांत आलें आहे. ईश्वराचे ते जणुं दूत आहेत. आपलीं कांहीं लेंकरें एकलकोंडेपणानें जगावर रुसून बाजूला बसलीं आहेत हें परमेश्वरास पहावलें नाहीं. जगाच्या संसारांत आपण सामील झालें पाहिजे. आपल्याजवळ जें कांहीं चांगलें असतें तें तेथें घेऊन जाऊं या. आपणांस जो आनंद, जें साहाय्य जगाला देतां येईल तें देऊं या. आपण आपले विचार, आपलीं ध्येयें घेऊन तेथें जाऊं या. आपला संसार दुसऱ्यांना दाखवूं, दुसऱ्यांचा संसार आपण पाहूं. आपण जगाची

दृष्टि वाढवूं व स्वतःचीहि वाढवून घेऊं. हें सर्व आपण केलें पाहिजे. त्याशिवाय सुटका नाहीं. इंग्रजहि एक संदेश घेऊन आला आहे. तो संदेश नीट ऐकून पश्चिमेला भेटण्यासाठीं जोंपर्यंत आपण निघणार नाहीं, तोंपर्यंत इंग्रज आपणांस टोंचीत रहाणार, बोंचीत रहाणार. तो आपणांस शांत बसूं देणार नाहीं. सुखानें खाऊं देणार नाहीं, स्वस्थपणें झोंप घेऊं देणार नाहीं. इंग्रज मनुष्य येथें पाठविण्यांत जो ईश्वराचा हेतु होता, तो हेतु ओळखून जोंपर्यंत आपण तत्सिद्ध्यर्थ खटपट करणार नाहीं, तोंपर्यंत इंग्रजांच्या पकडींतून सुटण्याची आपणांस बिलकूल आशा नको.

इंग्रज संदेश घेऊन आला आहे. परन्तु तो संदेश कोणत्या भारतासाठीं? खरेंच, कोणत्या बरें भारतासाठीं? भूतकाळाच्या बीजांतून भविष्यकाळाच्या सुंदर अंकुराकडे जाणारा हा जो नवभारत, तरुणभारत, त्या भारताला इंग्रज संदेश घेऊन आला आहे. हा नवभारत अखिल मानवजातीसाठीं उभा आहे. सर्व विश्वास मिठी मारण्यासाठीं उत्सुक आहे. या नवभारतांत अमक्याला स्थान आहे. तमक्याला नाहीं, अमक्याला प्रवेश आहे, तमक्याला नाहीं, असें म्हणणारे जे आम्ही ते आम्ही कोण? बंगाली, पंजाबी, सिंधी, मराठी, हिंदु, मुस्लीम यांपैकीं या आम्हींत कोणाचा अंतर्भाव होतो? आम्ही म्हणजे अमुक एक असें कांहीं नाही. आमचा जो मोठा आम्ही, त्या आम्हीमध्यें हिंदु, मुसलमान, इंग्रज, सारे येणार. सर्वांचा अंतर्भाव होणार. सर्वांमिळून जो सर्वसंग्राहक बलवान् “ आम्ही ” होईल, त्या आम्हीं येथें कोणी रहावें व कोणी राहूं नये हें सांगण्याचा हक्क आहे. संकुचित व क्षुद्र आम्हींस तो हक्क नाहीं.

असा हा विशाल अभिनव भारत उभारण्याची महान् जबाबदारी आज आपणांवर येऊन पडली आहे. ही जबाबदारी पार पाडण्यासाठीं आपलें प्रत्येकाचें हें पहिलें कर्तव्य आहे कीं इंग्रजांची व आपली जी गांठ पडली, तिचा खरा अर्थ समजून घेणें. आम्हीं अलग राहूं, सहकार्य करणार नाहीं, उदासीन राहूं, हातांत हात घालणार नाहीं, कुणाशीं देवाण घेवाण करणार नाहीं, असें जर आपण ठरवूं, तर असल्या अभद्र लक्षणांनीं आपण आपला भारत अधिकच दुबळा व दरिद्री करूं. अतःपर कोपऱ्यांत बसून चालणार नाहीं.

भारतवर्षांत अर्वाचीन काळीं ज्या मोठमोठ्या विभूति झाल्या त्या सर्वांचे

प्रयत्न पूर्व व पश्चिम यांना जवळ आणण्यासाठीं होते. त्यांचें हें जीवनकार्य होतें. अगदीं ठळक म्हणून राजा राममोहन राय यांचें उदाहरण घ्या. १९ व्या शतकाच्या आरंभीं ह्या देशांत राममोहन राय ही एकच महान् विभूति ह्या दिव्य व उच्च भूमिकेवर उभी होती.' मानवजातीच्या विशाल पायावर भारताचें व जगाचें ऐक्य व्हावें ही गोष्ट १०० वर्षांपूर्वीं एकट्या राममोहन रायांनाच दिसत होती. त्यांच्या त्या दिव्य दृष्टीला कोणतीहि अंध-श्रद्धा, परंपरागत रूढी वा आचार यांची बाधा झाली नाहीं. विशाल हृदय व अपूर्व बुद्धि या दोन्हींच्या साहाय्यानें पूर्वेला न सोडतां त्यांनीं पश्चिमे-लाहि मिठी मारली. नवबंगालला त्यांनींच जन्म दिला.

आपलें कार्यक्षेत्र व ज्ञानक्षेत्र वाढावें म्हणून राममोहन राय झटले. त्यांना कष्ट पडले, त्यांचे छळ झाले परंतु त्यांनीं आनंदानें सारें सहन केलें. पूर्वे-पासून तों थेट पश्चिमेपर्यंत आपलें कार्यक्षेत्र व विचारक्षेत्र वाढावें, सत्य-संशोधनाचे मानवाचे जे प्राचीन व अनादि हक्क आहेत, ते आपल्या बंधूंस मिळावे, ह्या सर्व पृथ्वीचे आपण वारसदार आहोंत, ही गोष्ट आपल्या बंधूंना पटावी, म्हणून राममोहन झटले व झगडले. " बुद्ध, खिस्त व महंमद यांनीं आमच्यासाठीं देह दिले, " ही महान् वाणी प्रथम ऋषि राममोहन यांनींच उच्चारिली. महान् विभूतींनीं तपश्चर्येनें जें मिळविलें तें सर्व मान-वजातीसाठीं आहे. ह्या पृथ्वीवर ज्ञानाच्या मार्गांतील अडचणी दूर करण्यासाठीं मृत व दुष्ट रूढी नष्ट करण्यासाठीं, जे महात्मे लढले, ते एका विशिष्ट राष्ट्राचे वा जातीचे नसून सर्व विश्वाच्या मालकीचे आहेत. भारतीय ऋषि जगाचे आहेत व जगांतील सारे महर्षि भारताचेहि आहेत. त्या सर्वांच्यामुळें आपण सारे मोठे झालों आहोंत. ह्या सर्व विभूतींनीं मानवजातीस वर चढविलें आहे.

जुन्या भिंती मजबूत करा, पडलेले कोट पुन्हां बांधा, असें राममोहन राय यांनीं सांगितलें नाहीं. दिक्कालातीत व्हा असें त्यांनीं सांगितलें. जगाच्या विशाल अंगणांत, काळाच्या महान् रंगणांत या असें त्यांनीं हिंदी जनतेस सांगितलें. पूर्व व पश्चिम यांना जोडण्यासाठीं आपण महान् सेतु बांधूं या, असें ते हिंदी जनतेस म्हणाले. राममोहन अशा विशाल दृष्टीचे होते, म्हणून आजहि स्फूर्तिरूपानें ते आपणांत वावरत आहेत. कांहीं तरी नवीन निर्माण करा असा त्यांचा संदेश आजहि स्फूर्ति देत आहे. राममोहन यांनीं काळाचा

हेतु ओळखला. उगीच आंधळेपणानें, जात्याभिमानाची क्षुद्र व संकुचित दृष्टि ठेवून काळाच्या हेतूविरुद्ध, ईश्वरी इच्छेविरुद्ध त्यांनीं बंड पुकारलें नाहीं.

हें महनीय ध्येय प्राचीन काळापासून आपल्या देशासमोर ठेवलें गेलें आहे. या ध्येयकमलाची एकेक पाकळी उघडत आहे. ह्या ध्येयराजाची पताका फडकवणारे राममोहन राय हे महान् वीर होते. त्यांना माघार माहिती नव्हती. ध्येयराजाचा भव्य ध्वज हातीं घेऊन ते निर्भयपणें पुढें गेले.

दक्षिणेकडे महाराष्ट्रांत न्यायमूर्ति रानडे यांनीं याच ध्येयासाठीं आमरण प्रयत्न केले. एकीकरणाची अपूर्व बुद्धि त्यांच्याजवळ उपजतच होती. जन्मतांच विशाल दृष्टि घेऊन ते आले होते. माणसें एकत्र आणावीं, सहकार्याचा सुंदर वृक्ष वाढावा, ही जाणीव त्यांना सदैव असे. यांतच त्यांचा आनंद होता. समाजाला क्षुद्रतेंतून वर नेणारी, ज्ञान, प्रेम व सत्संकल्प यांच्या मार्गांतील सर्व अडचणी, सर्व विरोध दूर करणारी, अशी थोर स्वयंभू प्रज्ञा त्यांच्याजवळ होती. ते ईश्वरी देण्याचे महापुरुष होते. अशी थोर दृष्टि त्यांच्याजवळ होती, म्हणूनच त्यांच्या काळीं प्रचलित असलेल्या सर्व क्षुद्र विचारांच्यावर ते उड्डाण करूं शकले. नाना कल्पना व विचार यांच्या रस्सीखेंचींत, हिंदी व ब्रिटिश यांच्या परस्परविरोधी हितसंबंधाच्या झगड्यांत जरी ते उभे होते, तरी त्यांनीं पूर्वपश्चिमेच्या ऐक्याचा ध्रुवतारा दृष्टिआड होऊं दिला नाहीं. रानड्यांचें हृदय सागराप्रमाणें होतें, मन गगनाप्रमाणें होतें. हिंदुस्थानचा नवीन उज्वल इतिहास बनविण्यासाठीं पाश्चिमात्यांपासून मोलाचें सारें घेतलें पाहिजे असें ते म्हणत. यासाठीं ते झटले. असें करतांना त्यांचा उपहासहि झाला. त्यांना विरोध झाले. त्यांनीं तें सारें सहन केलें. त्यांच्या क्षमेला व सहनशीलतेला सीमा नव्हती. हिंदुस्थाननें परिपूर्णता गांठावी असें त्यांना वाटे. या परिपूर्णतेच्या ध्येयाच्या मार्गांत ज्या ज्या अडचणी दिसल्या, त्या दूर करण्यासाठींच त्यांचे सारे यत्न होते.

आणि ते स्वामी विवेकानंद—तो थोर अवलिया. महान् संन्यासी ! त्यांनींहि हेंच सांगितलें. त्यांच्या एका बाजूस पूर्व व दुसऱ्या बाजूस पश्चिम उभी होती. पूर्व व पश्चिम हे जणुं त्या महापुरुषाचे दोन विशाल बाहु होते. भारतानें पूर्वीच्या संकुचितच जागेंत बसावें असें त्यांना कधींहि वाटलें नाहीं. पश्चिमेचें जें आगमन झालें आहे, त्यांत खोल अर्थ आहे असें त्याना वाटे. विवेका-

नंदांची बुद्धि एकीकरण करणारी होती, जोडणारी होती. पूर्वेकडील विचार व ध्येयें यांचा प्रवाह पश्चिमेकडे जावा व पश्चिमेकडचे विचारप्रवाह इकडे यावेत असें त्यांना रात्रंदिवस वाटे. हा विचारांचा व्यापार नीट चालावा, ही देवघेव सुकर व्हावी म्हणून ते एक मोठा हमरस्ता तयार करीत होते व त्यासाठींच त्यांनीं सारें जीवन दिलें.

ऋषि बंकिमचंद्र, यांचेंहि हेंच जीवनकार्य होतें. वंगदर्शन मासिकाच्या पानापानांतून पूर्वपश्चिमेला त्यांनीं एकत्र मेजवानीला बसविलें होतें असें दिसून येईल. त्यांच्या वेळेपासूनच बंगाली वाङ्मयांत नवचैतन्य आलें. काळाची हांक वाङ्मयानें ऐकली. कलेनें युगधर्म ओळखला. कृत्रिमबंधनें तडातड तोडून वंगसाहित्याचा आत्मा पंख फडफडवित बाहेर पडला व जागतिक वाङ्मयाशीं त्यानें मैत्री जोडली. बंगाली वाङ्मयानें विशिष्ट रीतीनें वाढ करण्याचें ठरविलें. पाश्चिमात्य ध्येयें व शास्त्रें मिळवून घेण्याचें निश्चित केलें. बंकिमचंद्रांनीं जें लिहिलें त्यामुळें ते तेवढे मोठे नाहींत परन्तु विकासाचा नवपंथ त्यांनीं दाखवला, म्हणून ते मोठे. नवपंथ निर्माण करणारे बंकीम, विकासाचा नवा भव्य मार्ग दाखवणारे बंकीम, आनंदमठ व विषवृक्ष कादंबऱ्या बंकिमांपेक्षां कितीतरी पटीनें थोर आहेत.

सारांश, कोणत्याहि बाजूनें जाऊन पहा. धर्म, राजकारण, वाङ्मय, कोणत्याहि क्षेत्रांत जाऊन बघा. हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासांत जे महान् पुरुष झाले, ज्या थोर विभूति झाल्या, ज्यांच्या ज्यांच्या जीवनांतून कांहीं दिव्यता प्रकट झाली, त्या सर्वांच्या जीवनांतील खरें रहस्य म्हणजे ही विशाल दृष्टि होय. त्यांच्या दृष्टींत पूर्व व पश्चिम अविरोधानें नांदत. पूर्व व पश्चिम जणुं त्यांचे दोन डोळे. त्यांच्या बुद्धींत पूर्वपश्चिमेचा विरोध नव्हता, झगडा नव्हता. दोन्हीं मिळून नवीन मधुरतम उदात्त संगीत निर्माण करणारे ते होते.

आपल्यांतील कांहीं सुशिक्षितांना वाटतें कीं हिंदुस्थानांतील अनेक जाति, धर्म व पंथ यांच्यांत जें ऐक्य घडवून आणावयाचें आहे, तें केवळ राजकीय सत्ता मिळविण्याठीं म्हणून होय. परन्तु असें मानण्यानें मोठ्या वस्तूला आपण लहान वस्तूची पूरक बनवीत आहों ! आपण पुष्कळ वेळां असें करतों. परन्तु आपल्या ऐक्यानें जें साधणार आहे किंवा मिळणार आहे,

त्यापेक्षां ऐक्य ही कितीतरी अधिक मोलाची वस्तु आहे. ऐक्य हेंच मानवजातीचें खरें कार्य आहे. यांतच सर्व परिश्रमांची परिसमाप्ति व्हावयाची आहे. आपणांमध्यें ऐक्य होत नाहीं. याचें कारण आपल्यांत मुळांतच कोठेंतरी महान् दोष असला पाहिजे. आणि त्यामुळें जिकडेतिकडे आपणांस आपल्या शक्तीचा अभाव दिसून येतो. आपल्याच पापानें आपलाच धर्म नष्ट होतो व धर्म नष्ट झाला म्हणजे सर्वनाशहि निश्चित.

सत्यधर्माला डोळ्यांसमोर ठेवून जर ऐक्याचे प्रयत्न आपण करूं, तर ते यशस्वी होतील. मुत्सद्देगिरीनें व आपमतलबीपणानें हें ऐक्य निर्माण करतां येणार नाहीं. संकुचित व क्षुद्र वातावरणांत सत्य व न्याय्य गोष्टी जगूंच शकत नाहींत. तात्पुरती गरज काय, इकडे सत्याचें लक्ष नसतें. आपल्या वर्तनाचा सत्य जर ध्रुवतारा होईल, तर आपल्या प्रयत्नांत केवळ हिंदुस्थानांतीलच निरनिराळे पंथ व जाती सामील होतील असें नाहीं, तर या सत्कर्मास इंग्रजहि हातभार लावतील.

असें जर आहे तर मग आज इंग्रज व हिंदी, सुशिक्षित व अशिक्षित हीं जीं द्वैतें दिसतात, हे जे विरोध दिसतात, त्यांचें काय करावयाचें ? हे विरोध का केवळ काल्पनिक आहेत ? या विरोधांच्या मुळाशीं का कांहींच सत्य नाहीं ? भारतीय इतिहासांत आजपर्यंत ज्या अनंत घडामोडी झाल्या, ज्या अनेक क्रियाप्रतिक्रिया झाल्या, त्या सर्वांपेक्षां हा प्रस्तुतचा विरोध का कांहीं वेगळा आहे ? या विरोधाचें स्वरूप तरी काय ? तें समजून नको का घ्यावयाला ?

आपल्या धार्मिक वाङ्मयांत विरोध हाहि एक भक्तीचा प्रकार मानला आहे. रावणानें जी लढाई केली, तिनेंच त्याला मोक्ष मिळाला याचा अर्थ हा कीं सत्याशीं पुरुषार्थपूर्वक झगडा करून शेवटीं आपला पराजय मान्य करणें, म्हणजेच सत्याशीं अधिक यथार्थपणें एकरूप होणें होय. ताबडतोब एखाद्या गोष्टीचा स्वीकार करणारा ताबडतोब ती गोष्ट सोडीलहि. असला स्वीकार खरा स्वीकार नव्हे. यासाठींच सर्व शास्त्रें संशयावर उभारतात. शंका घ्यावयाची व तिचें निरसन करावयाचें. शास्त्राचा जन्म संशयांत आहे. स्वतःच्या सर्व शंका आशंका फेडून घेऊन मग एखाद्या तत्त्वाचा जेव्हां आपण स्वीकार करतों तेव्हां तें मग एकाएकीं आपण सोडीत नाहीं.

पाश्चिमात्यांशीं संबंध येतांच आपण स्वतःची सारी विवेकशक्ति गुंडाळून ठेवून जें जें पाश्चिमात्यांचें दिसेल तें तें मूर्खपणें, भिकाऱ्याप्रमाणें, अधाशासारखें घेत सुटलों. परंतु अशा घेण्यानें खरें हित होत नाहीं. ज्ञान असो वा राजकीय हक्क असोत, कष्टानें प्राप्त करून घेतलीं पाहिजेत. विरोधी शक्तीशीं यशस्वी रीतीनें झगडून या वस्तु मिळवायच्या असतात. स्वातंत्र्याची वा ज्ञानाची जर कोणी आपणांस भीक घातली तर त्या वस्तूंबद्दल आपणांस अभिमान वाटणार नाहीं. झोळींत मिळालेल्या तुकड्यांबद्दल का अभिमान वाटतो ? भिक्षांदेहीचें स्वातंत्र्य आपल्या खऱ्या मालकीचें होणार नाहीं. वाटेल तो येईल व थोबाडींत मारून ही झोळी हिरावून नेईल. स्वतःला लाचार करून कांहीं मिळविणें यांत काय पुरुषार्थ ? ज्यांत आपली मानखंडना आहे, अशा स्वरूपांत कोणतीहि वस्तु स्वीकारणें यांत कांहीं अर्थ नाहीं. त्यांत आपलें नुकसान आहे, नाश आहे. आणि हें जाणूनच युरोप व युरोपचीं ध्येयें यांच्याशीं आपण झगडत आहोंत. आपला अभिमान खंडित झाला आहे व म्हणून पुन्हां आपल्या घरांत परत येऊन आपण बसलों आहोंत.

हें असें माघारें येणें अगत्याचें होतें. या भरतभूमींत परमेश्वर जो इतिहास घडवून आणीत आहे, त्यांतील हेतु ओळखण्यासाठीं असें माघारें मुरडणें आवश्यकच होतें. जें आपण दुबळेपणानें, अधाशाप्रमाणें, बरें वाईट न पाहतां, घेत सुटलों होतों, त्याची योग्य किंमत कळणें अशक्य झालें होतें. जें श्रमानें झगडून आपण मिळवतों, त्याची महती आपण जाणतों, त्याची किंमत ओळखतों. पाश्चिमात्यांचें जें जें आलें, तें आपलें भरलें घरांत, असें जर आपण केलें असतें, तर त्यांच्या विचारांचें, त्यांच्या ध्येयांचें खरें मोल आपणांस कळतें ना. आणि वस्तूचें मोल कळल्याशिवाय आपण तिचा जीवनांत उपयोग तरी कसा करणार ? पाश्चिमात्य विचारांना, शोभेचा एक दागिना, एवढेंच महत्त्व आपण देत होतों. आणि ही गोष्ट जेव्हां आपणांस कळून आली तेव्हां हें जड ओझें फेंकून देण्यास आपण सिद्ध झालों.

पाश्चिमात्य विचार व ध्येयें, यांच्याशीं राममोहन राय एकरूप होऊं शकले. कारण पाश्चिमात्य विचारांनीं ते दिपून गेले नव्हते. त्यांचें हृदय दरिद्री व दुबळें नव्हतें. ते स्वतःच्या भूमिकेवर उभे होते. स्वतःचें भरलेलें घर त्यांना होतें व मिळविलेलें नीट त्या घरांत ठेवतां येत होतें. हिंदुस्थानांतील

विचारांची, ध्येयांची खरी संपत्ति त्यांच्याजवळ होती. तो जुना ठेवा त्यांनीं दिपून जाऊन गमावला नव्हता. ते स्वतः असे ज्ञानधन असल्यामुळें, भारतीय विचारसंपत्तीनें संपन्न असल्यामुळें, दुसऱ्यांच्या विचारसंपत्तीचें मोल करण्यास त्यांच्याजवळ कसोटी होती. ज्याच्याजवळ हिरेमाणकें पडलेलीं आहेत, तोच नवीन आलेल्या हिऱ्यांची परीक्षा करील. राममोहनरायांजवळ भारतीय ज्ञानभांडार भरपूर होतें. पाश्चिमात्य विचारांची पारख करून त्यांतीलहि भर या भारतीय भांडारांत त्यांनीं घातली. भिकाऱ्याप्रमाणें हात पुढें करून स्वतःला त्यांनीं विकलें नाहीं व जें दिसेल तें न पारखतां खिशांत कोंबलें नाहीं. पाश्चिमात्य विचारांचा त्यांना बाऊ वाटला नाहीं. बोजा वाटला नाहीं. त्यांची पचनशक्ति समर्थ होती व पाश्चिमात्य विचारहि त्यांनीं सहज पचविले.

आपल्या ह्या पहिल्या थोर पुढाऱ्यांत जी ही शक्ति होती, ती हळुहळू आपणांतहि येत आहे. नाना प्रकारच्या धडपडींतून व विरोधांतून ही शक्ति वाढत आहे. लंबकाप्रमाणें आपण त्या टोंकाला जातों, कधीं या टोंकाला येतों. कधीं कधीं शतजन्मांचें जणुं उपाशी अशा अधाशीपणानें पाश्चिमात्यांचें सगळेंच्या सगळें अर्पिण घेऊं पाहतों, तर कधीं रागानें त्यांचें सारेंच भिरकावून दूर राहूं पाहतों. असें चाललें आहे. परंतु यांतूनच आपल्या ध्येयाकडे आपण जात आहोंत. आपलें पाऊल पुढेंच पडत आहे. एक दिवस असा येईल कीं लंबक स्थिर होईल, आपणांस योग्य तें प्रमाण सांपडेल.

सारासार विवेक न करतां भरमसाटपणानें ज्या शेंकडों परकी कल्पना आपण घेतल्या, त्या सर्व फेंकून देण्यासाठीं आपण उठलों आहोंत. परंतु या आपल्या असहकाराचें हें एकच कारण नाहीं.

पश्चिम दिशा आपणांकडे अतिथि म्हणून आली आहे. अतिथीच्या या येण्यांत जो हेतु आहे, तो पुरा होईपर्यंत अतिथीला परत पाठवणें योग्य होणार नाहीं. या पाहुण्याला योग्य तें स्थान व योग्य तो मान दिलाच पाहिजे. पश्चिमात्यांचा खरा मोठेपणा आपणांस कळत नाहीं म्हणून, किंवा पाश्चिमात्यच आपलें खरें मंगल रूप येथें प्रकट करीत नाहीं म्हणून म्हणा, किंवा आणखी कांहींहि कारण असो; जर त्यामुळें काळाचा जो हा महान्

प्रवाह कांहीं विशिष्ट हेतूनें वहात आला आहे, त्याला जर धक्का घातला गेला, बांध घातला गेला, तर महान् नाश होईल यांत शंका नाहीं.

इंग्रजांमध्यें जें सुंदर आहे, मंगल आहे, उत्कृष्ट आहे, त्याचें जर येथें आपणांस दर्शन झालें नाहीं, इंग्रज म्हणजे एक बनिया, उदारभावनाशून्य द्रव्यपूजक, हडेलहप्पी करणारा नोकरशाहीचा एक पित्त्या, असेंच जर आपल्या अनुभवास नेहमीं आलें; मनुष्य मनुष्याला ज्या ठिकाणीं मोकळेपणानें भेटतो, बोलतो संवरतो, विश्वास दाखवितो, अशा भूमिकेवर जर इंग्रज कधीं येणारच नाहीं; तो जर नेहमी उंच हवेंतच अहंकारानें राहील; आणि अशा रीतीनें इंग्रज व हिंदी लोक जर सदैव दूर दूरच रहावयाचे असतील, तर दोघांसहि केवळ दु:ख व ताप यांचीच प्राप्ति होणार यांत शंका नाहीं. अशा स्थितींत जो सत्ताधीश असेल तो दडपशाहीचे कायदे करून असंतोष दूर करूं पाहील. परन्तु अशानें असंतोष कायमचा दूर करतां येणार नाहीं. इंग्रजालाहि या स्थितीनें कायमचें समाधान राहील असें नाहीं.

एक काळ असा होता कीं ज्या वेळेस डेव्हिड हेअरसारखे थोर मनाचे इंग्रज लोक आपल्याजवळ प्रेमानें आले. इंग्रजी स्वभावांतील भलाई त्यांनीं दाखविली. त्या काळांतील हिंदी विद्यार्थ्यांनीं आपलीं हृदयें ब्रिटिशांस अर्पण केलीं होतीं. परंतु आजचा जमाना बदलला आहे. आजचा हिंदुस्थानांतील इंग्रज प्रोफेसर इंग्रजांतील चांगुलपणाचा प्रतिनिधि राहिला नसून, त्यांच्या चारित्र्याला तो काळिमा फांशीत आहे. पूर्वीं ज्याप्रमाणें विद्यार्थी इंग्रजी वाङ्मयांत रंगून जात, शेक्सपिअर व बायरन यांच्याबद्दल त्यांना जें कांहीं वाटे, तसें आज कांहींएक राहिलें नाहीं.

शिक्षणाच्याच बाबतींत हें असें झालें आहे असें नाहीं. इंग्रज मनुष्य, मग तो प्रोफेसर असो वा पोलीस अधिकारी असो, न्यायाधीश असो वा व्यापारी असो, स्वतःच्या संस्कृतींतील उत्कृष्टपणा तो प्रकट करीत नाहीं. यामुळें इंग्रजांच्या येण्यामुळें जो सर्वांत मोठा फायदा व्हावयाचा तो होत नाहीं. हिंदुस्थानचा पदोपदीं उपमर्द केला जातो, तेजोभंग केला जातो. भारतीयांची सर्व प्रकारची शक्ति खच्ची केली जात आहे. यामुळें इंग्रजांबद्दलची निष्ठा, आदर सारें नाहींसें झालें आहे.

पूर्व व पश्चिम जवळ येऊं शकत नाहींत, म्हणून हा असंतोष माजून

राहिला आहे. एकमेकांजवळ सदैव रहावें तर लागतें, परन्तु एकमेक मित्र तर होऊं शकत नाहीं. ही स्थिति अति दुःखाची व दुर्दैवाची होय. ही भयंकर परिस्थिति आहे. याहून दुसरी कोणती भयंकर आपत्ति? ही परिस्थिति लौकर नष्ट करूं या, लौकर बदलूं या, असा ध्यास हृदयास लागला पाहिजे. हृदयांतील सद्भावनेनें असल्या भीषण परिस्थितीविरुद्ध बंड केलें पाहिजे. या बंडांत नफानुकसानीकडे न बघतां आपण सर्वस्व पणास लावलें पाहिजे.

परन्तु हृदयांतील सद्भावनेचें बंड कायमचें टिकत नसतें हीहि गोष्ट खरी. तें क्षणिक वादळ असतें. कांहीं असो. किती जरी प्रगतिविरोधक, निराशाजनक अशी परिस्थिति असली, तरी एक गोष्ट सत्य आहे, कीं हा जो पूर्वपश्चिमेचा संबंध जडला आहे, त्यांतून कांहीं तरी मंगल निर्माण करून घेतल्याशिवाय मोक्ष नाहीं. पश्चिमेपासून जें जें घेण्यासारखें आहे, जें जें चांगलें आहे, तें तें घेतल्यावांचून आपली सुटका नाहीं. फळ पिकल्याशिवाय देंठापासून सुटत नाहीं. आणि पिकण्यापूर्वींच जर देंठापासून तें अलग होण्याचा प्रयत्न करील तर तें कधीं पिकणार नाहीं.

समाप्तीपूर्वीं आणखी एक गोष्ट सुचली ती जातां जातां सांगतों. इंग्रजाला येथें स्वतःचा चांगुलपणा प्रकट करतां येत नाहीं, ह्याला आपणच मुख्य कारणीभूत आहोंत. जर आपण आपलें दारिद्य घालवूं, जर आपण मोठे होऊं तर इंग्रजहि हृदयाची श्रीमंती प्रकट करण्यांत कंजूषपणा दाखवणार नाहीं. जें देण्यासाठीं देवानें इंग्रजास येथें पाठविलें आहे, तें त्यानें आपणांस देण्यापूर्वीं प्रत्येक क्षेत्रांत आपण श्रमाची पराकाष्ठा केली पाहिजे. आपली शक्ति वाढविली पाहिजे. इग्रजांच्या दारांत रिक्तहस्तानें भिक्षांदेहि करण्यांतच जर आपण कृतकृत्यता मानूं, तर पुनःपुन्हां आपणांस गचांडीच मिळणार यांत शंका नाहीं.

आळशी व सुस्त, कर्महीन व शक्तिहीन, निरुत्साही व उदासीन जर आपण सदैव राहूं तर इंग्रजांतील जें चांगलें तें आपणांस मिळवतां येणार नाहीं. इंग्रजानें आपली कींव करावी ही तर सर्वांत नामुष्कीची गोष्ट. आपल्यामधील पुरुषार्थानें व माणुसकीनें इंग्रजांतील पुरुषार्थ व माणुसकी जागृत झालीं पाहिजेत. तेज तेजाला जागृत करतें, माणुसकी माणुसकीला जागृत करते.

इंग्रजालाहि अनेक हालअपेष्टांतूनच स्वतःच्या तेजाचा साक्षात्कार करून घेतां आला. आपणहि तशीच शक्ति स्वतःच्या ठिकाणीं उत्पन्न केली पाहिजे. उत्कृष्ट व श्रेष्ठ वस्तु मिळविण्याचा मार्ग कष्टाचा व श्रमाचाच असतो.

आपणांतील कांहीं लोक इंग्रजांच्या दरबाराला जातात. तेथें ते माना खालीं घालतात, गोंडे घोळतात. हेतु हा कीं मोठ्या पदव्या मिळाव्या वा बड्या पगाराच्या जागा मिळाव्या. स्वार्थासाठीं आपण लालचावून तेथें जातों. अशानें इंग्रजांतील जें हीन, त्याचीच आपण पूजा करूं पाहतों. इंग्रजांचा चांगुलपणा आपण प्रकट होऊं देत नाहीं. तसाच दुसराहि एक प्रकार आहे. ते इंग्रजांची हांजी हांजी न करतां, त्यांचे खून पाडूं पाहतात. परन्तु यामुळें इंग्रजांतीलहि खुनशी वृत्तीच जागृत होते. लाळघोटे, स्वाभिमानशून्य लोक किंवा विकारवश प्रखर तरुण दोघेहि इंग्रजांतील वाईट तेवढेंच प्रकट होण्यास कारणीभूत होतात. ह्या आपल्या दोन्हीं प्रकारच्या दुबळेपणामुळें इंग्रजामधील दुष्टपणा, लोभीपणा, उर्मटपणा, भ्याडपणा, जर प्रकट झाला तर त्याला नांवें कां ठेवावीं ?

इंग्रज मनुष्याच्या हृदयांतील नीच वृत्ति त्याच्या स्वतःच्या देशांत संयमाखालीं असतात. तेथें त्याची पशुता वर डोकें काढूं शकत नाहीं. त्याच्या आजुबाजूची सामाजिक शक्तीच इतकी प्रभावी असते कीं त्याच्या हृदयांतील उत्कृष्ट गुणच नेमके प्रकट होतात. तेथील समाज जिवंत आहे व प्रत्येकाला उंच भूमिकेवर राहण्यास भाग पाडतो. परन्तु हिंदुस्थानांत जो इंग्रजसमाज आहे, तो येथील इंग्रज मनुष्यावर असें नियंत्रण घालूं शकत नाहीं. येथील ॲंग्लोइंडियन समाज म्हणजे खरा इंग्रज समाज नव्हे. येथील ॲंग्लोइंडियन समाज म्हणजे कांहीं व्यापारी, कांहीं शिपाई व कांहीं कलेक्टर यांचा एक गट. या गटांतील प्रत्येक व्यक्ति, रूढी व परंपरा, गैरसमज व खोट्या कल्पना यांनीं जखडून जाते. त्यांचें मन ठरींव सांच्याचें बनून जातें. हायकोर्टाचा न्यायाधीश जर इंग्रज असेल तर न्यायाविषयीं आपण निराश होतों. सत्य व सरकारी नोकरशाही यांच्या बाबतींत न्याय मिळावयाचा असेल तर सत्याला मूठमाती मिळावयाची हें जणुं ठरलेलेंच असतें.

ब्रिटिशांची खरी दिलदारी व न्यायप्रियता हिंदुस्थानांत प्रकट होत नाहीं, याचें कारण येथील वातावरण, हिंदी समाज आज दुबळा, विस्कळित व विकळ

झाला आहे. खऱ्या इंग्रजांना आपली गांठ न पडतां बड्या साहेबांशींच पडते. कोणी मोठा दिसला कीं आपण त्याला बडा साब बनवून त्याच्या चरणीं नमतो. आपण आपल्या दुबळेपणानें त्याला बडा बनवून त्याचीहि माणुसकी मारली आहे. आपण त्याच्या पायाशीं जर कुत्रें होऊन गेलों तर तो कधीं तुकडा तोंडांत देईल वा कधीं छडी मारील; परंतु आपण वर मान करून मनुष्य म्हणून त्याच्याजवळ वागूं तर तोहि माणसासारखा वागूं लागेल. गोरा मनांत म्हणेल "ज्याला मी पशु समजत होतों, तो स्वाभिमानी मनुष्य आहे." असें जेव्हां होईल तेव्हांच आजचे हाल व अपमान दूर होतील. आपलेंच पाप आपल्या तापाला कारण आहे. आणि दुबळेपणा व भित्रेपणा हें सर्वांत मोठें पाप होय. हें आपलें पाप आपण कबूल केलें पाहिजे. कबूल करून भागत नाहीं, तें दूर करावयास सर्वांनीं निश्चयानें उठलें पाहिजे.

"नायमात्मा बलहीनेन लभ्यः" अशी श्रुति आहे. दुबळ्याला सत्यदर्शन नाहीं, मोक्ष नाहीं. मोठमोठीं अलंकारिक भाषणें वा विकारवश होऊन केलेले अत्याचार, यांच्या द्वारा सामर्थ्य प्रकट होत नाहीं. तें प्रकट होण्याचे दुसरे मार्ग आहेत. त्याग व सेवा यांच्या मापानें सामर्थ्य मापलें जातें, जोंपर्यंत हिंदी मनुष्य भीति टाकणार नाहीं, स्वार्थ सोडणार नाहीं, विलास विसरणार नाहीं, चैन चुलींत घालणार नाहीं, आरामाला हराम मानणार नाहीं, तोंपर्यंत सरकारजवळ मागण्यांत अर्थ नाहीं. भारतमातेच्या सेवेसाठीं जें उत्कृष्ट व उदात्त आहे तें संपादण्यासाठीं, सर्वस्वत्यागानें जोंपर्यंत हिंदी जनता उभी राहणार नाहीं, तोंपर्यंत सरकारजवळ मागणें म्हणजे व्यर्थ भीक मागणें होय. अशी भीक मागून आपण दिवसेंदिवस अधिकच निःसत्व व निकामी होऊं. अधिकाधिक आपला पाणउतारा होईल. त्यागाचें मोल देऊन जेव्हां आपण आपला देश आपलासा करूं, आपल्या सर्व शक्ति आपल्या देशासाठीं उपयोगांत आणूं, अहोरात्र उदंड परिश्रम करूं, त्यावेळेस लाजेनें इंग्रजांच्या दारांत भीक मागण्याची जरूर रहाणार नाहीं. आपण जर नीच न होऊं तर इंग्रजांसहि नीच व्हावें लागणार नाहीं. मग आपण सहकारी होऊं शकूं व समानतेनें आणि आदरानें एकत्र बसून सलोख्याचे व स्नेहाचे संबंध निर्मूं शकूं.

जोंपर्यंत हिंदी समाजांतील क्षुद्रपणा व मूर्खपणा जात नाहीं, जोंपर्यंत माणुसकीचे पुरे हक्क आपल्याच बांधवांस आपण देत नाहीं, जोंपर्यंत उच्च वर्ण खालच्या बंधूंस पशुहूनहि तुच्छ लेखीत आहेत, जोंपर्यंत जमीनदार कुळांना गुलामाप्रमाणें वागवीत आहेत, जोंपर्यंत आपले देशीच अधिकारी हाताखालच्या लोकांना पायांखालीं तुडविण्यांत मोठेपणा मानीत आहेत, तोंपर्यंत इंग्रजानें आमच्याशीं नीट वागावें असें सांगण्याचें आपणांस खरें सामर्थ्य नाहीं व असें सांगण्याचा हक्कहि नाहीं.

आज आपण हिंदुस्थानांत प्रत्येक बाबतींत, मग ती बाब धार्मिक असो वा सामाजिक असो, राजकीय असो वा कोणतीहि असो मनुष्यास न शोभेसे वागत आहोंत. आपला सारा व्यवहार ओंगळ झाला आहे. भारताचा मोठे-पणा आपल्या कृतींतून कोठेंच प्रकट होत नाहीं. भारतीय आत्मा त्यागानें अद्याप तळपत नाहीं, म्हणून प्रयत्नांस फळ लागत नाहीं. समानतेच्या नात्यानें बाह्य जगास आपणांस भेटतां येत नाहीं व बाहेरच्या जगाजवळचें मोलवान घेतां येत नाहीं. जे अपमान व जे कष्ट आपणांस आज भोगावे लागत आहेत, त्याला इंग्रज हा एक निमित्तकारण आहे. अत्याचार करून वा चार गप्पासप्पा मारून आपली स्थिति सुधारतां येणार नाहीं. सामर्थ्यानें समान होऊन जेव्हां इंग्रजांस भेटूं तेव्हांच वैरभाव मावळेल. तेव्हांच विरोधाचीं सारीं कारणें नष्ट होतील, मग पूर्व पश्चिम एकत्र येतील. तेव्हां मग राष्ट्र राष्ट्राला, ज्ञान ज्ञानाला, यत्न यत्नाला भेटतील. त्यावेळेस हिंदुस्थानचा इतिहास पुरा होईल. मिळवायचें होतें तें मिळालें असें होईल. मग हिंदुस्थानचा इतिहास जगाच्या इतिहासांत मिळून जाईल व जगाच्या खऱ्या इतिहासास आरंभ होईल.

---

ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम
विभाग
क्रमांक ११२९
नों. दि. ३९१३१५९
IRBK-0108018
IRBK-0108018